मंगळवार, २१ मार्च २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -२०१
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) • TUESDAY 21 MARCH 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-201 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-14 • PRICE-5




# हिंदू देवस्थानांच्या जमिनी हडपण्याचे राज्यात कारस्थान

## जयंत पाटील : घोटाळ्यांची माहितीच कागदपत्रांसहित सभागृहात सादर



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : हिंदू देवस्थानांच्या जमिनींची लूट राज्यात सुरू आहे. देवस्थानांच्या जमिनी हडप करण्याचे कारस्थान गेल्या काही वर्षांपासून सुरु असल्याचा आरोप माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांनी विधानसभेत केला. हिंदू देवस्थानांच्या जमिनींबाबत झालेल्या घोटाळ्यांची माहितीच कागदपत्रांसहीत जयंत पाटील यांनी सभागृहात सादर केली.**

या सगळ्यामागे अधिकारी कोण आहेत, राजकीय नेते कोण आहेत, याचा लाभ कोणाला झाला, याचा खुलासा मंत्री महोदयांनी करावा अशी मागणीही जयंत पाटील यांनी सभागृहात केली. एका महिन्याच्या आत विशेष अधिकारी नेमून 'दूध का दूध, पानी का पानी' करावे आणि जे कोणी दोषी आढळतील त्यांच्यावर तात्काळ कारवाई करण्याचे आदेश द्यावेत, अशीही मागणी जयंत पाटील यांनी केली.

गायरान जमिनींची स्थितीही फारशी वेगळी नाही. एकीकडे गावातील लोक गायरान जमिनी विकत आहेत तर दुसरीकडे ज्यांना रहायला जागा नाही असे गोरगरीब नाईलाजाने या जमिनींवर अतिक्रमण करून तिथे रहात आहेत. त्यांच्या राहण्याच्या प्रश्नाचीही दखल घ्यावी अशी सूचनाही जयंत पाटील यांनी केली. नोकरभरती नसल्याने अनेक युवक पीडब्ल्यूडीमध्ये परीक्षा देऊन घरी बसले आहेत. २०२० च्या एमपीएससी बॅचच्या मुलांना अद्याप कामात रुजू केलेले नाही. त्यामुळे फक्त निवडणुकीपूर्वीची घोषणा न राहता लवकर नोकरभरती करावी, अशी विनंतीही जयंत पाटील यांनी केली.

**सरकारची भूमिका शेतकऱ्याला फसवणारी**

कांदा उत्पादक, कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न आहेत. शेतकऱ्यांना एक रुपयात पीक विमा योजना सरकार आणत आहे. पण विम्याचे हप्ते भरण्यास शेतकऱ्याने कधीच नकार दिलेला नव्हता. त्यांचा आक्षेप जाचक अटींबाबत आहे.

या जाचक अटी दुरुस्त करण्याची गरज आहे. यामुळे शेतकरी विम्याच्या विरोधात आहेत. आता एक रुपया भरून विमा घेणाऱ्या शेतकऱ्यांना विमा कंपन्या दारातच उभे करणार नाहीत. त्यामुळे सरकारची भूमिका शेतकऱ्याला फसवणारी आहे असा जोरदार हल्लाबोल जयंत पाटील यांनी केला.

### महत्वाची बातमी

## अखेर संप मागे; मुख्यमंत्री शिंदेंचे विधानसभेत निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यभर शासकीय कर्मचारी, निमशासकीय कर्मचाऱ्यांचा संप चालू होता. अखेर सोमवारी हा बेमुदत संप मागे घेण्यात आला आहे. जुनी पेन्शन योजना पूर्वलक्ष्यी प्रभावाने लागू करण्याची प्रमुख मागणी कर्मचाऱ्यांकडून करण्यात आली होती. त्यावर मुख्यमंत्र्यांसमवेत झालेल्या बैठकीमध्ये दोन्ही बाजूंनी चर्चा करून संप मागे घेण्याचा निर्णय कर्मचारी संघटनांनी घेतला. यासंदर्भात कर्मचाऱ्यांची मागणी तत्वतः मान्य करण्यात आल्याचे कर्मचारी संघटनांचे समन्वयक विश्वास काटकर यांनी सांगितले. दरम्यान, यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत निवेदन सादर केले. मुख्यमंत्री शिंदे यांनी विधानसभेत शासकीय, निमशासकीय कर्मचाऱ्यांच्या समन्वयकांसमवेत झालेल्या बैठकीबाबत निवेदन सादर केले. तसेच, कर्मचाऱ्यांनी संप मागे घेण्याचा निर्णय घेतल्याचंही मुख्यमंत्र्यांनी सभागृहाला सांगितले. राज्य सरकारी कर्मचारी, मध्यवर्ती संघटना व सर्व शासकीय निमशासकीय कर्मचारी संघटना यांच्या वतीने १४ मार्च २०२३ पासून राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा संप सुरू होता. महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ यांच्या वतीने २८ मार्चपासून संपावर जाण्याबाबत राज्य शासनाला नोटीस दिली आहे. या संपावर तोडगा काढण्यासाठी मुख्य सचिव स्तरावर व माझ्या स्तरावर संबंधित संघटनेचे पदाधिकारी व राजपत्रित अधिकारी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांसह बैठकांचे आयोजन करण्यात आले होते, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी सभागृहाला दिली.

## अडीच लाख सरकारी पदे भरणार : राहुल गांधी


आधुनिक केसरी न्यूज

**बेळगाव :** कर्नाटकच्या निवडणुका लवकरच जाहीर होण्याची शक्यता असून त्यासाठी सर्वच पक्षांनी कंबर कसल्याचे दिसून येत आहे. कर्नाटकमध्ये काँग्रेस पक्षाला मोठ्या आशा असून त्यासाठी पक्षाच्या नेत्यांनी जोरदार तयारी सुरूल केली आहे. कर्नाटकात जर काँग्रेस पक्ष सत्तेवर आला तर बेरोजगारांना दोन वर्षे दरमहा 3000 रुपये भत्ता देणार असल्याची घोषणा काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केली आहे. बेळगावमध्ये झालेल्या सभेमध्ये त्यांनी ही घोषणा केली आहे. काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी कर्नाटकसाठी केलेली सर्वात मोठी घोषणा म्हणजे दोन वर्षांसाठी बेरोजगार पदवीधरांना दरमहा 3,000 रुपये देण्याची. ते म्हणाले की, बेरोजगारी कमी करण्यासाठी केंद्र सरकार काहीही करत नाही. त्यामुळेच काँग्रेस पक्ष बेरोजगार पदवीधरांना दोन वर्षांसाठी दरमहा 3,000 रुपये आणि पदविकाधारकांना दोन वर्षांसाठी 1,500 रुपये प्रति महिना देणार आहे. राहुल गांधींनी कर्नाटकात 200 युनिट मोफत वीज देण्याची घोषणाही केली आहे. यासोबतच 10 लाख खासगी नोकऱ्या देण्याचे आणि 2.5 लाख रिक्त सरकारी पदे भरण्याचे आश्वासन राहुल गांधींनी दिले आहे. कर्नाटकातील बेळगाव येथे निवडणूक सभेला संबोधित करताना राहुल गांधी म्हणाले, कर्नाटकमधील भाजप सरकार हे देशातील सर्वात भ्रष्ट सरकार आहे. कोणतेही काम करण्यासाठी 40 टक्के कमिशन घेतले जाते. कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनने पंतप्रधानांना पत्र लिहिले, पण त्यांनी काहीच केले नाही. भाजपच्या आमदाराच्या मुलाकडून आठ कोटी रुपये जप्त करण्यात आले मात्र कारवाई झाली नाही. राज्यात काँग्रेसचे सरकार आल्यास दहा लाख तरुणांना रोजगार दिला जाईल आणि अडीच लाख सरकारी पदेही भरली जातील, अशी मोठी घोषणा राहुल गांधी यांनी केली. महिलांना दरमहा दोन हजार रुपये आणि गरीब कुटुंबांना दहा किलो तांदूळ देणार असल्याचेही ते म्हणाले.

## पठाणवस्तीची तहान भागविण्यासाठी जमीन दान देणारा अवलिया..!

आधुनिक केसरी न्यूज


सुजित सातपुते



पिलीव (माळशिरस) : स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्यानंतरही दुष्काळाच्या झळा सोसत असलेल्या माळशिरस तालुक्यातील कायम दुष्काळी 22 गावांना दुष्काळ मुक्त करण्याचा संकल्प अनेक नेत्यांनी हातात घेतला असून निरा देवधर धरणाच्या पाण्यासाठी संघर्ष करणारे अनेक नेते आहेत. परंतु सध्याचे काय? असाच प्रश्न उपस्थित केला आहे कायम दुष्काळी भाग म्हणून ओळख असलेल्या माळशिरस तालुक्यातील पठाण वस्तीच्या एका नवनियुक्त 65 वर्षांच्या ग्रामपंचायत सदस्याने. या अवलियाचे नाव आहे अशोक रामा सोनवणे. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा या तिन्ही ऋतूत कोरडी पडलेली जमीन आणि तळ गाठलेल्या विहिरी, नाले, बंधारे असे चित्र असलेल्या पठाण वस्तीमध्ये पाण्यावाचून जनावरांचे होणारे हाल, ग्रामस्थांना पाण्यासाठी करावी लागत असलेली कोसोदूर पायपीठ, ऋतू कोणताही असू पाण्याचा शोध घेणे हा पठाण वस्तीच्या ग्रामस्थांसाठी एक प्रमुख उद्योगच बनला आहे, असे म्हणले तर वावगे ठरणार नाही. गावातील ग्रामस्थांचे चेहरे टँकरची आशेने वाट पाहत असतात. पाण्याचा टँकर चालू जरी असला तरी दीड दोन हजारांच्या लोकसंख्या असलेल्या गावांमध्ये निम्म्या लोकांना कसलेच पाणी मिळत नाही, असे गावकऱ्यांचे म्हणणे आहे. गावातील बायका, मुलं, अबालवृध्द आपला जीव धोक्यात घालून विहिरी-बारवांमधून पाणी काढतात. तरीही प्रशासनाला येथील लोकांच्या जीवाची चिंता ना काळजी. अशा दुष्काळी परिस्थितीत करायचे काय? आणखी उन्हाळा सुरु होतोय तोपर्यंतच मार्च महिन्याच्या तोंडालाच सर्व विहिरी, बोअर, नाले, बंधारे कोरडे पडले आहेत. त्यामुळे पाणीटंचाईची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. पाण्याचा टँकर कधीच वेळेवर येत नाही. अशातच माणुसकीच्या आणि गावच्या प्रेमापोटी आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो. गावातील लोकांची पाण्यासाठी होत असणारी वणवण थांबवण्यासाठी ग्रा.पं. सदस्य



अशोक सोनवणे या आवलियाने कसलीही अपेक्षा न ठेवता आपली स्वतःची दोन्ही ओढ्याच्या कडेला अगदी 100 टक्के पाणी लागेल अशा ठिकाणची लाखो रुपये किंमतीची 2 गुंठे जागा ग्रामपंचायतला बक्षीसपत्र करून दिली आहे. यामुळे अशोक सोनवणे यांचे सर्वच स्तरातून कौतुक होत असल्याचे पहावयास मिळत आहे. या जमिनीमध्ये भली मोठी अशी लवकरच विहीर पाडून पठाण वस्तीच्या पाणीटंचाईचा कायमचा प्रश्न मार्गी लावणार असल्याचे लोकनियुक्त सरपंच एजाज पठाण यांनी सांगितले.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




आधुनिक केसरी

मी आणि आमच्या सौ एका लग्नाला गेलो होतो. लग्न ठरले ठरले म्हणून बऱ्याच दिवसांपासून कानावर येत होते. जवळच्या नात्यातील लग्न असल्याने ते लांब असले तरी जाणे क्रमप्राप्त होते. तेव्हा आम्ही लग्नाच्या एक दिवस आधीच इच्छित ठिकाणी पोहोचलो. मी आधीपासून आमच्या हिला म्हणत होतो की आपण मंगल कार्यालयात मुक्काम करण्याऐवजी एखाद्या हॉटेलमध्ये राहू या म्हणजे झोप वगैरे व्यवस्थित होते. पण हिने नेहमीप्रमाणे माझे म्हणणे फेटाळून लावले. तिचा एक भाऊ कधीही आणि कुठेही लग्नाला गेला तरी तो कार्यालयात राहत नाही. एखाद्या हॉटेल किंवा रेस्ट हाऊसमध्येच त्याची मुक्कामाची व्यवस्था असते. असे असूनही आमच्या हिने माझे ऐकले नाही. ती म्हणाली, ' अहो, तुम्ही अजिबात काळजी करू नका. ज्यांच्याकडे लग्न आहे त्यांनी एक मोठे हॉटेलच लग्नासाठी घेतले आहे. भरपूर खोल्या आणि राहण्याची छान व्यवस्था आहे. ' मी विचार केला की ठीक आहे. बघू या. आम्ही पोहोचलो तेव्हा कार्यालयात काही वऱ्हाडी मंडळींची फारशी वर्दळ नव्हती. मात्र सुखद आश्चर्य म्हणजे वराकडील मंडळी मात्र तेथे नुकतीच येऊन डेरेदाखल झाली होती. आम्ही कार्यालयात पोहोचलो तेव्हा सकाळी साधारण साडेदहा अकराची वेळ होती. उपस्थित मंडळींचा गरमागरम नाश्ता सुरु होता. कचोरी, सामोसे असा फर्मास मेनू होता. बाजूलाच चहा, कॉफीची सोय होती. यजमानांनी आम्हाला पाहताच आमचे स्वागत केले आणि नाश्त्याचा आग्रह केला. मला तसे कोणाला नाराज करणे आवडत नाही. त्यामुळे मी त्यांच्या आग्रहानुसार माझे पाय त्या नाश्त्याच्या काउंटरकडे वळवले. एक कचोरी आणि सामोसा खाऊन झाल्यावर मला जेवणाची आठवण झाली.



## आनंदी पहाट

### प्रत्येकाची आनंदाची अनुभूती निराळी

आधुनिक केसरी

आपलं जीवन जगण्याच्या अनेक प्रकारच्या नवनवीन कल्पना आपल्या मनांत सदोतीत येत असतात. प्रत्येकालाच असं वाटत असतं कि, आपलं आयुष्य इतरांपेक्षा निराळं असावं. जगानं आपलं कौतुक करावं, असंच आपलं जीवन असावं. आपल्या प्रत्येक बाबतीत काही-ना-काही वेगळेपण असावं, असं अनेकदा आपल्याला वाटत असतं. इतरांपेक्षा आपली प्रत्येक गोष्ट भिन्न असण्यासाठी प्रत्येकाची धडपड सुरु असते. त्यासाठी बदलत चाललेल्या जीवनमूल्यांचा स्विकार करावा लागत असतो. आपल्याला दैनंदिन जीवनात निरनिराळे अनुभव येत असतात, ज्यामुळे आपली मानसिकता बदलत असते. ह्या बदलत जाणाऱ्या मानसिकतेच्या अनुशंगानं सकारात्मक विचार करण्याची जरुरी असते. अर्थात सरधोपटपणे केलेल्या विचारांत सकारात्मकता असतेच असे नाही. पण आपल्या मनाच्या स्वास्थ्यासाठी तसा अभ्यासपूर्वक विचार होणं आवश्यक असतं. मनाला रमवण्यासाठी आणि नवं आजमावण्यासाठी आपल्याच अंतर्मनाचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यासपूर्वक विचार करावा लागतो. तेव्हाच आकर्षणाच्या सिद्धांताचं शास्त्र काम करायला लागतं. ह्या शास्त्राचा नीट वापर केला नाही तर मात्र त्याचे काही जणांच्या बाबतीत विपरीत परिणाम देखील होत असल्याचं स्पष्ट झालं आहे. प्रत्येकाची आनंदाची व्याख्या जशी निराळी असते, तशीच अनुभूती देखील वेगवेगळी असते. खरं तर आपापल्या अनुभूती आणि प्रचीतीनुसार आपली आनंदाची व्याख्या तयार होत असते. आनंद आपल्या अंतरंगात निर्माण होत असतो. आपल्या विचार, वर्तन आणि व्यवहारावर तो निर्माण कसा, किती आणि कधी होतो ? ते अवलंबून असतं. अनेकदा आपल्या अंतर्मनातील विचारांमध्ये आपण गुरफटले जात असतो, अगदी न कळत होत असतं तसं.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

**एकची सोयरा | गाथा व्हावी ||**
एकांती बैसोनी | करावे चिंतन ||
ज्ञानाचे साधन | नाही दुजे ||१||
साधावा संवाद | मनाने आत्म्याशी ||
सूर ॐकाराशी | जुळवावे ||२||
नामाचे भजन | कर्माचे पूजन ||
देहाचे गुंजन | एक व्हावे ||३||
तुझे माझे सारे | भाव लुप्त व्हावे ||
अंतरी जाणावे | ब्रह्मरूप ||४||
ज्ञानाने साधावा | 'ज्ञान' भाव सारा ||
एकची सोयरा | गाथा व्हावी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी


महाकालीमहाकालौ
वन्देऽहं सततं युवाम्। सौन्दर्यं युवयोर्दृष्ट्वा
संहृष्टं मे मनो यथा॥1॥
हे महाकाली आणि महाकाल, आपल्या दोघांना मी सतत वंदन करतो. आपले सौन्दर्य पाहून माझे मन आनंदी झाले की, जसे...



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**काल शीश मँड़राइया, क्षण-क्षण ढूँढ़त दाव। सो कवनी विधि सोवहीं, ताहि मरम जो पाव ।।१८९।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल षष्ठ अध्याय) ०६/०६/१८९ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :** काळ प्रत्येक जीवाच्या डोक्यावर घिरट्या घालत आहे. तो प्रत्येक क्षणाला त्याला मारण्यासाठी संधी शोधत आहे. ज्याला काळाच्या या रूपाचे ज्ञान होईल ती व्यक्ती निश्चिंतपणे कशी झोपू शकेल ?



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.**

## श्रवणनिरूपण

आधुनिक केसरी

योगी लोकांना योग आवडतो. स्वार्थी माणसाला स्वार्थ आवडतो। कवीला काव्य आवडते. तर्कशुद्ध माणसाला तात्विक वाद विवाद आवडतात. कलावंतांना वेगवेगळ्या प्रकारच्या कला आवडतात. कुणाला स्नान संध्या आवडते. कुणाला हरी किर्तन आवडते. प्रेमळ माणसांन दया करूणा आवडते. चतुरांना हुशारी आवडते तर व्यवहारी जगात वावरत असताना व्यवहार कौशल्य आवडते. आपण आता समासाच्या शेवटाकडे आलो आहोत. समर्थाच्या विचारांचा प्रभाव समाजमनावर येवढा आहे की कितीही वाचलं श्रवण केलं तरी त्याचे रसपान परत परत करावेसे वाटणे आपणही अजून कुठे कमी आहोत काय केलं पाहिजे ?आपल्यात काय सुधारणा केल्या पाहिजेत हे समजतं. समर्थाच्या साहित्यात समाजातील प्रत्येक जीवाला आपल्या जडणघडणीत बदल करून आपलं आयुष्य सालंकृत करण्याचं सामर्थ्य आहे. मात्र एक पथ्य त्यासाठी पाळलं पाहिजे. ते म्हणजे समर्थाच्या विचारसरणीवर आपणं सगळ्यांनी चाललं पहिजे ज्ञानमार्ग भक्तिमार्गाची वाट कधीच विसरू नका. 48 व्या ओवी ते 60 व्या ओवीपर्यन्त समर्थ काय उपदेश करतात ते पाहूया.मंदीरात मुर्ती कडे आवडीने भक्तिने पहाणारा त्याची परमेश्वराप्रती आस्था त्याच्या डोळ्यात दिसते. गायन कलेत पारंगत असलेला गायक तालाच्या ज्ञानाकडे आवडीने पहातो,गायन कलेतील ताना,अलाप,मींड, खटके आवडीने पहातो योगाचे ज्ञान असणाऱ्या योग्याला शरीरातील रचनेची आवड असते.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## कोणत्याही परिस्थितीत नामस्मरण शक्य आहे ?

आधुनिक केसरी

मनुष्याची सर्व धडपड शाश्वत समाधान मिळविण्यासाठी चालू असते. ते समाधान फक्त भगवंताजवळ असल्याने समाधानासाठी प्रत्येक माणसाला भगवंताची गरज आहे. आपल्या सर्व धडपडीतून भगवंताच्या प्राप्तीचे समाधान आपल्याला मिळत नाही; आणि त्याला परिस्थिती कारणीभूत आहे, असे सर्वजण सांगतात. पण खरोखरच परिस्थिती आड येते किंवा काय हे आपण बघितले पाहिजे. परिस्थितीसंबंधी विचार करताना एक बाह्य परिस्थिती आणि दुसरी आंतर-स्थिती यांचा विचार करावा लागेल. बाह्य परिस्थितीचा विचार करताना प्रथम आपली शरीरप्रकृती आड येते. ही प्रकृती कशीही असली तरी भगवंताचे स्मरण आपल्याला करता येईल की नाही ? प्रकृतीला कितीही क्षीणत्व आले, देहाला कितीही विकलता आली, तरी अंतकाळी भगवंताचे स्मरण करता येते, असे भगवंताने गीतेत सांगितले आहे. देहाची अवस्था कोणतीही असली, तरी त्यामध्ये नामस्मरण करता येत नाही हे म्हणणे काही बरोबर नाही. तेव्हा, प्रकृती आड येते, असे म्हणणे कितपत सयुक्तिक ठरेल ? पुष्कळ लोक आर्थिक अडचणींसंबंधी कुरकुर करतात. पैसा नसल्याकारणाने प्रपंचात काळजी उत्पन्न होऊन, भगवंताकडे लक्ष द्यायला सवडच मिळत नाही असे बरेचजण सांगतात. पण खरोखर तुम्ही मला सांगा, जगात भरपूर धन मिळवून वैभवाच्या शिखरावर पोहोचलेले कितीसे लोक नामस्मरण करतात ? आजपर्यन्त किती राजे लोक आपले राजवैभव लाथाडून भगवंताच्या प्राप्तीसाठी बैरागी झाले ? आपल्याजवळ पैसा नसणे हे भगवंताच्या प्राप्तीच्या आड येते, हे म्हणणे बरोबर नाही. उलट, पैसा हा भगवंताची निष्ठा फार कमी करतो. पैसा असला की आपल्याला एक आधार आहे असे वाटते. म्हातारपणी आपल्याला उपयोगी पडावा म्हणून पैसा साठवायचा प्रयत्न करावा, तर मी म्हातारपणापर्यंत जगेन याची खात्री कोणी द्यावी ? सुख, समाधान, हे पैशावर अवलंबून नाही. प्रत्येकाची गोतावळी ठरलेली आहे. वेताळाची स्वारी निघाली की त्याच्याबरोबर पिशाच्चे निघायचीच; आणि भगवंताची स्वारी निघाली की त्याच्याबरोबर दया, क्षमा, आणि जिकडेतिकडे आनंदी वृत्ती, ही असायचीच. त्याचप्रमाणे पैसा आला की त्याच्याबरोबर तळमळ, लोभ, असमाधान, ही यायचीच. परस्त्री एखादे वेळी विषयभोगामध्ये आपल्याला सामील होणार नाही, पण पैसा मात्र आपण वापरू तसा वापरला जातो. बाप-मुलगा, भाऊ-भाऊ, भाऊ-बहीण, मित्र-मित्र, यांच्यामध्ये वितुष्ट आणायला कारण काही असेल तर पैसाच होय.

आपण पैसा साठविला तर गैर नाही , पण त्याचा आधार न वाटावा . अनुसंधानाच्या आड त्याला येऊ देऊ नये .



## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

धन मेळविलें कोडी । काळ घेतल्या न सोडी ॥३॥
कामा न ये हा परिवार । सैन्य लोक बहु फार ॥४॥
तंववरि मिरविसी बळ । जंव आला नाहीं काळ ॥५॥
तुका म्हणे बापा । चुकवीं चौऱ्याशींच्या खेपा ॥६॥
कानडीनें केला मऱ्हाटा भ्रतार । एकाचें उत्तर एका न ये ॥१॥
तैसें मज नको करूं कमळापति । देई या संगति सज्जनांची ॥ध्रु.॥
तिनें पाचारिलें इल बा म्हणोन । येरु पळे आण जाली आतां ॥२॥

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, २१ मार्च २०२३
adhunikkesari.com | Adhunik Kesari

# हिंदू एकजुटीचा 'रुद्रावतार'



आधुनिक केसरी न्यूज

**सुधीर कोर्टीकर**

**छत्रपती संभाजीनगर :** सकल हिंदू समाजाने छत्रपती संभाजीनगरमध्ये नामांतराच्या समर्थनात जनगर्जना मोर्चा काढला. पोलिसांकडून या मोर्चाला परवानगी नाकारण्यात आली होती. तरीदेखील या मोर्चाचे आयोजन करण्यात आले. या मोर्चाला हजारोंच्या संख्येने लोक उपस्थित होते. जिल्ह्याचे पालकमंत्री संदीपान भुमरे, सहकारीमंत्री अतुल सावे यांनी हा मोर्चा शांततेच्या मार्गानेच होणार असल्याचे स्पष्ट केले होते. यावेळी मोर्चामध्ये केंद्र सरकारने घेतलेल्या या निर्णयाला विरोध करणाऱ्यांविरोधात घोषणाबाजी करण्यात आली. छत्रपती संभाजी नगर मधील क्रांती चौका मधील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करून आलेल्या नेतेमंडळींनी त्यांच्याकार्यकर्त्यांना मार्गदर्शन केल्या नंतर हिंदू जन गर्जना मोर्चाची सुरुवात झाली. छत्रपती संभाजीनगरमधील मान्यवर नेते मधुर सुनील अग्रवाल, विनोद पाटील, राज वानखेडे, राजेंद्र जंजाळ, शिवाजी दांडगे, अभिजित देशमुख, संजय जोशी, रामू काका शेळके, निरंजन राठोड, राजू शिंदे, सुमीत खांबेकर यांनी सकल हिंदू एकत्रीकरण समितीच्या माध्यमातून हिंदू जन गर्जना मोर्चाचे आयोजन केले होते. हजारोंच्या संख्येने हिंदू जन गर्जना मोर्चात सहभागी झालेले कार्यकर्ते मग कांही तर काही निळे तर काही जण भगवे ध्वज नाचवत..पायी तर काही वाहनां वरुनही जाताना दिसत होते. कांही कार्यकर्ते तर ढोल ताशांच्या गजरात सहभागी होऊन तालबद्ध नृत्य करीत औरंगपूऱ्याकडे वाटचाल करीत होते. एक इस्कॉन च पथकही मोर्चात सहभागी होऊन... हरे राम हरे कृष्ण...गीत गात... नाचताना पाहून साऱ्यांचाच उत्साह ओसंडून वाहत होता. सुटीचा रविवारचा दिवस... दोन दिवसांच्या झालेल्या पावसामुळे वातावरणात खूप थंडावा जाणवत होता.त्यामुळे एरवी मार्च मधील त्रासदायक वाटणारं ऊन आज हवंहवंसं वाटतं होतं... त्यामुळे हिंदू जन गर्जना मोर्चातील कार्यकर्त्यांचा उत्साह शिगेला पोहचलेला होता. विशेषतः या हिंदू जन गर्जना मोर्चामधे महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. काही महिलां तर मोटरसायकल वरुन झेंडे नाचवत... घोषणा देताना दिसत होत्या. या मोर्चाला पोलिसांकडून परवानगी नाकारण्यात आली होती. तरीही हा मोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये अनेक तरुणांनी, महिलांनी सहभाग घेतला होता.

# मशिदींवरील भोंग्यांवर केवळ प्रतिबंध नाही, बंदी घाला : मेजर त्रिपाठी

## 'सौदी अरेबियामध्ये मशिदींवरील भोंग्यांवर प्रतिबंध, सेक्युलर भारतात कधी?' या विषयावर विशेष संवाद!

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** सौदी अरेबियामध्ये रमजानच्या महिन्यात मशिदींवरील भोंग्यांवर प्रतिबंध केला आहे. मोठ्या आवाजात लावण्यात आलेल्या भोंग्यामुळे होणारे त्रास कट्टर मुसलमान देशांनाही आता लक्षात येत आहेत. पर्यावरण, तसेच शास्त्रीय दृष्टीने तेही विचार करत आहेत. भारतात जेव्हा मशिदींवरील भोंग्यांवर बंदी करण्याची मागणी होते, तेव्हा मुल्ला-मौलवी आणि मुसलमान नेते ऐकत नाहीत. आम्ही 20 प्रतिशत भारतातील 80 प्रतिशत लोकसंख्येवर प्रभुत्व गाजवत आहोत, हे दाखवायचा प्रयत्न केला जात आहे ! अजान इतरांना भोंग्यांद्वारे ऐकवावी, असे इस्लामच्या कुठल्या ग्रंथात लिहिले आहे ? 90 डेसिबलच्या वर कुठल्याही भोंग्याचा आवाज असू नये; मात्र अनेक मशिदींवरील भोंग्यांचा आवाज हा 120 ते 130 डेसीबलच्याही वर असतो, जो लोकांना बहिरेपणा आणू शकतो. भारतातील सर्व मशिदींवरील भोंग्यांवर केवळ प्रतिबंध नाही, तर त्यावर बंदी घालावी, अशी मागणी दिल्ली येथील मेजर (निवृत्त) तथा लेखक आणि सामाजिक कार्यकर्ते श्री. सरस त्रिपाठी यांनी केली. हिंदु जनजागृती समितीच्या वतीने 'सौदी अरेबियामध्ये रमजानच्या महिन्यात मशिदींवरील भोंग्यांवर प्रतिबंध, सेक्युलर भारतात कधी ?' या विषयावरील 'ऑनलाईन' विशेष संवादात ते बोलत होते. यावेळी चर्चेत सहभागी झालेले 'सर्वोच्च न्यायालया'चे अधिवक्ता उमेश शर्मा म्हणाले की, जे इस्लामचे केंद्र मानले जाते, तिथून मशिदीवरील भोंग्यांना प्रतिबंध केला आहे आणि अन्य नियमही लागू केले आहेत. मग भारतात हे का लागू नाही ? दिवसांतून 5 वेळा मोठ्या भोंग्यांद्वारे अजान ऐकतांना अनेकांना त्याचा त्रास होतो. लोकांची झोपमोड होते, हिंदू त्या वेळी पूजापाठ किंवा अन्य कामे करतांना त्यात व्यत्यय येतो, अन्य धर्मीयांनाही याचा त्रास हा होतोच ! संविधानानुसार सर्व धर्म-पंथ सारखे आहेत. अजान ही मुसलमानांसाठी आहे, मग इतरांना ऐकवण्यासाठी जो प्रयत्न केला जात आहे, तो त्या त्या ठिकाणच्या सरकारने थांबवला पाहिजे.

# कांद्याला भाव नसल्याने उत्पादकांसह ग्राहकही कोमात; कांद्याने केला वांदा

आधुनिक केसरी न्यूज

**औसा :** बाराजात हमीभावाची शाश्वती नसतानाही आपल्या मालाला भाव मिळेल का नाही. या पिकाला कुठलेही अनुदान नसतांना ही बळीराजा मोठ्या आशेने शेती करतो. परंतु यावर्षी मात्र कांद्याने वांदा करून शेतकऱ्याच्या जीवनात दैवनीय अवस्था केली आहे. हजारो रूपये खर्च करूनही कांद्याला भाव नसल्याने लागवड खर्चही निघणे कठीण झाले असून शेतकऱ्यांनी लागवड केलेल्या कांद्याचा फायदा हा व्यापारी वर्गाकडून मोठ्या प्रमाणात घेतल्या जात असून बाजारामध्ये 2 ते 3 रुपये प्रति किलोने विकले जाणारा कांदा हा किरकोळ बाजारात २० ते २२ रुपये किलोने विकला जात आहे. यात किरकोळ ग्राहकांचीही मोठी लूट होत असून या भाववाढीचा फायदा सामान्य ग्राहकाला होताना दिसत नसून व्यापारी वर्ग हा शेतकऱ्यांनाही लुटत असून ग्राहकालाही लुटत असल्याचे दिसून येत आहे. या भाववाढीचा फायदा केवळ व्यापारी वर्गांना दिसत असून व्यापारी वर्गाकडून शेतकऱ्याची व ग्राहकांची दोघांचीही मोठ्या प्रमाणात लूट केली जात असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. यामुळे शेती हा बिनभरोशाचा एक जुगारच ठरत असून हा जुगार बळीराजांना खेळावा लागत आहे. याचा फायदा मात्र व्यापारी वर्गाला होत असताना दिसून येत आहे. आधी ग्राहकांच्या डोळ्यातून पाणी आणणारा कांदा यंदा शेतकऱ्यांच्या डोळ्यातून पाणी आणत असल्याचे चित्र औसा तालुक्यासह परिसरात दिसत आहे. शेतकऱ्याने 3 महिन्यांत येणारे पिक म्हणून कांद्याची मोठ्या प्रमाणात लागवड केली होती.

> मी माझ्या शेतात एक ते दीड एक्कर कांदा लागवड केली .खुप महागाचे जवळपास 5000रु किंमतीचे बियाणे आणले . लागवड खर्च 10 हजार रु झाला .मग फवारणी,खत खुरपणी असे 20-30 हजार रु खर्च झाला . मोठ्या अपेक्षेने कांदा लागवड केली होती . चांगला भाव मिळेल अशी आशा होती परंतु आता काढणीसाठी कांदा आल्या असून भाव नसल्याने खुप मोठे आर्थिक संकट आले आहे . काढणी साठी 20-25हजार रुपये लागणार असल्याने व पडलेला भाव यामुळे हातातोंडाशी आलेला कांदा काढणी करावी की नको ही संभ्रम अवस्था निर्माण झाली असुन शासनाने तात्काळ आम्हा शेतकऱ्यांना घोषीत केलेले अनुदान द्यावे ही अपेक्षा आहे
> **शिवाजी गोविंद भोसले, कांदा उत्पादक शेतकरी बेलकुंड**




# ब्रिटनला सुनावले

आधुनिक केसरी

गेल्या काही दिवसांपासून पंजाबमध्ये अमृतपाल सिंग याच्या विधानांवरून आणि त्यानंतर पोलिसांकडून त्याचा शोध घेतला जात असताना त्याचे पडसाद देशभरात उमटताना दिसत होते. आता त्याचे पडसाद थेट लंडनमध्ये उमटले असून तेथील भारतीय उच्चायुक्त कार्यालयाबाहेर खलिस्तानी समर्थकांनी आंदोलन केल्याचा प्रकार समोर आला आहे. या समर्थकांनी कार्यालयाबाहेरच्या भारतीय राष्ट्रध्वजाचाही अपमान केल्याचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. यावेळी अमृतपाल सिंग याच्या समर्थनार्थ घोषणाबाजीही झाल्याचे पाहायला मिळाले. या प्रकारावर आता भारत सरकारने ब्रिटनला परखड शब्दांत सुनावले आहे. लंडनमध्ये असणाऱ्या भारतीय उच्चायुक्तांच्या कार्यालयाबाहेर भारताचा तिरंगा फडकवण्यात आला आहे. मात्र, काही कथित खलिस्तानी समर्थकांनी उच्चायुक्त कार्यालयाबाहेर केलेल्या आंदोलनादरम्यान या ध्वजाचा अपमान केल्याचा प्रकार घडला आहे. या आंदोलनादरम्यान भारताचा राष्ट्रध्वज खाली उतरवण्याचा प्रयत्न या आंदोलकांकडून करण्यात आला. मात्र, वेळीच भारतीय उच्चायुक्ताच्या सुरक्षा रक्षकांनी मध्यस्थी केल्यामुळे पुढील अनर्थ टळला. दरम्यान, या प्रकाराचा भारताकडून तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला आहे. भारतीय परराष्ट्र खात्याचे प्रवक्ते अरिंदम बागची यांनी त्यांच्या ट्विटर हँडलवर यासंदर्भातील प्रेस रिलीज शेअर केली आहे. ब्रिटनच्या भारतातील सर्वात ज्येष्ठ राजनैतिक अधिकाऱ्यांना नवी दिल्लीत हजर राहण्याचे आदेश भारत सरकारने दिले. लंडनमधील प्रकाराबद्दल भारताने आपली तीव्र नापसंती व्यक्त केली आहे, असे या पत्रकात नमूद करण्यात आले आहे. यावेळी भारत सरकारने ब्रिटिश राजनैतिक अधिकाऱ्यांना भारतीय उच्चायुक्तांच्या सुरक्षेत झालेल्या कुचराईबद्दलही नाराजी व्यक्त केली आहे. "या आंदोलकांना भारतीय उच्चायुक्तांच्या कार्यालय परिसरात येण्यापासून कोणताही मज्जाव करण्यात आला नाही. कारण त्यावेळी ब्रिटिश सुरक्षा पूर्णपणे अनुपस्थित होती. यासंदर्भात व्हिएन्ना करारानुसार ब्रिटिश सरकारच्या कर्तव्याची जाणीव या ब्रिटिश अधिकाऱ्यांना करून देण्यात आली आहे, असेही भारत सरकारकडून सांगण्यात आलं आहे. भारतीय उच्चायुक्त कार्यालय परिसर आणि कर्मचारी यांच्या सुरक्षेबाबत ब्रिटिश सरकारची उदासीनता भारताला अस्वीकारार्ह आहे. हे खपवून घेतले जाणार नाही. यावर ब्रिटिश सरकार तातडीने पावले उचलून योग्य ती कारवाई करेल अशी अपेक्षा आहे. संबंधितांचा शोध घेऊन त्यांना अटक केली जावीआणि त्यांच्यावर योग्य त्या नियमानुसार कायदेशीर शिक्षाही केली जावी असेही परराष्ट्र विभागाकडून ब्रिटिश सरकारला सांगण्यात आलं आहे.



सुशील गायकवाड
संपर्क क्र.: 9309474068

# सरकारी कर्मचाऱ्यांकडूनच संविधान धोक्यात ?

आधुनिक केसरी

**सरकारी कर्मचाऱ्यांनी संविधानानुसार काम केले पाहिजे. अशी भावना सर्वसामान्य जनतेची असायला काहीच हरकत नाही. कारण सरकारी कर्मचारी हे सर्वसामान्य जनतेला सेवा पुरविणारा महत्वाचा घटक म्हणून त्यांच्या कडे पाहिले जाते. सर्वसामान्य जनतेची बरीचशी कामे यांच्या कडूनच होत असतात. परंतू त्या कामास विलंब लावणारे अनेक सरकारी कर्मचारी या यंत्रणेत काम करत असतात. एखाद्या कामाची फाईल पुढे सरकविन्यापासून ते काम मार्गी लावण्या पर्यंत कोण कोणत्या करामती केल्या जात असतात. हे अनेकांनी चांगलंच अनुभवलेले असते.**

ज्या त्या विभागातील हे सरकारी कर्मचारी किती तळमळतेने काम करत असतात. हे सर्वांना ज्ञात आहेच. सरकारी काम बारा महिने थांब....हे थांबणे आणि एखादे काम किती लवकर करायचे, किती वेळ थांबवून ठेवायचे याचे अनेक अनुभव सरकारी आणि प्रशासकीय लोकांकडून अनुभवता येतात. जे काम सहजच होणारे असते.त्या कामास हेलपाटे मारण्यास लावणारे असे अनेक सरकारी कर्मचारी या यंत्रणेत दिसून येतात.आज इतर सरकारी कर्मचाऱ्यांसोबतच अशा ही सरकारी कर्मचाऱ्याच्या बाबतीत जुनी पेंशन बद्दल मुद्दा पुढे येणारच. परंतु अशी लोकच प्रामाणिक पणे कामे करत नसतात. त्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या कामाबद्दल अशा सरकारी कर्मचाऱ्यांमध्ये ना तळमळ ना आपुलकी दिसून येते. संविधान हे इथल्या सरकारी कर्मचाऱ्यांना जनतेची सेवा करण्यासाठी कर्तव्ये बजावण्यास सांगत आहे.परंतू हे कर्तव्य विसरून संविधानाच्या विरोधातच उल्लंघन करणारे काम केले जात आहे. असे अनेक सरकारी कर्मचारी आहेत की ते प्रामाणिकपणे सेवा बजावत नाहीत. सरकारी कर्मचाऱ्यांचा पगार हा जनतेच्या खिशातूनच दिला जातो ना मग जनतेच्या सेवेसाठी प्रामाणिकपणे सेवा का दिली जात नाही ? संविधानास बगल देऊन संविधानाचे उल्लंघन करणारे कामच अनेक सरकारी कर्मचाऱ्यांकडुन केले जात असते.

त्यामुळे आपल्या संविधानाची खरी अंमलबजावणी जिथून सुरू व्हायला पाहिजे तिथेच उल्लंघन तिचे होत आहे. आपले संविधान धोक्यात येण्यास अशा सरकारी कर्मचाऱ्यांना सुद्धा दोषी मानावे लागेल.जेव्हा हे सरकारी कर्मचारी वर्ग संविधाना नुसार सेवा द्यायला सुरुवात करतील तेव्हाच इथल्या सर्वसामान्य जनतेची कामे वेळेत आणि कोणताही पैसा न घेता होऊ शकतात.परंतु काही सरकारी कर्मचाऱ्यांनी पैसे घेतले नाहीत असे तर होणारच नाही. संविधान जे सर्वसामान्य जनतेला हक्क आणि अधिकार देत असते त्याची पूर्ती मात्र इथल्या विविध शासकीय प्रशासकीय कार्यालयात जे अधिकारी व कर्मचारी म्हणून सरकारी सेवक कार्यरत असतात.हेच तर असे अनेक सरकारी कर्मचारी संविधानाची पायमल्ली करत सर्वसामान्य जनतेला वेठीस धरत असतात.मोठ्या लोकांची, प्रतिष्ठित लोकांना तत्पर सेवा मिळवून देणारे कर्मचारी मात्र सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने तत्परता दाखवत नाहीत.

-पेंशन मिळणे हा सरकारी कर्मचाऱ्यांचा संविधानिक अधिकार आहे. तो मिळाला पाहिजे.याबाबत दुमत नाही. परंतु आज पेंशन मिळविण्यासाठी जेवढा आटापिटा सुरू आहे.

तेवढाच तो संविधान वाचविण्यासाठी सुद्धा

या सरकारी कर्मचाऱ्यांकडून दिसायला हवा.संविधानाच्या नियमानुसार काम करणारी किमया सुद्धा घडायला हवी. प्रत्येकाच्या हक्क आणि अधिकारांवर गदा येत असेल तर पहिले आपण आपले संविधान वाचविले पाहिजे.यासाठी संघर्ष उभा राहिला पाहिजे. कारण संविधान वाचले तरच हे हक्क आणि अधिकार अबाधित राहू शकतात.इथे प्रत्येक जण स्वतःचेच अधिकार पाहत बसले तर हा संघर्ष फक्त मर्यादित स्वरूपाचा राहील. खाजगीकरण होतय, संविधानाचे उल्लंघन होतय असे जर फक्त स्वतःच्या हक्क आणि अधिकारा पुरतेच वाटून घेणार असाल तर हे फक्त स्वतःचे हित पाहिल्या सारखे होईल. तुलनात्मक दृष्टीने कुणाला किती पेंशन मिळते. हेच सध्या सूरु आहे.त्यांना पेंशन मिळत असेल तर आम्हाला का नको ? देशात कोणाला पेंशन मिळाली पाहिजे ? कोणाला नाही मिळाली पाहिजे ? असे अनेक मुद्दे सोशल मीडियातून येऊ लागलेले आहेत.समर्थन आणि विरोध या दोन्ही गोष्टी घडत आहेत. एकमेकांना तोडीस तोड उत्तर देण्यासाठी शहाणे, अतिशहाणे हे शब्द प्रयोग सुद्धा वापरले जात आहेत. शाब्दिक हल्ले आणि प्रतिहल्ले सुरू असल्याने अनेकांच्या मनात सुद्धा रोष निर्माण होऊ लागला आहे.या देशात लोकशाही आहे.त्यामुळे प्रत्येकाला स्वतःचे मत मांडण्याचा अधिकारच आहे. हे लोकशाहीचे मूल्य अजिबात नाकारता येणार नाही. परंतु ज्या लोकशाहीस भारतीय




संविधानाने समृद्ध केलेले आहे.त्या संविधानास अनुसरून वागण्याची मानसिकता कधी तयार होणार आहे. आम्ही सरकारी कर्मचारी म्हणून खरच भारतीय संविधानास अनुसरून वागतो का ? भारतीय संविधानाची अंमलबजावणी होण्यासाठी हे सरकारी कर्मचारी प्रयत्न करतात तरी किती ? संविधानामुळे आपण आहोत याची जाणिव इथल्या सरकारी कर्मचाऱ्यांना अजिबातच नाही. काही मोजके सरकारी कर्मचारी व अधिकारी असू शकतात की त्यांना हे संविधान आहे म्हणूनच आपल्याला या संविधानाप्रति कार्य करावे लागेल.त्यानुसार आपला कारभार पुढे आला पाहिजे.संविधान हे धोक्यात आहे.

यासाठी विविध सामाजिक व राजकीय संघटना आंदोलने करत असतात.परंतु सरकारी कर्मचारी मात्र भारतीय संविधानाच्या संरक्षणासाठी अजिबात रस्त्यावर उतरताना दिसणार नाहीत. स्वतःच्या हक्क आणि अधिकार धोक्यात आले की रस्त्यावर यायचे. हेच मुळात सरकारी कर्मचाऱ्यांना न शोभणारे आहे. तुम्ही जनतेचे खरे सेवक आहात. परंतू जनतेची सेवा करत असताना असे अनेक कर्मचारी आपल्याला पाहायला मिळत असतात की ते सर्वसामान्य जनतेचे काम वेळेत करून देणार नाही. वारंवार हेलपाटे मारायला भाग पाडत असतात. सरकारी कर्मचारी हा इथल्या शासन व प्रशासन व्यवस्थेतील महत्वाचा घटक आहे.या दोन्हीचा मेळ साधून जनतेला आवश्यक असणाऱ्या सेवा पुरविण्याचे कार्य करत असतो.आज सरकारी कर्मचारी जुन्या पेंशनच्या अनुषंगाने आपले अधिकार घेण्यासाठी मैदानात जणू एखाद्या योद्धा प्रमाणे उतरलेले आहेत. हेच योद्धे कोरोना काळात जीवाची बाजी लावून काम करत होते. हे सर्वांना ज्ञात आहे. त्यामुळे या कार्याबद्दल कायमच कौतुक केले जाईल. परंतु आज ज्या पध्दतीने सरकारी कर्मचाऱ्यांकडून जुनी पेंशन लागू करण्यासाठी जो आंदोलनाचा बडगा उगारला गेला आहे. तेच आंदोलन संविधान बचावासाठी का केले जात नाही ? आज जुन्या पेंशन वरून सरकारी कर्मचाऱ्यांना संविधान आठवत असून संविधानिक भाषा सुद्धा पुढे येत आहे. परंतू आजही जे संविधानात नाही जे जे संविधानविरोधी या देशात घडत आहे.त्या विरोधात मात्र संघर्ष उभा होत नाही. सरकारी कार्यालयात अनेक चुकीच्या गोष्टी घडत असतात. सर्वसामान्य जनतेवर हेच सरकारी कार्यालये अन्याय करत असतात.वेळच्या वेळेला लोकांची कामे केली जात नाहीत.संविधान म्हणून संविधानाच्या नियमानुसार इथले सरकारी कर्मचारी व अधिकारी वर्ग स्वतःच स्वतःचे नियम लावून मोकळे होत असतात.संविधानाची पायमल्ली करण्याचे कामच मुळात या सरकारी कर्मचाऱ्यांकडून होत असते. हे संविधान घटनाकारांनी खूप विचार करुन तयार केले आहे.सरकारी कर्मचारी म्हणून विविध सवलती आणि एक चांगला दर्जा मिळवून देण्याचे कार्य पार पाडत आहे.संविधान आहे म्हणूनच हे कर्मचारी मैदानात उतरून न्याय मिळवुन घेण्यासाठी झटत आहे.संविधाना मुळेच हे शक्य आहे.परंतू हे संविधान सोई नुसार जेव्हा गरजच पडेल तेव्हाच त्याचा जयघोष करत बसायचे.हे योग्य नाही.आज जुनी पेंशन म्हणून तुम्ही स्वतःचाच विचार करू नका.तर इथे सर्वसामान्य जनतेला आपण ज्या ज्या ठिकाणी सरकारी कर्मचारी म्हणून कार्यरत आहात. तिथे आपले काम प्रामाणिक पणे व संविधानास अनुसरून करण्यासाठी प्रयत्नशील राहणे गरजेचे आहे.जे संविधान आपल्याला आपले हक्क अधिकार देत आहे.त्या संविधानासाठी सरकारी

कर्मचाऱ्यांकडून आपला संघर्ष उभा राहणार आहे की नाही. असा सवाल उपस्थित होऊ लागला आहे.सरकारी कर्मचारी वर्ग हा वारंवार संविधानाचे उल्लंघन करत आलेला आहे. आज देशाचे संविधान हे इथल्या सरकारी कर्मचारी वर्ग आणि अधिकारी वर्गांमुळे धोक्यात आलेले आहे.राजकिय यंत्रणा आणि प्रशासकीय अधिकारी यांचे ऋणानुबंध एकमेकांना सांभाळून घेणारे असल्याने हे स्वतःला आपण संविधान असल्याचे समजू लागलेले आहेत.

सरकारी कर्मचाऱ्यांना व अधिकाऱ्यांना हे चुकीचे सुरू आहे.हे संविधानाच्या विरोधात हे सर्व माहीत असून सुद्धा त्या विरोधात बोलण्याची हिंमत दाखविले जात नाही.तुमचे अधिकार मिळवायचे असेल तर संविधान वाचविण्यासाठी सुद्धा रोजच्या कामातील सेवेतून प्रामाणिकपणा यायला हवा.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

# मानवमुक्तीचा सत्याग्रह

आधुनिक केसरी

**२० मार्च हा दिवस भारताच्या सामाजिक इतिहासाला कलाटणी देणारा दिवस आहे. कारण याच दिवशी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी रायगड जिल्ह्यातील महाड येथील चवदार तळ्यावर अस्पृश्यांना पाणी घेता यावे म्हणून सत्याग्रह केला. हा महाडचा सत्याग्रह, चवदार तळ्याचा सत्याग्रह किंवा मानव मुक्तीचा सत्याग्रह म्हणून ओळखला जातो. म्हणूनच २० मार्च हा दिवस भारतात सामाजिक सबलीकरण दिन म्हणून साजरा केला जातो. हा सत्याग्रह फक्त महाराष्ट्रालाच नाही तर जगाला प्रेरणा देणारा ठरला. पाणी ही नैसर्गिक संपत्ती आहे.**

तिच्यावर सर्वांचा समान हक्क असताना त्या काळच्या जातीय व्यवस्थेने मुख्य स्रोतातून पाणी घेण्यास व रस्त्यावरुन जाण्यासही अस्पृश्यांना बंदी घातली. ४ ऑगस्ट १९२३ साली ब्राह्मणेतर पक्षाचे नेते सी के बोले यांनी मुंबई कायदे मंडळात एक कायदा पास करुन घेतला. त्यानुसार सरकारी खर्चाने बांधलेल्या व सुस्थितीत असलेल्या मालमत्तेवर म्हणजे पाणवठे, धर्मशाळा, बगीचे यावर सर्वांचाच म्हणजे अस्पृश्यांचा देखील अधिकार असेल. जानेवारी १९२४ साली महाडच्या नगरपालिकेने या कायद्याची अंमलबजावणी करण्याचा ठराव केला. या ठरावानुसार नगरपालिकेने महाडचे चवदार तळे अस्पृश्यांसाठी खुले केल्याचे जाहीर केले. परंतु स्पृश्यांनी अस्पृश्यांना या तळ्यातून पाणी भरू दिले नाही. त्यामुळे अस्पृश्यांमध्ये धाडस आणि आत्मविश्वास निर्माण करू देण्यासाठी व त्यांचा हक्क त्यांना मिळवून देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चवदार तळ्यातील पाण्यासाठी सत्याग्रह करण्याचे ठरवले. बाबासाहेबांनी १९ आणि २० मार्च या दिवशी महाडमधील कुलाबा येथे परिषद भरवली. या परिषदेचे अध्यक्ष स्वतः बाबासाहेब हे होते. या परिषदेस सुरेंद्र चिटणीस, संभाजी गायकवाड, अनंत चित्रे, रामचंद्र मोरे, गंगाधर पंत सहस्त्रबुद्धे हे दलितेतर व ब्राह्मण नेते उपस्थित होते. या परिषदेत अस्पृश्यतेचा धिक्कार करुन काही ठराव करण्यात आले ते असे

१ ) स्पृश्यांनी अस्पृश्यांना आपल्या नोकरीत ठेवावे.
२ ) स्पृश्य लोकांनी अस्पृश्य लोकांचे नागरिकत्वाचे अधिकार मान्य करावेत. ३ ) मृत जनावरे ज्याची त्याने ओढवित
४ ) स्पृश्यांनी अस्पृश्य विद्यार्थ्यांना वार लावून जेवण द्यावे.

याच परिषदेत असेही ठरले की सर्वांनी दुसऱ्या दिवशी म्हणजे २० मार्च रोजी महाडच्या चवदार तळ्यातील पाणी प्यावे. त्यानुसार दुसऱ्या दिवशी परिषदेस उपस्थित असणारे सर्व नेते व परिषदेस आलेले सर्व जण चवदार तळ्यावर गेले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वप्रथम या तळ्यातील पाणी ओंजळीने प्यायले. त्यावेळी स्त्री पुरुष ५००० लोक या परिषदेस व त्यानंतर चवदार तळ्यावर पाणी पिण्यासाठी आले. त्यातील पुरुष हे हातात काठी घेऊन आले होते. हातात काठी म्हणजे महार जातीच्या पुरुषाचे चिन्ह होते. चवदार तळ्याचे पाणी पिऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांना मुक्तीचा मार्ग दाखवला. पण, ही मानवतावादी घटना रूढीवादी स्पृश्य हिंदूंना सहन झाली नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर सरकारी बंगल्यात परत गेल्यावर जातीयवादी, सनातनी विचारांच्या लोकांनी गावात अफवा उठवली की, चवदार तळे बाटवल्यानंतर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील जमाव विश्वेवश्वराच्या मंदिरात जाऊन मंदिरही बाटवणार आहेत. धर्म धोक्यात आल्याचे उच्चवर्णीय, सनातनी हिंदूंनी गावभर पसरवले त्यातून जातीयवादी उच्च हिंदूंचा एक घोळका हत्यारे, लाठ्याकाठ्या घेऊन सभास्थानी आला. त्यांनी सभेनंतर गावाकडे जाण्यापूर्वी जेवण करीत असणाऱ्या अस्पृश्यांना मारहाण केली. त्यांच्या जेवणात माती मिसळली. विश्वेवश्वराच्या मंदिरात प्रवेश करण्याचा कट रचला आहे अशी अफवा उठवल्यामुळे गावातील सनातनी हिंदूंनी सत्याग्रहासाठी आलेल्या लोकांवर हिंसा केली. परंतु , अहिंसा हे तत्व मानणाऱ्या आंबेडकरांनी अस्पृश्य सत्याग्रहींना सनानती हिंदूंविरुद्ध हिंसा करु नका असा आदेश दिला होता, त्यामुळे एव्हढी हिंसा होऊनही आणि प्रत्यक्षात स्थानिकांपेक्षा संख्येने जास्त असूनही काठीधारी अस्पृश्यांनी संयम बाळगला. अस्पृश्यांनी तळे बाटवले म्हणून सनातनी, जातीयवादी हिंदूंनी गोमूत्र टाकून ब्राह्मणांकडून तळ्याचे शुद्धीकरण करुन घेतले. पुढे महाडच्या नगरपालिकेने स्थानिकांच्या दबावाला बळी पडून अस्पृश्यांना चवदार तळे खुले करण्याचा ठरावही रद्द केला. त्यामुळे बाबासाहेबांनी २५ आणि २६ डिसेंबर रोजी रोजी महाड येथे परिषद घेण्याचे ठरवले. या परिषदेचा उद्देश स्पष्ट करताना डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, आतापर्यंत आम्ही या तळ्याचे पाणी पिऊ शकलो नाही किंबहुना आम्हाला पिऊ दिले नाही, आता आम्ही या तळ्याचे पाणी प्यायलो म्हणजे आमचे सर्व दुःख नष्ट होईल, आमची सर्व परिस्थिती सुधारेल, आमच्यावरील अन्याय कमी होईल असे काही नाही. हा सत्याग्रह म्हणजे केवळ एका मानवाने दुसऱ्या मानवाला समानतेने कसे वागवावे हे सांगण्याचा व सर्व मानवाला समानतेचा अधिकार आहे हे दाखवण्याचा प्रयत्न आहे. समतेची मुहूर्तमेढ रोवण्यासाठी जगाच्या पाठीवर पिण्याच्या पाण्यासाठी केलेला हा एकमेव सत्याग्रह आहे म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली झालेला हा सत्याग्रह मानव मुक्तीचा सत्याग्रह म्हणून ओळखला जातो.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# लालपरीचे आजारपण अन् प्रवासी वर्गाची धडधड

## रस्त्यावर बिघाड, प्रवाशांना ठरतेय डोकेदुखी ! ५०टक्के महिला बस भाडे सवलतीचे काय होणार ?

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**दिंडोरी :** ग्रामीण भागातील बऱ्याच रस्त्यावर एसटी बस म्हणजे लालपरीचे बिघाड होणे म्हणजे बसप्रवासी वर्गासाठी डोके दुखणंच म्हणावे लागले. त्यामुळे प्रवासी वर्गाचे होणारे हाल शब्दात वर्णन करणे म्हणजे अवघड होय. ग्रामीण भागातील रस्त्यावर डौलदार स्वरूपात फिरणारी लालपरी सध्या अनेक ठिकाणी रस्त्यावर, बंद पडलेल्या स्थितीत पाहायला मिळत असल्याने प्रवासी वर्गाची न घर का न घाट अशी सध्या अनेक ठिकाणी दिसत आहे.

एसटी बसचा प्रवास पूर्वी नागरिक आनंदाने करीत असत. परंतु सध्या ब-याच आगारांतील बस या जुन्या झालेल्या असल्याने या बस रस्त्यावरून प्रवास करतांना कुठेतरी मध्येच बिघाड बंद होतात. व प्रवासी वर्गाला पर्यायाने दुसऱ्या वाहनांनी आपल्या नियोजित गावांला पोहचावे लागते. त्यामुळे अनेकांच्या महत्त्वाचे कामे, विवाह, ड्युटी, यावर वेळेवर पोहचता



येत नाही. नोकरदार, कामगार , विद्यार्थी , ग्रामीण भागातील मजूर कामांनिमित्ताने बाहेर पडत असतात. त्यामध्ये बहुतांशी कामगार बसचा प्रवास करण्यावर पसंती देतात. आनंदायी प्रवास म्हणून बसचा मोठ्या प्रमाणावर कामगारांचा प्रवास आहे.परंतु कोरोना कालखंडात बसचा प्रवास बंद झाल्यामुळे बहुतेक बस या विना प्रवास आगारांमध्ये जास्त कालखंडामध्ये जागेवर उभ्या होत्या.त्यामुळे अनेक बसमधील मशीन मध्ये खराबी, टायर जीर्ण, वायरिंग समस्या या मागील कालखंडापासून भेडसवत आहे. आदी समस्यांमुळे चालक, वाहक, प्रवासी यांची डोके दुःखी वाढली होती. रस्त्यावर बसमध्ये बिघाड झाला की सर्व प्रवासी खाली उतरतात व पर्यायी व्यवस्था म्हणून बस चालक व वाहक यांना दुसऱ्या बसला हात दाखवून उभे करून प्रवासी वर्गाची पुढील प्रवासांची सोय करावी लागते. बसमध्ये प्रवासी वर्गाची संख्या ठराविक केलेली असल्याने काही प्रवासांना जागा न मिळाल्याने रस्त्यावर ताटकळत उभे राहावे लागते. त्यामुळे अर्धादिवस हजेरी वर समाधान मानावे लागते. सध्या बहुतेक ठिकाणी अवकाळी पावसाचे वातावरण असल्याने बसमध्ये रस्त्यावर बिघाड झाल्यास प्रवासी वर्गाला जीवमुठीत घेऊन रस्त्यांच्या कडेला उभे राहावे लागते व मोठ्या प्रमाणावर संकटांचा सामना करावा लागतो. तेव्हा आगारांतुन बस प्रवासांला निघण्यापूर्वी तिचे संपूर्ण परिक्षण करून ती बस प्रवासांसाठी सज्ज करावी. ही मागणी प्रवासी वर्गातुन होत आहे.त्यामुळे प्रवासी वर्गाची हाल थांबेल.

सध्या शासनाने महिला प्रवासी वर्गासाठी पन्नास टक्के भाड्यांमध्ये सवलत दिल्याने सध्या बसमध्ये पुरुष वर्गापेक्षा महिला प्रवासी वर्गाची संख्या बसमध्ये मोठ्या प्रमाणावर दिसत आहे . त्यामुळे रस्त्यात जर ऐनवेळी बसमध्ये बिघाड झाल्यास महिला प्रवासी वर्गाला एकप्रकारे संकटमय काळ निर्माण होतो .

एका बाजूला महिला साठी पन्नास टक्के भाडे सवलत व दुसऱ्या बाजूला बसमध्ये बिघाड झाल्यास तासोंतास रस्त्यावर ताटकळत उभे राहाण्याची नामुष्की . हे समीकरण जुळवितांना प्रवासी वर्गाचा बसचा प्रवास कसा आहे . यावर शासनाने विचार करून याबाबत विचार करणे गरजेचे आहे .

-------------------------

महिलांसाठी पन्नास टक्के भाडे सवलत या निर्णयांचे स्वागत केले ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणावर केले जात असतांना रस्त्यावर जर बसमध्ये ऐनवेळी बिघाड झाल्यास महिला सुरक्षेचे काय ? यामुळे अनेकांच्या भुवया उंचवल्या गेल्या आहे .

**ज्योती देशमुख ( माजी सरपंच, लखमापुर ता .दिंडोरी )**

# पिशोर परिसरात गारांचा पाऊस..!!

## कृषि मंत्री अब्दुल सत्तार यांची पिशोर येथील नुकसानग्रस्त भागाची पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**सय्यद आरेफ़**

**पिशोर :** तालुक्यातील पिशोर व परिसरात शनिवार रोजी . भरदुपारी गारांच्या अवकाळी पावसाने शेतकरी हतबल झाला आहे, गहु मका, उस आदीसह पिके आडवी झाली आहे. आधीच खरिपातील पिकांना भाव मिळत नसल्याने आर्थिक शेतकरी संकटात सापडला होता. यात पुन्हा अवकाळी पाऊस व गारपिट मुळे हातातोंडाशी आलेले पिके आडवी झाल्याने शेतकरी पुन्हा हतबल झाला आहे . शासनाने पिशोर, वासडी, हस्ता भिलदरी, पळशी ,रामनगर, साखरवेल, मोहन्द्री या गावासह परिसरतील नुकसानीचे सरसकट पंचनामा करून नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली या बाबत सविस्तर माहिती अशी आहे की, कन्नड तालुक्यातील पिशोर परिसरात शनिवारी गारांसह जवळपास अर्धातास तड़ तड़ पाऊस पडल्याने रब्बी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे . भर दुपारी हे आस्मानी संकट आल्याने शेतकरी हतबल होऊन चिंतातुर झाला आहेत, शासनाने तत्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकरी करीत आहेत . परिसरातील पिशोर, बाळखेडा दिगर , शफेपूर , खडकी , रामनगर , साखरबेल पळशी , वासडी , कोळंची मांजरा , भारंबा बाडी , तांडा भारंबा , शफियाबाद , भिलदरी , मोहंद्री , आदीसह परिसरात शनिवारी सुमारे अर्धा तास अवकाळी पाऊसासह गारपीट झाल्याने शेतातील उभी पिके आडवी झाल्याने रब्बी पिकांचे मोठे नुकसान झाले



शनिवार रोजी झालेल्या गारपिट मुळे मंडळात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले राज्याचे कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनी नुकसान ग्रस्थ भागात जाऊंन शेतकरयांची भेट घेत झालेल्या नुकसानाची पाहणी करून तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश दिले . यावेळी तालुका कृषी अधिकारी श्री बालराजे मुळीक ,जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन नितीन पाटील , जिल्हा दूध संघाचे संचालक पुंडलिकराव काजे, संचालक मनोज राठोड, सप्नील घुगे, देवमन घुगे, कारभारी खूर्दे, अर्जुन काळे, ज्ञानेश्वर ताठे, यांच्यासह शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते .

आहे . अनेक शेतकऱ्यांनाचा गहू , मका , कांदे , हरभरा या सह पिकांना गारपीट मुळे मोठा नुकसान झाल्याचे चिंत्र पहावयास मिळत आहे. परिसरात शनिवारी दुपारी झालेल्या अवकाळी गारपिटीच्या पावसाने बळीराजाचे मोठे नुकसान झाले आहे . विशेषतः खातखेडा परिसरात मात्र अक्षरश : निसर्गराजा जणूकाही कोपल्याचेच दृष्य दिसून आले . यात हातातोंडाशी आलेले पीक नजरेसमोर होत्याचे नव्हते झाले . निसर्ग कोपल्याने शेतकरी हतबल झाला आहे . त्यामुळे कशी नशिबाने नुकसानिचा खेळ मांडला... असे म्हणण्याची वेळ आली आहे , आली आहे . सर्व प्रथम मोठ्या पिकाना फटका बसला आहे . पिशोर परिसरात शनिवार रोजी दुपारी अडीच बाजे दरम्यान ढगांच्या गडगडाटात अवकाळी पावसाला व गारपीटीला सुरुवात झाली . यामुळे शेतशिवारात शेतकऱ्यांची एकच पाचपळ उडाली . गारापासून वाचण्यासाठी जो - तो आसरा शोधत होता . सोबत गारा पड़त असल्याने शेतातील मका , गह , कांदा , मिरची, ज्वारी , बाजरी , हरभरा , रब्बी पिकांचे प्रचंड नुकसान झाले, ह्या गारा दगड़ा सारख्या पड़त असल्याने ओपन शेत शिवार असल्याने अनेकांना गाराचा मार ही बसला आहे, मात्र यातून काहि हानी झाली नसल्याचे दिसत आहे, पिशोर परिसरातील खातखेडा, पळशी येथे अवकाळीने अक्षरशः थैमान मांडले होते. या गाव परिसरातील शेतांमध्ये प्रचंड गारपीट झाली.

# मुंबईच्या कबड्डीपटूची १.७० लाखांची फसवणूक

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** विदर्भाच्या संघात निवडीचे आमिष दाखवून दोघा आरोपींनी मुंबईच्या एका कबड्डीपटूची १.७० लाखांनी फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी शहर कोतवाली पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला. जितेंद्रसिंग प्राणसिंग ठाकूर व भूपेंद्रसिंग प्राणसिंग ठाकूर ( दोघेही रा.पन्नालाल बगीचा ) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. तसेच स्वागत आनंदा शिंदे ( २५, रा. मुंबई ) असे तक्रारकर्त्या खेळाडूचे नाव आहे. स्वागत शिंदे हा जानेवारी २०२१ मध्ये मुंबईतच कबड्डीचा सराव करीत होता. त्यावेळी त्याच्या प्रशिक्षकाने जितेंद्र उर्फ जितू ठाकूर याची विदर्भ कबड्डी असोसिएशनचे सचिव या नात्याने ओळख करून दिली. त्यावेळी जितू ठाकूरने स्वागत शिंदे याच्या खेळाचे कौतुक करून त्याला विदर्भस्तरीय कबड्डी चमूमध्ये निवड करण्याचे आमिष दाखवले. त्यासाठी आपण १ लाख ७० हजार रुपये दिल्याचा उल्लेख स्वागतने तक्रारीत केला आहे. आरोपींनी स्वागत शिंदे याचा विश्वास संपादन केला. तुझे कबड्डी खेळण्याचे कौशल्य चांगले आहे. तू विदर्भाचा नसूनही तुझी विदर्भ कबड्डी संघात निवड करून देतो. त्यासाठी मात्र २ लाख रुपये द्यावे लागतील, तुला राष्ट्रीय स्पर्धेतही खेळण्याची संधी मिळेल, असे आरोपींनी सांगितले. त्यानंतर स्वागतने आपले वडील दोन लाख रुपये देण्यास तयार नाहीत, ते दीड लाख रुपये देऊ शकतात, असे आरोपींना सांगितले. आरोपीने बँकेच्या खात्यावर दीड लाख रुपये पाठविण्यास सांगितले. १७ मार्च २०२१ रोजी स्वागतच्या वडिलांनी ही रक्कम आरोपीच्या बँक खात्यात वळती केली. पण, काही दिवसांनी राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड समिती दीड लाख रुपयांमध्ये निवड करण्यास तयार नाही, आणखी पैसे हवेत, असे आरोपींनी सांगितल्यावर स्वागतच्या वडिलांनी पुन्हा २० हजार रुपये पाठवले. नंतर काही दिवसांनी आरोपींनी स्वागतला अयोध्या येथे आयोजित राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत खेळण्यासाठी पाठवले.

महाराष्ट्र Business Katta












# शुद्ध पाणी आणि जांभूळ

प्रत्येक व्यक्तीने आपल्या घरातील पाण्याच्या टाकीत जांभुळाच्या लाकडाचा तुकडा ठेवावा, त्यासाठी एक रुपयाही खर्च होत नाही आणि नफा म्हणजे नफाच. तुम्हाला फक्त जांभुळाचे लाकूड घरी आणायचे आहे आणि ते पूर्णपणे स्वच्छ करून पाण्याच्या टाकीत टाकायचे आहे. यानंतर तुम्हाला पाण्याची टाकी पुन्हा स्वच्छ करण्याची गरज भासणार नाही.

बोट, खूप कमकुवत असताना जांभुळाचे लाकूड तळाशी का ठेवतात माहीत आहे कां..?

भारतातील विविध नद्यांमध्ये प्रवाशांना एका किनाऱ्यावरून दुसऱ्या किनाऱ्यावर नेणाऱ्या बोटीच्या" तळाशी जांभळाचे लाकूड लावले जाते. जे जांभुळ पोटाच्या रुग्णांसाठी घरगुती आयुर्वेदिक औषध आहे, ज्याच्या लाकडाचा उपयोग दात जंतूमुक्त आणि मजबूत बनवण्यासाठी केला जातो, त्याच जांभुळाचे लाकूड बोटीच्या खालच्या पृष्ठभागावर का लावले जाते, हा प्रश्न आहे. तेही जेव्हा जांभुळाचे लाकूड खूप कमकुवत असते. जाड लाकूड हाताने तोडता येते. कारण नदीकाठी त्याच्या वापराने नद्यांचे पाणी पिण्यायोग्य राहते. खरे तर जांभुळाचे लाकूड हे चमत्कारिक लाकूड आहे हे फार कमी लोकांना माहीत आहे. पाण्याखाली असतांना ते खराब होत नाही. उलट त्यात चमत्कारिक गुण आहे. जर ते पाण्यात बुडवले तर ते पाणी शुद्ध करते आणि पाण्यात कचरा साचण्यास प्रतिबंध करते. ज्या पूर्वजांना आपण निरक्षर समजतो त्यांनी नद्या स्वच्छ ठेवण्यासाठी आणि नाव मजबूत ठेवण्यासाठी इतका प्रभावी आणि सोपा उपाय शोधला हे किती आश्चर्यकारक आहे. 700 वर्षांनंतरही विहिरीच्या पायथ्याशी जांभुळाचे लाकूड खराब झालेले नाही...



जांभूळाचे लाकडाच्या चमत्कारिक परिणामाचे पुरावे नुकतेच सापडले आहेत. देशाच्या राजधानीत वसलेल्या निजामुद्दीनच्या पायरीची विहीर साफ केली असता त्याच्या पायथ्याशी जांभुळाचे लाकडाची रचना आढळतात. भारतीय पुरातत्व विभागाचे प्रमुख श्री केएन श्रीवास्तव यांनी सांगितले की, संपूर्ण पायरी जांभळाच्या लाकडी संरचनेच्या वर बांधण्यात आली होती. कदाचित त्यामुळेच 700 वर्षांनंतरही या पायरीचे पाणी गोड आहे आणि कोणत्याही प्रकारचा कचरा आणि घाण यामुळे या पायरीचे पाणी स्रोत बंद झालेले नाहीत. तर 700 वर्षांपासून कोणीही स्वच्छता केली नव्हती. तुमच्या घरात जांभुळाचे लाकडाचा वापर...

जर तुम्ही तुमच्या छतावरील पाण्याच्या टाकीत जांभुळाचे लाकूड ठेवले तर तुमच्या पाण्यात शेवाळ कधीच बसणार नाही पाण्याचे शुद्धीकरण 700 वर्षे सुरू राहील. तुमच्या पाण्यात अतिरिक्त खनिजे सापडतील आणि त्याचा TDS शिल्लक राखला जाईल. म्हणजेच जांभूळ आपले रक्त शुद्ध करण्याबरोबरच नदीचे पाणीही शुद्ध करते आणि निसर्गही स्वच्छ ठेवते. कृपया नेहमी लक्षात ठेवा की जगातील सर्व राजे, राजेशाही आणि सध्याचे अब्जाधीश श्रेष्ठ जे त्यांच्या आरोग्याची काळजी घेतात. जांभुळाचे लाकडापासून बनवलेल्या ग्लासात पाणी पितात तुम्हीही बघाच उपयोग.

# ऋतूनुसार केले जाणारे पंचकर्म




आला वसंत ऋतु, करून घ्या वमन। या पंचकर्म प्रकाराने, होईल शरिराचे शोधन। आयुर्वेदाने शरीराच्या चिकित्सेसाठी २ प्रकारच्या चिकित्सापद्धती वर्णन केल्या आहेत... शोधन आणि शमन. यातल्या शोधन चिकित्सेला म्हणजेच शरीरात वाढलेल्या दोषांना काढून टाकण्याच्या वेगवेगळ्या पद्धतींना पंचकर्म असे संबोधले जाते. वमन, विरेचन, बस्तीकर्म,नस्य व रक्तमोक्षण. शमन चिकित्सा म्हणजे ओषधोपचार व पथ्यापथ्य. वमन हा उपक्रम शरीरातील दुष्ट कफ आणि पित्त या दोषांना उल्टी द्वारे शरीराबाहेर काढून , या दोन्ही दोषांच्या वाढलेल्या पातळीचे नियमन करण्याचे सर्वोत्तम माध्यम आहे. वमनाच्या आधी रुग्णाचे रीतसर परीक्षण करून प्रकृति व व्याधीनुसार ठराविक कालावधीसाठी घृतपान, नंतर सर्व शरीराला तेलाने अभ्यंग, औषधी वाफ इत्यादी सोपस्कार पूर्ण करून दुध, औषधी काढा यांच्या सहाय्याने मुख्य वमनकर्म करुन..संसर्जन कर्म केले जाते .

शरीरात वाढलेल्या कफाचे रुपांतर श्वासाचे विविध आजार जसे की, ऋतू बदलला की होणारा दमा, जुनाट सर्दी, ॲलर्जीची सर्दी, सायनुसायटीस, दीर्घकाळ टिकणारा खोकला, स्थौल्य, मधुमेह, तसेच पित्ताचे विविध विकार जसे की, आम्लपित्त, अपचन, तीव्र डोकेदुखी ( मायग्रेन ), विविध त्वचा विकार, केशविकार ( अकाली केस पांढरे होणे, केस गळणे ) इत्यादी असंख्य आजारांमध्ये होते. वाढलेले दोष शरीरात राहून जे त्रास निर्माण करतात त्यापेक्षा अतिशय कमी त्रासात वमन आणि विरेचनासारख्या पंचकर्मांनी शरीरशुद्धी साधली जाते, याचा तात्काळ परिणाम वजन, त्वचा, केस, पचन तसेच शारीरिक



लाघवता
(शरीर हलके वाटणे)
या स्वरुपात दिसून येतो. वर उल्लेखलेल्या आजारांमध्ये तर वमनाचा उत्तम उपयोग होतोच मात्र त्याशिवाय अनेक ठळक फायदे रुग्णाला अनुभवायला मिळतात. शरीराचे बल वाढणे, शरीराला आलेले जडत्व जाऊन हलकेपणा येणे, भूक वाढून पचनशक्ती सुधारणे, त्वचेची रुक्षता जाऊन त्वचा स्निग्ध होणे, वाढलेल्या वाताच्या परिणामी काळवंडलेला वर्ण सुधारणे, स्थूल व्यक्तीचे वजन कमी होणे, इ. असंख्य फायदे रुग्ण तात्काळ अनुभवायला लागतात.

आयुर्वेदाचा दृष्टिकोन उपचारांव्यतिरिक्त प्रतिबंधात्मक सुद्धा आहे. रोग होऊ नये, झालाच तर आजार बरा करून चिकित्सा करताना त्यांचे दुष्परिणाम होऊ नयेत, तसेच आजाराचा पुनरुद्भव या व्यापक उद्देशाने दिनचर्या, ऋतुचर्या इत्यादी वेळापत्रक कसे असावे, हा आयुर्वेदाचा विचार मोलाचा आहे. आयुर्वेद हे प्राचीनतम भारतीय वैद्यकशास्त्र तसेच आरोग्यसंपन्न दीर्घायुष्यासाठी आवश्यक पथ्यकर व हितकर आहार-आचार-विचार शैली वर्णन करणारे जीवनशास्त्र आहे. हजारो वर्षापेक्षा जास्त काळापासून अखंडित व अबाधित असे आयुर्वेदशास्त्र काळाच्या कसोटीवर खरे उतरले आहे, चला तर मग, आपले आरोग्य आयुर्वेदाच्या सहाय्याने सुखकर करुन निरोगी आयुष्य जगु या ।




**वै. ज्योती विनोद भाला**
**कि आयुर्वेद सोल्युशन्स व केरलीयन पंचकर्म सेंटर, ( मल्टिस्पेशालिटी आयुर्वेद हॉस्पीटल )**
**छत्रपती कॉलेज जवळ, एन-3, सिडको, छ. संभाजीनगर**
**मो. नं. 9422476633**
**(0240) 2476633**


# लैंगिक अज्ञानामुळे येणारा मानसिक तणाव

गेल्या 35 वर्षांत 2 लाख ५ हजार काम समस्यांसंबंधी रुग्णांवर औषधोपचार करुन त्याचे रोग दूर करण्यात मी सुदैवाने यशस्वी झालो. तसेच हजारो पत्रांची उत्तरे दिलीत. हजारो लोकांची वेगवेगळी काम समस्या आढळुन आली. व्यक्ती तितक्या प्रकृती, आज आधुनिक काळात अनेक प्रसारांची माध्यमे आहेत. रेडिओ, टिव्ही, इंटरनेट, व्हिडीओ, चित्रपट, वृत्तपत्रे, मासिके इ., तरी अजुनही हजारो लोकांत कामशास्त्राबद्दल अज्ञान आहे. अनेक रुग्णांची पत्र वाचुन असे आढळुन आले की, आज्ञानामुळे अनेक समस्या निर्माण होतात. अज्ञान, भिती, गैरसमज यामुळे त्यांचे जीवन अशांत, दुःखी, कष्टदायक आहेत. रक्त निघाले पाहिले. जर निघाले नाही तर मुलगी अपवित्र आहे व आपली फसवणूक झालेली आहे. असा चुकीचा विचार नवरदेव करतो. खरं म्हणजे आजकाल मुली वेगवेगळ्या खेळांमध्ये भाग घेतात, पोहायला जातात. सायकल चालवतात, त्यामुळे शरीरातील पडदा फाटतो म्हणुन पहिल्या संभोगाच्या वेळी रक्त निघालेच पाहिजे असे आवश्यक नाही. अनेक चांगल्या संस्कारात वाढलेल्या मुलींना वाटते की, नुसते चुंबने घेतले असल्याने गर्भधारणा होते.

एक चांगल्या सुशिक्षित जोडप्याला पंधरा वर्षामध्ये मुल बाळ झाले नाही. दोघांचीही सर्व तपासणी / चाचण्या नॉर्मल येत होत्या. नव-याने दुसरी बायको केली. दुस-या बायकोला पहिल्याच वर्षी बाळ झाले. हे सिध्द झाले की, दोष पुरुषात नाही, पहिल्या बायकोने पुन्हा उपचार सुरु केले. सर्व तपासण्या नॉर्मलही आहेत. मग मी त्यांना विचारले की, संबंध झाल्यावर बिर्य बाहेर येते काय ? तीने सांगितले लघवी करून स्वच्छ करून घेते, सुरुवात केली तेव्हा तिच्या मनात नव-या विषयी घृणा निर्माण झाली व सकाळी तिने आत्महत्या केली. तिने एक चिठ्ठी लिहून ठेवली की, नव-याने माझ्यासोबत फार घाणरेडे प्रकार केले. माझ्या ध्यानीमनी नव्हते. नसता मी लग्नच केले नसते. अशा घाणरेडया कामासाठी लग्न करतात का ? पती हा परमेश्वर असतो, त्याची पुजा केली असती पण त्याने असे घाणरेडे कृत्य केले, त्यामुळे शरीर अपवित्र झाले, असे अपवित्र शरीर घेवुन मी कसे जगु, आई वडिलांना मी कसे तोंड दाखवू म्हणुन मी आत्महत्या करत आहे. हया मुलीला जर तिच्या आईने पहिल्या रात्री थोडी कल्पना दिली असती तर असे घडले नसते,

इतक्या आधुनिक काळात सुध्दा अशा मुली व अशी मुल असतात, हे पाहुन मन थक्क होते, दुःख होते, म्हणून वाटते की, काम विषयक जागृती लोकांत करावी. लैंगिक शिक्षण असावे, त्या विषयाचे ज्ञान असावे. काही वयस्कर पुरुषांना सुध्दा अज्ञानामुळे काही संबंध करण्यास वेळ नसतो. कुठे बाहेर हिंडाफिरायला जायलाही तो वेळ काढू शकत नाही. रात्रीसुध्दा घरी उशीरा येणे, बिझनेस, पार्टी, ऑफिशिअल ओल्या पार्टी असतात. रात्री उशीरा येऊन थकून पती महाशय लगेच झोपी जातात. पत्नीही मग मन मारुन झोपी जाते. पुरुषांची पुर्ण करमणुक दिवसा झालेली असते.

काही पुरुष बाहेर अनैतिक संबंध ठेवतात, घरी सुंदर सुशिल, सभ्य, शिकलेली पत्नी असली तर तिची किंमत घर की मुर्गी दाल बराबर सारखी झालेली असते. पती घरी पत्नीशी आठ पंधरा दिवसातुन एखादे वेळेस संबंध करतो, मग लगेच एक दोन मिनिटात थंड होतो. परत पत्नीची इच्छा अपुरी राहते. त्यामुळे काही स्त्रियांना हातपाय दुखणे, पांढरे पदर जाणे, चिडचिड स्वभाव होतो. असे त्रास होतात, अशा ठिकाणी काही स्त्रिया असेल, त्यावरून भांडणे होतात, बेबनाव होतो. काही ठिकाणी समस्या सोडविण्यापुर्वीच घटस्फोट होतात.

काही ठिकाणी उलट होत असते. पुरुषाचा स्वभाव फार प्रेमळ असतो. संबंधासाठी पतीला जागृत करतो पण पत्नी थंड असते. काही स्त्रियांना काम औदासिन्य असते, म्हणजे समागमात रस नसणे, योनी आकर्ष अशा समस्या असतात. त्या समस्याही तज्ञांचा सल्ला घेऊन दुर करता येतात.

जर अशा समस्या दुर झाल्या नाहीत तर पुरुष बाहेर जातो. त्याला घरी पुर्ण सुख भेटत नाही. त्याला वाटते आपण बळजबरी बलात्कार करतो किंवा पत्नी आपल्याला पसंत करीत नाही. आपल्यातच काही कमतरता आहे. त्याला असाही गैरसमज होऊ शकतो की पत्नी परपुरुषांकडुन तृप्ती करुन घेत असेल, म्हणुन अशा गोष्टीकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. वेळीच उपचार करुन घेतले पाहिजे. व्देष भांडण असेल तर संभोग चांगला होत नाही. काही वेळेस पुरुष एखाद्या आजाराने त्रस्त असेल, त्याचे औषधोपचार चालु असतील तर अशा वेळेस सुध्दा संभोग चांगला होत नाही. काहींना संभोगाच्या वेळी आपल्या पत्नीला पीडा त्रास देण्याची सवय असते, काहीना पशुं प्रमाणे आसक्ती असते, काहींना समलिंगी संभोगाची सवय असते. अशा मनोरुग्णांना मनसोपचार तज्ञाला दाखवयाला पाहिजे.

माझ्या मते कामशास्त्रानुसार आपले संपूर्ण शरीरा रोग, व्देष भांडण असेल तर संभोग चांगला होत नाही. काही वेळेस पुरुष एखादया आजाराने त्रस्त असेल, त्याचे औषधोपचार चालु असतील तर अशा वेळेस सुध्दा संभोग चांगला होत नाही. काहींना संभोगाच्या वेळी आपल्या सोबतीला पीडा त्रास देण्याची सवय असते, काहीना पशुं प्रमाणे आसक्ती असते, समलिंगी संभोगाची सवय असते. अशा मनोरुग्णांना मानसोपचार तज्ञाला दाखवयाला पाहिजे.

आजच्या आधुनिक इंटरनेटच्या काळात ८० टक्के पुरुषांना खास करुन तरुण मुलांना अशी शंका असते की, आपले इंद्रिय इतरापेक्षा लहान आहे. ते आपण मोठे केले पाहिजे. त्यासाठी काही आधुनिकतेच्या नावाखाली, जाहिराती पाहुन इंद्रिय मोठे करण्याचे तंत्र वापरतात ते नेहमी चिंतेत असतात. एखादया प्रसाधनगृहामध्ये लघु शंका करतांना दुस-यांच्या भारतात पुरुषांच्या इंद्रियाची लांबी ताठर अवस्थेत सरासरी चार इंच असते. तसेच काहींची थोडी कमी किंवा थोडी जास्त असु शकते.

महत्त्वाच्या तपासण्या :

रक्तातील हिमोग्रोबिन, शुगर, हार्मोन्स ( सिरम एफ. एसएए टेस्टोस्टेरोन व प्रोलेक्टिन ) कोलेस्टेरोल इ. लिंगाचे व अंडाशयाचे कलर डॉपुर ज्यामुळे व्हेरिकोसील या आजाराचे निदान होते.

**उपाय :** जीवनशैली बदलणे, योगा, प्राणायाम, नियमित चालणे, वजन कमी करणे, व्यसने कमी करणे, तणाव कमी करणे, हा प्राथमिक उपचार मेडिकल लाईन ऑफ ट्रीटमेंट ( औषधे, गोळ्या, मलम इ. )

सिल्डेनाफील ( व्हियाग्रा ) या बद्दल सर्वांना माहीत असेलच पण तज्ज्ञ युरॉलॉजिस्ट, अण्ड्रोलॉजिस्ट व सेक्सॉलॉजिस्टच्या सल्याशिवाय या गोळ्या घेऊ नयेत. प्रत्येक व्यक्तीचा डोस हा वेगवेगळा असल्याने सल्ला घेऊनच या गोळ्या घ्याव्यात. सध्याच्या बाजारात विविध प्रकारच्या गोळ्या उपलब्ध आहेत. मात्र डॉक्टरांच्या सल्याशिवाय कोणत्याही गोळ्या घेऊ नयेत.





**डॉ. ए. एच. शेख,**
**औरंगाबाद - ४३१००५,**
**फोन नं. (०२४०) २३५००४२**





# उज्ज्वल भविष्यासाठी आयुर्वेदीय गर्भसंस्कार



आयुर्वेद.. आयुष : वेद :|| म्हणजे आयुर्वेद, अशा आयुर्वेदाची साधना करायचे भाग्य लाभले हे कर्म फलित असावे कारण आयुर्वेदिक डॉक्टर होण्यासाठी आपले पूर्वजन्मीचे चांगले कर्म असावे लागतात म्हणून ईश्वर म्हणा की, निसर्ग म्हणा, विज्ञान म्हणा अथवा तुमचा law of attraction म्हणा आपल्याला या सेवा कार्यासाठी निवडतो असं म्हणायला हरकत नाही. या क्षेत्रात practice करून 20 वर्ष होतात शिक्षण घेत असताना पासूनचा काळ आणि आयुर्वेदाचे अनुभव यावर आपण आज प्रकाशझोतात याव्यात अशा गोष्टी निदर्शनास आणूया. आयुर्वेदिक डॉक्टर म्हणून प्रॅक्टिस करताना नियतीने ठरविले, जे अनुभव आले त्याप्रमाणे प्रवास तर सुरू होताच, पण काही अनपेक्षित असे रिझल्ट्स जेव्हा डोळ्यासमोर पाहिले तेव्हा विश्वास बसला की आयुर्वेदामध्ये ती ताकद आहे त्याला तुम्ही मॅजिक म्हणू शकता त्याला तुम्ही शुद्ध आयुर्वेदाचा निसर्ग म्हणू शकता किंवा तुमची आयुर्वेदाबद्दलची श्रद्धा म्हणू शकता. सुरुवातीला आयुर्वेदिय गर्भसंस्कार या विषयावर ऑनलाइन सेशन्स घेण्यात आले, त्याचा अप्रतिम फीडबॅक मिळाला घरापासूनच केल्यामुळे बाहेर जगासमोर प्रॅक्टिस करण्यासाठी सोपं गेलं घरातील वेगवेगळे आजार आयुर्वेदाने मुळापासून दूर झाले, जावेला अपत्य प्राप्ती झाली ती आयुर्वेदामुळेच, निसर्गावर विश्वास ठेवल्यामुळे, पर्यायाने पंचकर्मामुळे, अशा या आयुर्वेदाचे मुळे घरात आधी सखोल रोवल्या गेली. मग सुरू झाला प्रवास हे आयुर्वेद जगासमोर आणण्याचा, सहज सोपे सरळ असे आयुर्वेद, ना काढा, ना चूर्ण, ना अधिक पथ्य, तुम्ही जसे जगत आहात त्यातच थोडे बदल करून, प्रत्येकाला सोईस्कर अशी आयुर्वेदिक जीवनशैली. प्रत्येकाने निरोगी राहण्यासाठी ही जीवनशैली अंगीकारणे गरजेचे आहे, आयुर्वेदामध्ये ऋतूनुसार , तुमच्या प्रकृतीनुसार, तुमच्या सवयीनुसार वयाच्या अवस्थेनुसार, निसर्गाच्या बदलत्या रूपानुसार, चिकित्सा केली जाते. तुम्हाला कुठलाही आजार होऊ नये म्हणून उपाययोजना ह्या केवळ आयुर्वेदामध्येच आढळतात, आणि आजार झाल्यावर तो मुळापासून दूर करण्याचे सामर्थ्य केवळ आयुर्वेदामध्येच..

" स्वस्थस्य स्वास्थ्यरक्षणम्, आतुर असते विकारप्रशमनम *|| " च. सू.30/26 *

हे आयुर्वेदाचे प्रयोजन स्वीकारायला हरकत नाही. मग पाहूया आयुर्वेदिक गर्भसंस्काराचा यासाठी कसा फायदा होतो, तर प्रामुख्याने आज परिस्थिती अशी आहे की नैसर्गिक गर्भधारणेपेक्षा इन्फर्टिलिटी चे प्रमाण वाढलेले दिसत आहे , आजकालची पिढी हे विसरून चालली आहे की नैसर्गिक गर्भधारणा राहू शकते स्वतःच्या चुकीच्या सवयी बदलण्याची, निसर्गासोबत चालण्याची, करियर एवढंच नात्यांना महत्त्व देण्याची, पैशापेक्षा भावनांना जपण्याची गरज आहे आणि हे सगळं आहे आयुर्वेदिक गर्भसंस्कारामध्ये.

प्रेग्नेंसी मध्ये प्राणायाम, योगा, ध्यानधारणा, ह्या गोष्टी तर महत्त्वाच्या आहेतच पण याही पुढे जाऊन त्या मातेला खंबीर बनवण्याची गरज आहे, नैसर्गिक रित्या ज्या गोष्टी शरीरात घडतात त्यांना स्वीकारण्याची ताकद देण्याची गरज आहे, आपल्या दिसण्यापेक्षा आपल्या असण्याला महत्त्व आहे हे पटण्याची गरज आहे. आणि हे सर्वज्ञान आयुर्वेदिक गर्भसंस्कारामध्ये आहे. आतापर्यंत मी बऱ्याच अशक्य अशा इन्फर्टिलिटीच्या केसेस यशस्वीरित्या हाताळण्याचे कौशल्य प्राप्त केले आहे तेही आयुर्वेदामुळेच... माझी पहिली केस जी अनपेक्षित रित्या बारा ते पंधरा वर्षाच्या गॅप नंतर तसेच टेस्ट ट्यूब बेबी करूनही अयशस्वी झाल्यानंतर केवळ आयुर्वेदिक उपचाराने आणि काउन्सिलिंगने गर्भधारणा राहण्यास यशस्वी झाली ... इथून मला कळलं की मी या क्षेत्रात नक्कीच उत्तम कार्य करू शकते, या समस्त स्त्रीवर्गाला आयुर्वेदामुळे एक आशेचा किरण प्राप्त झाला, मुळात आयुर्वेदिक गर्भसंस्कार हे त्या स्त्रीला आधी स्वतःला जगायला शिकवते, कारण मूल नंतर आधी स्वतः ती स्त्री सबला होणं गरजेचं आहे, आयुर्वेदामधील बीज शुद्धी, आचार रसायन , विशिष्ट आयुर्वेदिक औषधी द्रव्य, उत्कृष्ट अशी जीवनशैली या सर्व गोष्टींमुळे जे गर्भधारणा न राहण्यासाठीची कारणे आहेत ती दूर होण्यास मदत होते, आयुर्वेदात एक फार छान श्रेष्ठता वर्णन केलेले आहे ती म्हणजे " सौमनस्यजनानाम् गर्भधारणानाम् श्रेष्ठतमः|" च. सू. 25

म्हणजेच गर्भधारणा राहण्यामध्ये जर सर्वश्रेष्ठ गोष्ट कुठली असेल तर ती तुमचं प्रसन्न मन आणि हे प्रसन्न मन आयुर्वेदाच्या व्याख्येमध्येच वर्णिलेले आहे...

हिताहितं सुखं दुःखं , आयुः तस्य हिताहितम्|
मानम् च तच्च यत्रोक्तम् आयुर्वेदः स उच्चते || च. सू. १/४१ *

या अशा आयुर्वेदिक गर्भसंस्कारामध्ये तुम्हाला जीवन जगण्याची प्रेरणा मिळते, तुम्ही उठाव कधी..? तुम्ही झोपावं कधी..? तुम्ही बाळाशी काय गप्पा माराव्या..? तुम्ही कुठले व्यायाम करावे...? तुम्ही काय खावे? तुम्ही काय प्यावे? तुम्ही कुठले कपडे घालावे? तुम्ही कुठला आहार सेवन करावा आणि तुम्ही कुठली औषधी घ्यावीत? याचा सखोल अभ्यास आढळतो आणि हे सर्व ज्ञान पाच हजार वर्षांपूर्वीपासून वर्णन केले आहे. मी तर माझ्या पेशंटला नक्कीच सांगते आयुर्वेद म्हणजे जीवन जगण्याची कला, ती एकदा आत्मसात करता आली की फारशा औषधींवर अवलंबून राहण्याची गरज नाही भासत कारण आयुर्वेदामध्ये तुमच्या शरीराबरोबर मनाचाही विचार केला जातो म्हणूनच आयु वर्णन हे पुढील प्रमाणे केले आहे..

शरीर-इंद्रिय- सत्व-आत्मा संयोग धारी जीवितम्|
नित्यग् अनुबंधश्च पर्याये आयु : उच्चते||. च. सू.1/42

मग अशा उत्तम आत्म्याचे जर आपल्या शरीरामध्ये प्रवेश करायचे असेल किंवा एक उत्तम संतती प्राप्त करायची असेल तर ईश्वराकडे मागणं हे करावंच लागेल आणि या मागणी सोबतच आपल्याला उत्तम अशी संतती प्राप्त होऊ शकते शरीर निरोगी असेल, मन प्रसन्न असेल तर ही संतती लवकर प्राप्त होते या सर्वांचा सारासार विचार आयुर्वेद शास्त्रात केलेला आहे जो आधुनिक शास्त्रामध्ये foetal सायकॉलॉजी या रूपाने डोके वर काढू लागत आहे, मग आपलंच ज्ञान जे पाच हजार वर्षांपूर्वी आचार्यांने सांगितलेले आहे ते कोणी आधुनिक रूपात आपल्यासमोर स्पष्ट केले तर ते आपल्याला अधिक आवडेल परंतु माझी सर्व भगिनींना विनंती आहे की आयुर्वेदाचा स्वीकार करा तुम्ही छान आहात तुम्ही निरोगी आहात याचा स्वीकार करा खंबीरपणे उभे राहा सकाळी लवकर उठण्यापासून ते रात्री लवकर झोपण्या पर्यंत ऋतूनुसार आयुर्वेदाचे नियम पाळा आणि आपल्याला हवी असलेली संतती प्राप्त करण्यासाठी आयुर्वेदिक गर्भसंस्काराचा आधार घ्या.




**डॉ. मंगल सुरेश ताठे**
**[एम. डी . आयुर्वेद]**
संचालक- शारदा क्लिनिक संचलित शाश्वत आयुर्वेद व गर्भसंस्कार चिकित्सालय, पिसादेवी, छत्रपती संभाजीनगर
फाउंडर - स्त्री वैद्या संचलित आयु पंख [ Believe in Your-self ] संघटना


# वातदोष



वातदोशाची स्थाने त्यावरील अभ्यंग आणि बस्ती चिकित्सा वायु व आकाश महाभूतांपासून वातदोष तयार झालेला असतो शरीरात जिथे जिथे पोकळी आहे तेथे तेथे वातदोष संचार करत असतो त्यातही नाभी रेषेखालील जे जे अवयव आहेत तेथे वातदोषाचे प्राधान्य असते पक्वशय अर्थात मोठे आतडे, मलाशय,कंबर ,मांड्या ,पाय ,कान अस्थिधातू ,त्वचा ही वाताची मुख्य स्थान असून पक्वशय हे विशेष स्थान आहे पक्वाषय पचन झाल्यानंतर उपयुक्त भागाचे शोषण करणे आणि निरुपयोगी भाग पुढे सरकवणे हे मोठ्या आतड्याचे महत्त्वाचे काम असते, हे काम करण्यासाठी आतड्याची आवश्यक असलेली हालचाल ही वातामुळे होते, मलाषयातील मल विसर्जन ही वाताचे मुख्य कार्य तो या स्थानात असल्याने होऊ शकते

**कंबर :-** उठणे बसणे वाकणे इत्यादी अनेक हालचालींसाठी कमरेत लवचिकता असावी लागते व ती वातदोषामुळे योग्य प्रकारे मिळत असते.

**मांडी व पाय :-** सर्वाधिक हालचालींचे हे स्थान होय पायांना मिळणारी गती त्यांच्या ठिकाणी असलेल्या वातदोषामुळे मिळते पायाला तेल लावून रोजच्या रोज वात दोष नियंत्रित केला तर मांड्या व पायाचे कार्य सुरळीत चालू राहते.

**कान :-** आकाशतत्वाशी संबंधित असल्याने कान हे वाताचे राहण्याचे मुख्य स्थान आहे.

**अस्थिधातू :-** म्हणजे हाड हड्डी पृथ्वी आणि वायू या महाभूतांच्या सहयोगातून तयार झालेली आहे हाडांची रचना एखाद्या स्पंज प्रमाणे सछिद्र असते या सर्व छिद्र मध्ये वातदोष असतो वात वाढला तर ती सछिद्रता वाढते व हाडे ठिसूळ होतात.

**त्वचा :** साध्या डोळ्यांना दिसतील न दिसतील अशी हजारो छिद्रे त्वचेवर असतात घाम बाहेर काढण्याचे व बाहेर लावलेले तेल आत मध्ये शोषून घेण्याची काम या छिद्रामार्फत होत असते या सर्व स्थानांपैकी विशेष महत्त्वाचे स्थान पक्वशय, आहे पक्वशयातील वात दोष नियंत्रित ठेवला तर बाकी सर्व भागाची कार्य सुरळीत चालतात पण पक्वशयात कोरडेपणा वाढला अर्थात वात वाढला तर मात्र कंबर दुखण्यापासून ते त्वचा कोरडी होईपर्यंत किंवा हाड ठिसूळ होईपर्यंत सर्व त्रास होऊ शकतात याच कारणासाठी बस्ती ही वाताची सर्वात प्रभावी चिकित्सा आहे औषधी द्रव्यांनी सिद्ध केलेले तेल तूप किंवा काढा व तेल तूप यांचे मिश्रण मोठ्या आतड्यात पोहोचवणे म्हणजे बस्ती होय मोठ्या आतड्याच्या स्वभावानुसार हे औषध तूप किंवा काढा शोषला जाऊन व त्यामधील संचित दोष बाहेर काढले जाऊ पक्वाशयाला स्निग्धता मिळते व त्यामुळे वाढलेला वात नियंत्रित केला जातो पर्यायाने संपूर्ण शरीरातील वात नियंत्रणात राहतो जसजसे वय वाढेल तसे शरीरात वाताचे प्रमाण वाढत जाते म्हातारपण, गुडघेदुखी, पाठ दुखी, कंबर दुखी ऐकायला कमी येणे हात पायातील ताकद कमी होणे इत्यादी त्रास न होण्यासाठी आयुर्वेदिक पद्धतीने बस्ती घेणे व औषधी सिद्धतेलाने नियमित अभ्यंग करणे या दोन गोष्टींनी वातावर विजय मिळवता येते.




**डॉ. अभिजीत साळवे**



श्री संत
जगदीश हॉस्पिटल
आयुर्वेद चिकित्सा व पंचकर्म केंद्र
डॉ.अभिजीत भा.सावळे
एम डी (आयुर्वेद)
७५८८८१८५०५
डॉ सुचिता अ.सावळे
बी ए एम एस
डी.वय. एन (पुणे)
८४८५८०३४९०
साई हेरिटेज,पहिला मजला,रिद्धी सिद्धी हॉल जवळ,खिवांसरा पार्क,औरंगाबाद



## आयुर्वेदिक चिकित्सा एक मनोगत

जून २००९ मध्ये माझा मुलगा शर्विलला अचानक पायाचा त्रास जाणवू लागला. त्यावेळी त्याचे वय अवघे साडेपाच वर्ष होते. काही दिवसांनी त्याच्या पायाला फटी पडायला सुरुवात झाली. त्यामुळे त्याला चालायला त्रास होऊ लागला. सुरुवातीला आम्ही मलम वैगेरे लावत होतो. अधिकच त्रास होऊ लागल्याने त्याला स्थानिक त्वचारोग तज्ज्ञांना काही दिवसांनी हा उपचार पुरेसा नसल्याचे लक्षात आले. हा उपचार बंद करून काही दिवस, काही ठिकाणी उपचार केले.

जून २०१० मध्ये माझ्या भावाने डॉ. मनोज जोशी यांच्याकडे शर्विलला दाखवायचे सुचविले. सर्वांनी हेच सांगितल्याने त्यांच्याकडे उपचार करण्याचे निश्चित केले. अवघ्या अडीच महिन्यात आश्चर्यकारक परिणाम बसायचा. डॉ. मनोज जोशी यांनी केलेल्या उपचाराने आम्हाला खूप मोठा दिलासा मिळाला. आम्ही शर्विलची मुंज वयाच्या आठव्या वर्षी मोठ्या उत्साहात केली. आधीच्या मनस्ताप व त्रास आता आठवावा वाटत नाही. अशा प्रकारचा त्रास असणाऱ्या रुग्णांना आम्ही डॉ. मनोज जोशी यांच्याकडे जाण्याचा आवर्जून सल्ला देतो.





उपचारापूर्वी उपचारादरम्यान उपचारानंतर



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# आपण पदवीधर होतो म्हणजे होतं काय नेमकं

संयमाचा परीघ



चित्र : बाबूराव पाटील, भोकर



प्रा. डॉ.मुकुंद राजपंखे
संपर्क क्र. 9881294226

भाग : २०

**( 1958 ला मराठवाडा विद्यापिठाची म्हणजे अर्थातच आजच्या आपल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठाची. हे विद्यापीठ मराठवाड्याच्या विकासाची मुहुर्तमेढ आणि ख-या अर्थानं सर्वसमावेशक मराठवाड्याच्या लेकरांना उच्च शिक्षण मिळावं या प्रांजळ हेतूनं सुरु झालं. काळाच्या ओघात मोठी उलथापालथ झाली. एकाचे दोन विद्यापिठं झाली.त्याचे उपकेंद्र निघाले.परंतू आज विद्यापिठाचा पदवीधर कुठल्या आवस्थेत आहे, हे विदारक चित्रही जरा नजरेखालून घातलं तर मोठं अवघडलेपण पदरी पडण्याची दांडगी भिती आहे. काय आभ्यासक्रम शिकवले जात आहेत आणि काय आहे त्यांचा हेतू याबद्दल कुणी गांभिर्यानं बोलंत नाही ही सल बोचंत रहाते.आपण आपल्या कर्तव्याची जाणीव असलेली, संविधान संम्मत अधिकारांची जाणीव असलेली, तहहयात विवेकी वर्तण करुन आपलं आणि कुटुंबाचं पोट भरु शकेल अशी स्वाभिमानी पिढी निर्माण करु शकलो का ? काय असतो देश आणि तो जपायला कसा हवा सगळ्यांच्या मतभेदांचा आदर करुन हे कळवू शकलो का आपण ? गावं गंभीर समस्यांचं माहेर घर होवू पाहताहेत आणि शहरांनी कधी धार्मीक दंगे होतील आणि लोक हाकात पडेल ते घेऊन मारंत सुटतील एकमेकांना या भयानकानं प्रचंड अवघड होतं. समंजस सहृदयी संवेदनशील सृजनशील चिकित्सक प्रयोगशील विवेकी माणुस निर्माणात आपली पदवी काय भूमीका बजावते...यावर गांभीर्यानं विचार व्हायला हवा आज ! आपण पदवीधर होतो म्हणजे होतं काय नेमकं यावर चिंतन मांडणारा हा आजचा लेख दै.अधुनिक केसरीच्या वाचकांसाठी !)**

आधुनिक केसरी

**गीत आमुचे आकाशाचे ; गीत आमुचे सागराचे
इतिहासाचे, जनामनाचे ; गीत आमुचे जागराचे.
अभंगाचे ओवीचेही ; मायबोलीचे माहेर
वा-यातही मराठीचे ; दिवे लख्ख घरोघर
संत महंताचे विरागी ; गीत आमुचे वादळाचे.
तंतु तंतु संघर्षाचा ; पैठणीत भिनलेला
नक्षीतच पक्षी पक्षी ; विजयातच विनलेला
विजयाचे सोनपहाटेचे ; गीत आमुचे उजेडाचे.
प्रज्ञेचा सूर्य नवा ; शब्द उजळुन गेला
समतेचा संगराचा ; अर्थ ढाळुन गेला
विराट विशाल संस्कृतीचे ; गीत आमुचे
जीवनाचे.
फ. मु. शिंदे.**

**डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचं प्रेरणा गीत :** हे आहे आपल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठाचं गीत जे कविवर्य फकिरा मुंजाजी शिंदे अर्थात आपल्या लाडक्या कवी फ.मु.शिंदे यांनी लिहिलं आहे.वर्षातून किमान एक दोनदा प्रसंगा प्रसंगानं कानावर पडतं. विद्यापीठ वर्धापण दिन आणि नामविस्तार दिनानिमित्त. परवा अजून एका कार्यक्रमात संवैधानिक शिष्टाचारात ऐकलं आणि कधी नव्हे तेवढा अंतर्मूख झालो.प्रसंग होता 'पदवी वितरण समारंभाचा', आमच्या तळागाळातील गोर गरीब विद्यार्थांच्या पाठीचा कणा ताठ करणा-या यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात मोठ्या थाटामाटात पार पडलेला.माजी कुलगुरु मधुकर गायकवाड, महाविद्यालय विकास समितीचे मान्यवर सदस्य मा. दत्ता आबा पाटील, मा.डॉ नरेंद्र काळे, मा.प्रा एस के जोगदंड, मा.सय्यद पाशुमिया सर, मा.मुख्याध्यापिका सुवर्णा लोमटे आणि मा. प्राचार्य डॉ शिवदास सिरसाठ यांच्या शुभहस्ते.

**पदवी वितरण समारंभ :** महाविद्यालयातील पदवी वितरण कार्यक्रमात कार्यक्रमाच्या नियोजनाचा भाग म्हणून विदापीठ गात सुरु झालं आणि मन त्यात अधोरेखीत केलेल्या मराठवाड्याच्या वैभवाच्या खुणा शोधंत राहिलं ज्यांचा यथोचित सन्मान फ.मु नी आपल्या गीतामधून केलेला आहे.आमचं गाणं आमच्या मराठवाडी मायबोलीचं, मराठवाड्याच्या विकासाचं, कलेचं, साहित्याचं, विज्ञान आणि वाणिज्य विकासाचं आहे. हा मराठवाडा साधू-संतांनी आपल्या अभंग रचनांमधून अजरामर केला आहे. वैराग्याचं आभूषण धारण केलेल्या संतांनी महंतांनी या मातीची ओवी, अभंग लिहून इथली जनरीत अमर केली आहे.याच प्रदेशात मराठीची पहिली कविता लिहिणारा अंबाजोगाईचा मुकुंदराज आहे आणि याच मातीत पैठणला एकनाथांनी संत साहित्याचं आणि अलौकीक अध्यात्मिक लोकशाहीचं बस्तान बसवलं. इथेच जागतीक स्तरावर नावाजलेल्या हातमागावर विनलेल्या जरतारीच्या पदरावर नजाकतीनं मोर चित्तारलेल्या देखण्या पैठणीचा जन्म झाला.याच मातीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या महापुरुषांनी अतीव कारुण्याने तळागाळातील गोर गरिबांसाठी शिक्षणाची दारं उघडणारी शिक्षण संस्था सुरु केली.ही रामानंदांची भूमी जिथे महापुरुषांच्या विचारधारांनी जगणं समृद्ध केलं. इथलं आभाळ, इथली माती, इथले संस्कार आणि इथला पुरोगामी रीती रिवाज आजही अंगीकारावा असाच आहे.या मातीचा टिळा धारण करुन इथली शेती, इथल्या उद्योगांना विकासाची वाट दाखवावी या उदात्त हेतूने प्रेरीत होवून कार्यरत राहिलेल्या कांही मौलिक शिक्षण संस्थांपैकी कै. विनायकराव पाटील, कै.सुंदरराव सोळंके या मराठवाडा विकासाची दूरदृष्टी लाभलेल्या कनवाळू मंडळींनी स्थापण केलेल्या मराठवाडा शिक्षणप्रसारक मंडळ औरंगाबाद संचलीत देवगिरी महाविद्यालयात मराठी भाषा आणि साहित्याचं वैभव वाढवणारे मराठी विभाग प्रमुख प्रा. कविवर्य फ.मु.शिंदे यांच्या प्रतिभेनं नटलेलं हे विद्यापीठ गीत. हे गीत ऐकत असताना अनेकदा डोळ्यामधून धारा वाहताना अनुभवल्या विषेशतः लॉकडाऊन दरम्यान मुठभर माणसांसोबत ध्वजारोहण करताना तर अक्षरशः मान मोडून पडलेलं शिक्षण पाहून जीवाची प्रचंड घालमेल झाली.आज त्याच लॉकडाऊन काळातल्या लेकरांचा पदवी वितरण समारंभ पाहून मन बिचारं अजूनच गलबलून गेलं.या पदवीनं लेकरांच्या पदरी खरंच काय पडलं हा प्रश्न कार्यक्रमभर माझी मानगूट धरुन होता. लॉकडाऊनचा दोन वर्षाचा काळ देशाच्या शैक्षणिक नुकसानीमंळं जीव जाळून गेला.




पदवीधरांकडून काय आहेत किमान अपेक्षा देशाच्या केंद्रीय मणुष्यबळ विकास मंत्रालय आणि विदापीठ अनुदान आयोग, अर्थात नीती आयोगाचं : आपल्या देशातल्या कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतून पदवी धारण करणा-या कुण्याही पदवीधराकडून या आहेत अपेक्षा...
शैक्षणिक उत्कृष्ठतेचा ध्यास,
आजीवन स्वयंपुर्णतेसाठी शिक्षण घेत राहणारा विद्यार्थी, सातत्याने सृजनशील आणि चिकीत्सक वृत्तीत वाढ, शास्वत अर्थात चिरकाल टिकणा-या विकासाला बळ देणे, सहकारातील स्पर्धेचा निरोगी विकास, अधिकार आणि कर्तव्यात संतुलन ठेवणे, विविधता आणि फरक समजून घेऊन आदर बाळगणे, मानवी विकास आणि प्रबलनासाठी शिक्षणाचा यौग्य वापर करणे. देशाच्या विकासाला सर्वार्थाने हातभार लावणारं मनुष्यब निर्माण करणं आणि देश सेवेसाठी समाजाला हस्तांतरीत करणं हा आहे सर्वांग सुंदर हेतू उच्च शिक्षणाचा.या कांही मूल्यांना कायम डोळ्यासमोर ठेवून आपल्या शिक्षण संस्थांची वाटचाल ठेवणा-या संस्था धन्य. काय आहे वास्तवीक परिस्थिती आपल्या देशातल्या पदवीधरांची ? :

"आपल्याला कशाला बोलंल बाबा, मोठ्या पदवीला पवचलाय आता..." हे गावातल्या बसस्ट्यांडवर, मारुतीच्यापारावर, समाजमंदिराच्या आवारात बसलेल्या खंगलेल्या माणसाचं विधान, मनाला चटका लावणारं असतं. "ती बसंत नाही सेणानं सारवलेल्या जमीनीवर, कपडे खराब होतील मनते मनातल्या मनात" हे गावातल्या मायमाऊलीचं विधानही असंच विचार करायला भाग पाडणारं. "का रं ? दाद्या दिसंत नाहीस अशात ? गावजत्रंलाबी आला नाहीस. नौकरी लागली तस गावाकडं पाऊल वळंनाय त्याचा ! कशाला येईल आता बायकोबी शहरातलीच केलीया." हे एखाद्या बुजुर्गाचं दुःखही एखाद्या भावकीतल्या माणसाचंच असतं गावाची ओल हडकत चाललेल्या काळजाबद्दल.

लोक गावं सोडून शहरात आले आणि पोटा-पाण्याला लागले. आपल्या जिव्हाळ्याच्या माणसांपासून, गावापासून दुरावले. पदवीला पोंचले म्हणंत लोक पैलं अशा वागण्याला.. ते खरंय ! **आपण पदवीधर होतो म्हणजे होतं काय नेमकं ? :**

आपण पदवीला पोंचतो म्हणजे काय झालेलं असतं नेमकं ? आपण पदवीधर होतो म्हणजे काय होतं नेमकं ? आपल्या डोक्याला दोन सिंगं फुटतात का कि, कानं काढतं डोकं ? सरळ पडंत नाही का पाय ? हवा जाते का डोक्यात ? होतं काय नेमकं आपल्या पदवीधर होण्यानं बरं ? काय बदल होतो आपल्या दिसण्या असण्यात आपण बीए, बीकॉम, बीएस्सी, एमए, एमकॉम,एमएस्सी होण्यानं ? एम फिल, पीएच डी झाल्यानं होतो कांही बदल ? निश्चितपणे होत असणार, त्याशिवाय का गाव बोलतं आपलं ? त्या शिवाय का आप्त स्वकीय बघतात ? त्या शिवाय का बोलतात गावचे मित्र मंडळी ? काय जाणवंत असंल बरं त्यांना की ते नीट, चांगलं नाहीत समजंत आपल्याला. काय चुकंत चाललंय नेमकं ? आपण पदवीधर होऊनही समाजोपयोगी माणसांच्या यादीत येत नाहीत की कसल्या पोटा-पाण्याला लागलेल्या सज्जन सद्गृहस्थांच्या यादीतही नसतो आपण ?आपल्या पदवीधर होण्याचा काय अर्थ होता नेमका आणि काय निघंत चाललाय हल्ली या बद्दल जरा गांभिर्यानं बोलायला हवं !

**आपण पदवीधर झालो खरं, पण आपल्या मन, मेंदू, मनगटाच्या विकासाचं काय झालं ? :** वय वाढंत गेलं तसे शरीरांनी वाढलोत आपण, मनानं वाढलोत का याबद्दल विचार करायला हवा ? मागे चार-दोन वर्षांपुर्वी इनोसंट वगेरे होतो आपण मग तो निष्पापपणा हरवला कुठं ? कुठं लुप्त झाला ? आपला विकास, आपली वाढ व्हायला हवी होती ना मग ? बसं देहानं वळणं धारण केली म्हणजे वाढलोत आपण ? आकरावी बारावी नंतरच्या तीन वर्षात केलं काय आपण ? प्रवेश, परीक्षा, प्रवेश, परीक्षा या सोबत काय केलं आपण ? या परीक्षांच्या रहाट गाडग्यानं काय दिलं वाढून आपल्या पदरात ? वय वाढंत चाललंय म्हणंत गेले घरचे आणि हात पिवळे करण्याची घाई केली त्यांनी, आपण माना दिल्या निमूटपणे. नको म्हणण्याची आक्कल आणि हिम्मतही नव्हती आणि नाही आजही आपल्यात. आपल्या पदवीनं आपल्या अंगी कुठल्या क्षमतांचा विकास झाला आणि त्यासाठी आपण काय प्रयत्न केले ? भाकरीची सोय केली का आपल्या ? कि पदवीचा आणि भाकरीच्या सोयीचा कांही संबंध नाही ? पैसा, नौकरी, अर्थार्जनाचं साधण, भुषण नव्हे का पदवी ? पदवीनं गणगोतांपासून दूर नेलं आपल्याला, सुख समृद्धी, सुसंवाद कमी झाले आपापसातले. अबोला, राग, दुरावा, नैराश्य, समाज मन दुःखी झालं. असमाधान, असंतोष, सहिष्णुता संपली,नात्यातील भावनीकता संपवली पदवीनं.ही आणि अशा किती तरी गोष्टींमुळं पदवीबद्दल पुर्वी होता तसा सन्मान दिसून येत नाही समाजात.किमान तीन वर्षे मान जुवाखालून काढली नाही तर कमावलं :

सर्वसाधारणपणे, किमान तीन वर्षाचा आभ्यासक्रम पुर्ण केल्या नंतर मिळवलेले प्रमाणपत्र अर्थात पात्रता, कुवत, क्षमता, काबिलियत, अ्याबिलीटी म्हणजे पदवी.त्यानंतर दोन वर्षांचा सखोल आभ्यासक्रम पूर्ण केला तर ती पदव्युत्तर पदवी. त्यानंतर तीन वर्षात पीएच. डी. अर्थात संशोधनासाठीची 'आचार्य' ही पदवी प्राप्त करता येते. त्या नंतर तीन वर्षात आचार्योत्तर आचार्य अर्थात पोस्ट पीएच. डी. ही करता येते. पुन्हा दोन ते तीन वर्षाच्या सखोल संशोधणाला डी. लिट. या पदव्युत्तर पदवीनेही सन्मानित केले जाते. पारंपारीक कला, वाणिज्य आणि विज्ञान विद्यापिठाच्या पदव्यांचा हा प्रकार आहे.मानद डी लिट ही पदव्युत्तर पदवी तुमच्या कुठल्याही क्षेत्रातील समाजोपयोगी कार्याला अर्पण करण्याचीही परंपरा आहेच आपल्या विद्यापिठांनी. तर... मूळ मुद्दा ही की आपण ग्र्याज्युएट म्हणजे पदवीधर झालो तर असा नेमका काय बरं फरक पडतो आपल्यात ? मुळात पदवीची विषेशता ही की पदवीधरांच्या किमान कांही कौशल्य, ज्ञान आणि क्षमतांचा विकास व्हावा.या गोष्टी आभ्यासक्रमासह आभ्यासक्रमाच्या बाहेरील कौशल्य, ज्ञान आणि क्षमतांशीही संबंधीत आहेतच.आपण आणि आपल्या महाविद्यालयांनी शिकवलेल्या विद्यार्थ्यांनी कोणत्या कौशल्यांचा विकास केला हे बघणं काळाची गरज आहे. कोणतं ज्ञान आपण प्राप्त केलं आहे याचाही पडताळा घेतला गेला पाहिजे. कुठल्या क्षमतांचा विकास झाला आपला आणि कासल्या क्षमता कमावल्या आपण ? या जटील प्रश्नांचा सोक्ष मोक्ष लावायचा तर अगोदर पदवी आणि पदवीच्या अपेक्षा काय आहेत नेमक्या मानव संसाधन मंत्रालयाच्या आणि युजीसीच्या हे बघणं गरजेची गोष्ट आहे.

**विनयशील वर्तणच नसेल आपलं तर विद्या शोभूनच दिसणार नाही आपल्याला :** 'साविद्या या विमुक्त ये' अर्थात 'सर्व स्तरीय मुक्तीचं शिक्षण', 'विद्या विनयेन् शोभते' अर्थात 'विनय नसेल तर विद्या शोभून दिसणार नाही'. याचाच सोपा अर्थ असा की 'शिक्षण हे सर्व स्तरीय शोषण मुक्तीचं साधण आहे आणि ते विनयशीलता असेल तर शोभून दिसतं'. तुम्ही विनयशील नसाल, तर तुमच्या पदवीला अर्थ काय उरतो ? तुमचा अहंकारंच मावळला नसेल तर तुम्ही लवून, चोपून कसे वागणार ? तुम्हाला घटनांचा क्रम लावून अर्थ काढताना अडचनी येत असतील तर आवघड आहे ना ? काय बघतो आहोत भवतालात आपण ? माणुसकी हरवली आहे, शहाणपण संपत चाललंय, ज्ञान आणि शहाणपण यात जमीन आस्मानाचं अंतर पडलं आहे.माणसात माणसं राहिले नाहीत.कधी कोण धोका देईल याची शास्वती राहिली नाही. लांड्या-लबाड्यांनी मनं विटून गेली आहेत माणसांचे.खोट्या-नाट्यांचा अक्षरशः किळस आला आहे. 'एवढे सगळे अनर्थ एका अविद्येने केले' म्हणाले महात्मा फुले ते खरंच खोटं आहे का ? हे एकदा आपापल्या सद् सद् विवेकबुद्धीला विचारलं पाहिजे आपण ? मनाशी संवादच नाही आपला. "सत्य असत्याशी मन केले ग्वाही, ऐकियले नाही लोकमता." हा तुकोबाचा वसा आणि वारसा कसा पुढं जाईल ? स्वतःच्या मनाचा विकास कुठं बारगळला आहे आपला ? आपल्याला मनचं शहाणपण कधी येणार ? हेच नव्हे का बुद्धाची शिकवण 'अतः दीपः भवः' ? स्वयंप्रकाशीत व्हा म्हणाले गौतम बुद्ध, ही पायरी कधी चढायची आपण ? यातलं कांहीही न शिकून आपणंच आपल्या पदव्या मातीत घातल्या आहेत मंडळी.

आपण पदवीधर झालो आता इथून पुढं आपल्याला न शिकलेल्या धड्यांची विनयशीलतेनं अचूक उत्तरं देता **यायला हवीत :**
देश अवघड आवस्थेतून जातो आहे. विषेशतः राजकारणानं चव सोडली आहे. मनमानी आणि मोडतोड यांचा अतिरेक झाला आहे.'माझं ते माझंच आणि तुझं ते ही माझंच' हा भ्रष्ट विचार आणि त्याहून क्रुर आचार असलेली माणसं सत्ता आणि सत्तेभवताली आहेत. हिसकावून, ओरबाडून, मुंड्या मोडून, फसवा-फसवी करुन लोक पुढं चालले आहेत.आपले अधीकार जे सविधान संम्मत आहेत, ते ही वापरता येत नाहीत आपल्याला.केवळ चालाखी आणि अघोरी मनगटाच्या बळावर बुद्धीबळ हवं तर नाचवलं चाललंय. एकूनच जगाचा ताल सुटंत चाललाय आणि अराजक डोळ्यासमोर दिसतं आहे. इथे कुठलाच माणुस आपल्या विवेकाची कास धरून नाही आणि संवेदनहीन सांगाडे नाचताहेत आसुयांनी बरबटलेले आवती-भवती.'आपापल्या जाती-धर्माच्या नीतीमूल्यांच्या अती आग्रहापुढं आपल्या वर्गातले लेकरं आपण न्यायचे कसे, हा भला मोठा आक्राळ विक्राळ प्रश्न आ-वासून उभा आहे.दीन-दुबळ्या लंगड्या-लुळ्या केंद्रबिंदूपासून कोसो दूर असलेल्या परीघा बाहेरील माणसांचं काय होणार ? कर्मचारी संपावर आहेत जुनी पेन्शन लागू करावी म्हणून तीस पस्तीस वर्षे आयुष्यभर केलेल्या सेवेनंतर म्हातारपणी पोटापाण्याची सोय व्हावी म्हणून आणि त्याच देशात निवडून आलेला लोकप्रतिनीधी शपथविधी झाला की लाईफलॉंग पेन्शनधारक होतो याचा कसा ताळमेळ बसवायचा शिकलेल्या माणसानं हा गंभीर प्रश्न आहे. हे आणि अशा शेकडो न शिकलेल्या धड्यांची उत्तरं आयुष्यभर मोठ्या संयमानं द्यावी लागणार आहेत.

# प्रपंचातले आपलेपण भगवंताकडे वळवा


आधुनिक केसरी



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

प्रेम हे सर्वांना उपजतच येत असते. हा माझा मुलगा, ही माझी मुलगी, यांच्यावर प्रेम कसे करावे हे कुणी शिकवावे लागत नाही. एकदा आपले मानले की प्रेम आपोआप निर्माण होते. पण हे प्रेमसुद्धा खरे बघितले तर स्वार्थी आहे. मुलगा ऐकत नाही, तो वाटेल तसे वागतो, अशी आपण तक्रार करतो. त्याच्यावर जर आपले खरे प्रेम असेल तर आपण तशी तक्रार करणार नाही, परंतु त्याच्यामागे 'हा माझे ऐकत नाही' हा अहंकार, स्वार्थ आहे. एक गृहस्थ मला भेटले , त्यांना मी विचारले,"झाले का मुलाचे लग्न ?" ते म्हणाले, "नाही, उद्या आहे." "मुलगा चांगला वागतो का ?" असे मी विचारल्यावर ते म्हणाले , "आत्ताच नाही सांगत, सहा महिन्यांनी सांगेन." स्वार्थाचे प्रेम इतके अशाश्वत आहे. मला सांगा, अशा स्वार्थाच्या प्रेमापासून सुख कसे लाभेल ? प्रपंचात आपण केवळ कर्तव्यबुद्धीने वागावे; मग "मुलगा माझे ऐकत नाही" हा प्रश्नच उदभवणार नाही.

खरोखर, प्रपंच हा एखाद्या प्रयोगशाळेसारखा आहे. कॉलेजचे शिक्षण पुरे करण्यासाठी काही महिने तिथे शिकावे लागते असे म्हणतात. त्या प्रयोगशाळेतून काही उत्पादन काढण्याचा उद्देश नसतो, फक्त मुलांना शिकविण्यासाठी त्याचा उपयोग होतो. तिथे सर्व काही शिकून घ्यायचे असते; ते किती उपयोगी पडेल, त्यापासून किती फायदा होईल, याची अपेक्षा ठेवायची नसते. त्याप्रमाणे, प्रपंच ही परमार्थाची प्रयोगशाळा समजावी. आजपर्यंतचा आपला अनुभव पाहिला तर आपण 'केले' असे थोडेच असते. म्हणून, परिस्थितीबद्दल फारशी काळजी न करता आपण आपले कर्तव्य तेवढे योग्य रीतीने करावे, आपल्या वृत्तीवर परिणाम होऊ देऊ नये. प्रत्येक गोष्ट घडायला योग्य वेळकाळ यायला लागतो. तेव्हा कर्तव्यबुद्धीने वागून काय ते करा, आणि 'भगवंता, हा प्रपंच तुझ्या इच्छेने चालला आहे' असे म्हणा, म्हणजे आपोआप भगवंताचे प्रेम लागेल. प्रपंचातले जे आपलेपण आहे ते भगवंताकडे वळवा. घरातल्या मंडळींवर निःस्वार्थबुद्धीने प्रेम करायला शिका, म्हणजे परमार्थ आपोआप साधेल, आणि आपलेपणा भगवंताकडे



वळविल्यामुळे भगवंतावर प्रेम जडेल; याकरिता काही वेगळे करणे नको. हा आपलेपणा निर्माण होण्यासाठी, भगवंतावाचून आपले नडतेही भावना झाली पाहिजे. याकरिता आपण त्याच्या अखंड सहवासात राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्याच्या नामस्मरणानेच ही गोष्ट सहज शक्य आहे. वाचलेले विसरेल, पाहिलेले विसरेल, कृती केलेली विसरेल,पण अंतःकरणात घट्ट धरलेले नाम कधी विसरायचे नाही.

# राणीउंचेगाव शिवारात दोन एकरांत साकारले शेततळे

## 35 लाखांचा खर्च : तीन कोटी लिटर पाणी साठवण क्षमता

आधुनिक केसरी न्यूज

**रामदास पटेकर**

**अंबड :** घनसावंगी तालुक्यातील राणीउंचेगाव येथील सुरडकर कुटुंबाने आपल्या 2 एकर शेतात तब्बल 44 फूट खोलीचे आणी 3 कोटी लिटर पाण्याची क्षमता असलेले भव्य असे शेततळे उभारले आहे. हे भव्य शेततळे तयार करण्यासाठी शेतकऱ्याला 35 लाख रुपयांचा खर्च आला आहे.

जालना तालुक्यातील मांडवा येथील मूळ रहिवासी, मात्र मागील 2 वर्षांपासून घनसावंगी तालुक्यातील राणीउंचेगाव येथे स्थायिक झालेल्या सुरडकर कुटुंबाकडे राणी उचेगांव परिसरात सुमारे २२ एकर शेती आहे. परंतु पाण्याअभावी शेतात कापूस, तूर,



हरभरा, ज्वारी आदी पिके त्यांना घ्यावी लागायची. कारण परिसरात नेहमीच कमी अधिक प्रमाणात पाऊस पडत असल्याने पिकांवर झालेला खर्च देखील मिळणाऱ्या उत्पादनातून वसूल होत नाही. म्हणून पाणीटंचाईवर मात करण्यासाठी सुरडकर कुटुंबातील सदस्यांनी शेततळे खोदण्याचा निर्णय घेतला. कारण पाण्याची व्यवस्था नसल्याने फळ बागायती देखील करता येत नव्हती. आपल्या 22 एकर शेतीला निसर्गाच्या लहरीपणाचा सामना न करता आपल्याच शेतात बारमाही पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी सुरडकर कुटुंबाने 2 एकरात शेततळे करण्याचा निर्णय घेतला. मे 2022 मध्ये पोकलेन मशिनच्या मदतीने आपल्या शेतात अवाढव्य शेततळ्याच्या खोदकामाला सुरुवात केली. 3 महिन्यांनंतर ४४ फूट खोलीवर शेततळ्याचे काम पूर्ण झाले.सुमारे 3 कोटी लिटर पाणी साठवण क्षमता असणाऱ्या शेततळ्याला सुमारे 35 लाख रुपयांचा खर्च आला. हे शेततळे बोअरच्या पाण्याने तुडुंब भरले आहे. सुरडकर कुटुंबियांनी 2 एकरात तयार केलेल्या शेततळे पाहण्यासाठी परिसरातील शेतकरी गर्दी करीत आहेत. घनसावंगी तालुक्यातील अनेक शेतकरी शेतात विविध प्रयोग करीत आर्थिक उन्नतीकडे वाटचाल करत आहेत.

> माझे काका गिरीष सुरडकर यांनी आपल्या शेतात मोठे शेततळे करण्याचा संकल्प केला होता . कुटुंबातील सदस्यांनी त्यांच्या संकल्पनेनुसार काम करण्याचा निर्णय घेतला . त्यानुसार आम्ही बारा महिने पाणी साठवण राहील या हिशोबाने 2 एकरात शेततळे तयार केले असून, लवकरच आता फळबागांची लागवड केली जाणार आहे . या शेततळ्यामुळे आमचा शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागला आहे . **–लक्ष्मण सुरडकर, शेतकरी, राणी उचेगाव ता .घनसावंगी**



# जालना जिल्ह्याला गारपिटीने झोडपले

## शासनाने तत्काळ मदत द्यावी : माजी मंत्री आ. राजेश टोपे

आधुनिक केसरी न्यूज

**अंबड :** जालना जिल्ह्यातील बहुतांश गावांत वादळी वाऱ्यांसाह अवकाळी पाऊस तसेच गारपिट झाल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास या अस्मानी संकटाने हिरावला गेला असल्याने शासनाने तात्काळ शेतकऱ्यांना मदत देण्याची मागणी बदनापूर तालुक्यातील दाभाडी तसेच अंतरवाली राठी या गावांमध्ये बांधावर जाऊन माजी मंत्री आ. राजेश टोपे यांनी केली.

जालना जिल्ह्यात बहुतांश गावांत मागील चार दिवसांत वादळी वाऱ्यांसाह अवकाळी पाऊस तसेच गारपिट झाल्याने शेतातील उभी पिके, बहराला आलेल्या फळबागा यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. दि. 19 रोजी सकाळी 7 वाजल्यापासुन/बदनापूर भागातील दाभाडी,अंतरवाली राठी या गावांमध्ये बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी केली. जिल्ह्यात हमीभावामुळे नडला गेलेला बळीराजा या अस्मानी संकटाने जास्तीच खचला गेला आहे. मोसंबी बागा, कलिंगड, कांदा, ज्वारीची शेती काल दि.18 रोजी झालेल्या गारपीटमुळे नष्ट झाली आहेत. हातातोंडाशी आलेले पीक वादळी वारा तसेच पावसाने मातीमोल झाल्याने शेतकरी राजाच्या डोळ्यात आलेले अश्रू बघवत नसल्याचे आ.राजेश टोपे यांनी उपस्थित शेतकऱ्यांनां सांगितले. तसेच माझी अत्यंत कळकळीची आणि आग्रहाची शासनाला मागणी आहे की, तातडीने जालना जिल्ह्यातील अवकाळी पाऊस तसेच गारपीटीने ग्रस्त भागातील पंचनामे केले जावेत. तसेच राज्य सरकारने नुकसाभरपाई देण्यातही विलंब करू नये. शासकीय यंत्रणेला तसे तातडीने आदेश देऊन पंचनामे करण्याची आणि मदत जाहीर करण्यासाठी मुख्यमंत्र्यांना मागणी करण्यात येणार असल्याचे सांगितले.

# कारवाईसाठी गेलेल्या पोलिसांवर हल्ला

## जुगार अड्ड्यावर कारवाईसाठी गेले असता सामूहिक हल्ला

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्ह्यातील वरखेडी गावात यात्रा चालू असताना मोठ्या प्रमाणात जुगार खेळला जात आहे, अशी गुपित माहिती मिळाल्याने धुळे पोलीस अधीक्षक यांनी कारवाईचे आदेश दिले त्या अनुषंगाने अड्ड्यावर कारवाई करण्यासाठी गेलेल्या धुळे स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेच्या पाच कर्मचाऱ्यांना मारहाण झाल्याची धक्कादायक घटना घडली असून याप्रकरणी धुळे तालुका पोलीस ठाण्यात 23 जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून 19 जणांना अटक करण्यात आली आहे.

यात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गावात मोठ्या प्रमाणात जुगार आणि सोरट खेळले जात असल्याची या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेचे काही कर्मचारी या ठिकाणी कारवाई करण्यासाठी गेले असता त्यांच्यावर जुगार खेळणाऱ्यांनी प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली आहे. या हल्ल्यात पाचही पोलिजणघटनेची माहिती मिळताच स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेचे पोलिस अधिकारी आणि तालुका पोलीस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले होते. या मारहाण केलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांना किरकोळ दुखापत झाली आहे.



# आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची उद्योजक पद्माकर मुळे यांच्या घरी सदिच्छा भेट

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज जावळी, जि. सातारा मतदारसंघाचे आमदार मा. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले यांनी आज छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था सचिव तथा उद्योजक श्री. पद्माकरकाका मुळे यांच्या सहयाद्री या निवासस्थानी आज सदिच्छा भेट घेऊन आशीर्वाद घेतले, त्यांचा सत्कार श्री. पद्माकरकाका मुळे यांनी शाल आणि पुष्पगुछ देऊन करण्यात आला. यावेळी छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था अध्यक्ष रणजितभैय्या मुळे, विश्वस्त समीरभैय्या मुळे, लताकाकू मुळे, सौ. रोहिणीवहिनी मुळे, कु. तनिष्का, उद्योजक राजू भोसले, श्री. अक्षय जाधव, निलेश देवकर, डॉ. गिरीश मोरे, अँड. राहुल तांबे, दुष्यंत पाटील, डॉ. भरत पाटील चव्हाण, संजय पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.



# हिंदू नववर्षनिमित्त अनोखी यात्रा

## गुढी उभारून नवीन वर्षाची शोभा वाढवण्याचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरात दरवर्षीप्रमाणे ह्या वर्षी ही पाडवा नवीन वर्षाच्या निमित्ताने शोभायात्रा काढण्यात येणार आहे. यात्रा दि. 22 मार्च रोजी सायंकाळी 5 वाजता श्री नारायण बुवा समाधी मंदिर आग्रा रोड येथून प्रारंभ होणार आहे.

ह्या वेळेस हिंदू नववर्ष स्वागत समितीतर्फे वेगळ्या प्रकारे नियोजन करण्यात आले आहे. या ठिकाणी 15 फुटी हनुमान मूर्तीच्या सजीव देखावा सह इतर अनेक आकर्षक देखावे आयोजित करण्यात आला आहे. व त्याबरोबर आदिवासी नृत्यकला सादर करण्यात येणार आहे. या समितीचे स्वागत अध्यक्ष शितल नवले यांनी पत्रकार परिषद घेऊन सर्व समाज बांधवांना आव्हान केले की शोभा यात्रेच्या तसेच हिंदू नववर्षाच्या स्वागतासाठी चौकाचौकात गुढी उभारण्यात यावी. मागील वर्षापेक्षा यावर्षी दुप्पट ताकदीने लाखोंच्या संख्येने समाज बांधव उपस्थित राहतील व ही यात्रा कोणाला कमी लेखण्यासाठी नाही किंवा कोणत्या समाजाच्या विरोधात नाही असेही नवले यांनी आवाहन केले. गेल्या वीस वर्षापासून होत असलेल्या नववर्ष मिरवणुकीत महिलांचा सहभाग हा खूप कमी असल्यामुळे महिलांना जास्तीत जास्त उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# अहिंसा रन मॅरॅथॉनचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** सकल जैन समाजाची सामाजिक धार्मिक आणि राष्ट्रीय कार्यात सक्रिय असणाऱ्या "जितो " या संस्थेच्या माध्यमातून भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सवच्या निमित्ताने जितो महिला शाखाच्या माध्यमातून दि. ०२ एप्रिल - २०२३ रोजी संपूर्ण देशातील ५५ मोठ्या महानगरात आणि २५ विदेशातील शहरात एकाच वेळी एकाच दिवशी "अहिंसा रन " मॅरॅथॉन चे आयोजन करण्यात आले असून या मॅरॅथॉन अहिंसा रन मध्ये अधिकाधीक सर्व समाजाच्या नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन जितो समाजातील महिला शाखेच्या अध्यक्षा डिंपल पगारिया व पदाधिकारी मंडळाने केले आहे.अपेक्स चेअरपर्सन संगीताजी ललवानी यांच्या मार्गदर्शनाखाली गिनीज बुक ऑफ रेकॉड आणि लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्ये दर्ज होणार आहेत. १० कि. मी., ५ कि. मी., ३ कि. मी., अशा प्रकारे हि मॅरॅथॉन अहिंसा रन होणार असून दि. ०२- एप्रिल - २०२३ वारः रविवार सकाळी ०५:३० वाजता कर्णपुरा मैदान येथून हि मॅरॅथॉन सुरु होईल. याचे रजिस्ट्रेशन लिंक द्वारे करण्यात येत आहे. संपूर्ण देशात शांतता, सदभावना, बंधुता, एकता, आणि अहिंसा या संदेशाचा प्रचार प्रसार व "जगा आणि जगू दया" या संदेशाचा प्रचार देश वासियांच्या मनात रुजविण्यासाठी हे प्रमुख उध्दीष्टे असल्याचे जितो कडून देण्यात आलेल्या प्रसिद्धी पत्रात देण्यात आले आहे.

या अहिंसा रनच्या यशस्वीतेसाठी जितो राज्य उपाध्यक्ष रवि खिवंसरा, चॅप्टर चेअरमन पारस ओस्तवाल, चॅप्टर सेक्रेटरी दिनेश मुथा, महिला शाखा चेअरपर्सन डिंपल पगारिया, सेक्रेटरी प्रिया मुथ्था, दर्शू फुलफगर, नीता सेठिया, सारिका चंडालिया, संगीता कोटेचा, स्वरूची मुगदिया, राखी जैन, सोनल जैन, पल्लवी ओस्तवाल, रंजू जैन, स्वाती महारा, युथ विंग चेअरपर्सन सुरक्षा कटारिया, युथ विंग सेक्रेटरी मिहीर बंब यांनी केले आहे. तसेच या अहिंसा रनचे गोल्ड स्पॉन्सर मंगलम वेडिंग डेस्टीनेशन आहे.

# शहाजीराजांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक बोलावणार

## पालकमंत्री भुमरे : शहाजीराजे भोसले जयंतीला बारा सरदार घरण्यांतील वंशजाची हजेरी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** वेरूळ हे भोसले घराण्याचे मूळ गाव आहे व या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजीराजे भोसले यांची गढी आणि शहाजीराजे भोसले यांचे स्मारक आहे. या ठिकाणी देश विदेशातून हजारो पर्यटक आणि भाविक येत असतात. मात्र या गढी व स्मारकाचा म्हणावा तसा विकास झाला नसल्याची खंत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री संदिपान भुमरे यांनी या ठिकाणी व्यक्त केले. तसेच घडी व स्मारक हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे होण्यासाठी याच ठिकाणी याच मातीत मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली लवकरच बैठक बोलावणार असल्याचे प्रतिपादन यावेळी पालकमंत्र्यांनी केले. तसेच यावेळी स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले यांची ४२९ वी जयंती दी १८ मार्च रोजी वेरुळ गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली होती यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी लेझीम सादर केली तसेच वेरूळ ग्रामस्थांनी पारंपारिक वेशभूषा या शोभा यात्रेत सहभाग नोंदवला होता. आणि येथील स्मारक परिसरात विविध कार्यक्रमाने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या जयंती सोहळयास छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सोबतच्या बारा सरदार घरण्यांतील वंशज यांनी हजेरी लावली .

**या बारा वंशजा मध्ये**



१ ) सुभेदार श्री. कुणाल मालुसरे सुभेदार तान्हाजी मालुसरे यांचे थेट 13 वे वंशज लव्हेरी ,
२ ) सरसेनापती पायदळ सरनौबत श्री. रवींद्रजी कंक, सरसेनापती पायदळ सरनौबत येसाजी कंक यांचे थेट 13 वे वंशज राजघर , ३ ) सरदार अक्षयराव बांदल देशमुख इतबारराव पावनखिंड वीर , शूर सरदार समशेर बहाद्दर बांदल नाईक देशमुख इतबारराव यांचे थेट 13 वे वंशज आळंदे, ४ ) सरदार मंथनराव जगताप स्वराज्य वीर सरदार गोदाजीराव जगताप यांचे थेट 13 वे वंशज सासवड, ५ ) भारतातील सर्वात मोठा सरदार व मावळ्यांचा रथ सोहळा शिवजयंतीमहोत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष आणि दमाजी गायकवाड यांच्या घराण्यातील श्री अमितदादा गायकवाड पुणे मुंढवा, ६ ) सरसेनापती राजेंद्र उर्फ संग्रामसिंह दादा मोहिते पाटील सरसेनापती हंबीरराव मोहिते यांचे थेट वंशज करंदी भोर , ७ )सरदार मंगेशराव शिळीमकर सरदार हैबराव शिळीमकर यांचे वंशज बोरवळे, ८ ) सरदार प्रदीप दादा मरळ सरदार झुंजारराव मरळ यांचे वंशज कोंढवळे ,
९ ) सरदार संतोष राजे गायकवाड छत्रपती शिवाजी महाराज यांचे अंगरक्षक सरदार कृष्णाजी गायकवाड यांचे थेट 11 वे वंशज पुणे, १० ) सरदार कान्होजी जेधे यांचे वंशज सरदार युवराजजी जेधे ( कारीगाव ) , धारपवार संस्थान महाराज सबुसिंग यांचे वंशज
११ ) आबासाहेब पवार धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या दुधाई विर धाराऊ माता गाडे पाटील,छत्रपती संभाजी महाराजिचे दूध भाऊ सरनोबत अंतोजीराजे गाडे पाटील नाईक रायाजीराजे गाडे पाटील यांचें थेट वंशज अमितदादा गाडे पाटील यांचा समावेश आहे. प्रथम वेरूळ गावात त्यांचे स्वागत करण्यात आले त्यानंतर पूजन करून वेरूळ गावातून रथावर बसून सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी शाळेचे विद्यार्थी मुला मुलींनी लेझीम च्या तालावर नाचत मिरवणुकीत सहभाग नोंदवला. वंशजानी शहाजीराजे भोसले स्मारकाला अभिवादन करून पूजन करण्यात आले.

त्यानंतर आलेल्या बाराही वंशजणांचा वेरूळ ग्रामस्थांच्या वतीने सत्कार समारंभ करण्यात आला. शहाजीराजे भोसले जयंती उत्सव समितीचे राजेंद्र पवार, गणपत मस्के आणि त्यांचे सहकारी तसेच वेरूळ ग्रामस्थ यांनी महोत्सवकरिता परिश्रम घेतले. तसेच दिवसभर येणाऱ्या शिवभक्ता करिता प्रसाद व पाणी वाटप करण्यात आले. सहकारी बँकेचे संचालक किरण पाटील डोणगावकर यांच्या वतीने अन्नदान महाप्रसाद करण्यात आला. यावेळी पोलिसांचा चौक बंदोबस्त होता. यावेळी गणेश नाना आधाने , माजी सरपंच प्रकाश पाटील , उपसरपंच विजय राठोड , मछिन्द्र देवकर, सतीश लोखंडे, अनिल श्रीखंडे, सुनील कोटकर, राजेंद्र सरोवर , सतीश वेताळ , परसराम बारगळ, किशोर काळे , मूलचंद चव्हाण, विजय भालेराव , अनिल मिसाळ यांची प्रमुख उपस्थिति होती. यावेळी मोठ्या संख्येने सर्व धर्मीय महिला नागरिकांची यावेळी उपस्थिती होती.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूळ गावी आज येण्याचे आम्हा सर्वांना भाग्य लाभले . शिवकालीन इतिहास पुन्हा जागा झाला . आमच्या पूर्वजांनी छत्रपती शिवाजी महाराजांसोबत विविध ठिकाणी स्वाऱ्या करून गनिमांना सळो की पळो करून सोडले होते . आज भोसले घराण्याच्या मूळ गावी येऊन छत्रपती शहाजीराजे भोसले यांना अभिवादन करण्याचे भाग्य लाभले . पुणे नंतर प्रथमच महाराष्ट्रात एवढ्या मोठ्या प्रमाणात सर्व छत्रपती शिवाजी महाराजांच्या मावळ्यांचे सरदारांचे वंशजण सोबत जयंती उत्साहात साजरी करण्यात आली . व येथील राजेंद्र पवार, गणपत मस्के, ग्रामस्थ आणि नागरिकांनी प्रेम दिले त्या सर्वांचे मन :पूर्वक खूप खूप धन्यवाद .

**– श्री . रवींद्र कंक, सरसेनापती पायदळ, सरनौबत येसाजी कंक यांचे थेट 13 वे वंशज राजघर )**

# वाळू माफियांचा रुतबा भारी, खुलेआम वाळू चोरी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील गिरिजा नदीला सध्या वाळू तस्करांनी चांगलेच पोखरले आहे. रात्रीला त्यांचा हा गोरखधंद्याचा खेळ चालत असताना महसुली पथक निद्रास्त असून पोलीस कंट्रोल रूम व ११२ या आपतकालीन नंबरवर कॉल करूनही कार्यवाही शुन्य राहिली . पोलीसाचे वरती मागुन घोडे दौडले. मात्र वाळु तस्करांनी शेतकऱ्यांची पाईलाईन फोडल्याने शेतकरी त्रस्त झाले आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्हयात वडोद बाजार परिसरातील गिरजा नदी पात्रात अवैध वाळू वाहतुक करणारे तस्करांचे धुमशान सुरुच आहे . पोलीसी बाबू मंडळींकडून मात्र त्यांना अभय मिळत असल्याचा संशय निर्माण होत असून हे काम पोलीसांचे नसून महसुल विभागाचे असल्याचे दाखवून पोलीस कंट्रोल रूम व ११२ या क्रमांकावर १६ मार्च मध्यरात्री संपर्क करून जवळपास ३ तास पर्यंत कुणीच फिरकले नाही . शेवटी वराती मागुन घोडे आले तसे निघून गेले तक्रारदार इसमाला साधी चौकशीची तसदी घेतली नाही. तेव्हा नदी पात्रात लाईट बंद करून अवैध वाळू वाहतूक करणारे ट्रॅक्टर दबा धरून बसलेले होते. रात्री-बेरात्री सुरू असलेल्या गोरखधंद्यामुळे शासनाचा लाखो रूपयांचा महसूल बुडत आहे. याकडे सबंधीत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन बेसुमार होणारा वाळू उपसा थांबवण्याची गरज निर्माण होत आहे. विशेष म्हणजे स्थानिक पोलीस पैसे घेऊन तस्करांना अभय देतात असा व्हिडीओ व्हायरल झाल्याने प्रतिनीधीला प्राप्त झाला असून यावरून अवैध वाळू वाहतूक रोखणे महसुलचे काम असेल तर पोलीस पैसे घेतात कशाचे ? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. वाळु तस्कारांचे पंटर रात्रभर जागो - जागी दबा धरून बसत असल्याने हा त्यांचा धंदा झाला आहे . असून नाक्या - नाक्यावर शेकोट्या करुन वरिष्ठ अधिकाऱ्याचे पथक किंवा कोणी असल्याचे वृत हे वाळु तस्करांना पुरवत असतात . मध्यरात्री नंतर हे अज्ञात कारणासाठी दबा धरून , रूप बदलून , ओळख लपवून बसलेले इसम हे पोलीसी कायदयात गुन्हेगार ठरू शकत असल्याने पोलीस यांच्या वर पेट्रोलिंग दरम्यान कार्यवाही करू शकतात पण तसे होत नाही . हे विशेष खरे तर अनेक वेळा या वाळु चोरा बाबत पोलीसांना कल्पना देऊनही उपयोग होत नाही . काही दिवसापूर्वी एक पत्रकाराने पोलीस ठाण्या समोरून रात्री ९ वाजेदरम्यान क्षमते पेक्षा जास्त भरून न झाकता वाहन धारकाच्या डोळ्यात वाळु उडून इजा किंवा अपघात घडू शकतो ही बाब पोलीस उपनिरीक्षक यांना दुरध्वनी वरून कळविली परंतु बराच वेळ होऊन ही उपयोग न झाल्याने परत फोन केला तो पर्यंत दुसरा हायवा परत भरून आला परंतु पोलीस ठाण्यातच होते . हायवा खाली होऊन परत आले तेव्हा पोलीस समोरून गेले. या बाबत संभाषणाची आडीओ क्लीप सोशल मिडीयावर व्हायरल झाली होती. तेव्हा रवानगी टाकून जावे लागत असल्याने उशीर झाला तो पर्यंत हायवा खाली झाले आता काय ? असे उत्तर मिळाले होते . १६ मार्च रोजी ही तेच झाले. पोलीस कंट्रोल रूम व नंतर ११२ यांना वारंवार कॉल करूनही उपोयग झाला नाही . वडोद पोलीस उशीरा येण्याचे कारण एका व्हिडीओ मधून उघड झाले. आता या सर्व पोलीस अधिकारी व अवैध वाळू वाहतूकदारांचे कॉल डिटेल काढून वरिष्ठ या पोलीस अधिकारी कर्मचारी यांच्यावर कार्यवाही करणार का ? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

वडोद बाजार येथील शेतकरी रमेश वाघ यांची गिरजा पात्रातील पाण्याची पाईप लाईन फोडून नुकसान केल्याने त्याने पोलीसांना फोन करून कार्यवाही करण्यात यावी असे सांगितले मग त्या शेतकऱ्याला दुसऱ्या दिवशी घरून गाडीत घालुन नेण्याचे कारण काय ?

सदर अवैध वाळु वाहतुक करणाऱ्या वाहानाच्या चालकांचा अवैध वाळू वाहतूक करणारे ट्रॅक्टर कुणाचे व कोणते पोलीस या तस्करांकडून पैसे घेतात . याबाबत व्हिडीओ व्हायरल झाल्याने पोलीस व अवैध वाळु वाहतुक दारांचे धाबे दणाणले आहेत . तेव्हा या परिसरातील वाळु तस्कर या सह अवैध धंदे चालंक आणि वसुली पोलीस यांचे फोन डिटेल काढल्यास हा अर्थिक संवाद उघड होऊ शकतो . तेव्हा वरिष्ठ पोलीस अधिकारी याकडे लक्ष देतील का ?

----------------------------------------

ज्या गावाला लागुन गिरजा नदी वाहते त्या गावचे पोलीस पाटील , महसुली कोतवाल , तलाठी , ग्रामसेवक या सह सरपंच व लोक प्रतिनिधी यांनी या अवैध वाळू वाहतूकी कडे लक्ष दिले पाहिजे . परंतु तसे होत नाही तेव्हा यासह पोलीस बीट जमादार यांना जबाबदार धरण्यात यावे व तसा सुचना तहसिलदार – जिल्हाधिकारी यांनी दिल्यास व वारंवार वाळु चोरी करतांना पकडलेल्या वाहनावर आर टी ओ अधिकाऱ्यांनी निलंबनाची व नंबर नसलेल्या वाहनावर कार्यवाही केल्यास अवैध वाळु – मुरुम उपशावर नक्कीच आळा बसेल असे मत जाणकार व्यक्त करत आहे .





# अवकाळीमुळे गहू, मका, हरभऱ्याचे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील झालेल्या अवकाळी पावसाने रब्बी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मागील पंधरा दिवसांपासून केव्हाही येणाऱ्या अवकाळी पावसामुळे तालुक्यातील रब्बी पिकांना फटका बसला असून, शेतकरी आर्थिक संकटात आले आहे.गहू, हरभरा, मका, मिरची, कांदा,आदी पिकांचे नुकसान झाले आहे. गणोरी ,रिधोरा, कोलते टाकळी ,वडोदबाजार,बाबरा, तळेगाव , खामगाव या परिसरातील गहू, हरभरा ,मका पीक काढण्यायोग्य झाला आहे. पण, निसर्गाच्या वक्रदृष्टीमुळे हाती आलेले पीकाचे प्रचंड नुकसान झाले आहे .त्यामुळे गोरगरीब, शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. फुलंब्री तालुक्यात अवकाळी पाऊस झाल्यामुळे हातातोंडाशी आलेला घास हिरावल्या गेल्यामुळे महसूल विभागाने तातडीने पंचनामा करुन नुकसान भरपाई देण्याची मागणी परिसरातील शेतकरी करीत आहे. आणि गेल्या पाच ते सात दिवसापासुन शासकीय कर्मचारी संपामुळे शेतकरी हैराण झाले आहे .या परिस्थिती दाद कोणाकडे मागावी असा प्रश्न पडला आहे .गणोरी येथील शेतकरी दादासाहेब पांडुरंग गायकवाड ,भाऊसाहेब चव्हाण ,सुदाम तांदळे ,यांचा प्रचंड गव्हाचे नुकसान झाले आहे.

अवकाळी पाऊसाने शेतकऱ्याचे गहु, मका ,हरभरा, मिरची , कांदा यांचे प्रचंड नुकसान झाले असुन तरी मा . मुख्यमंत्री साहेब यांनी लवकरातलवकर जिल्हाधिकारी यांना आदेश देऊन महसुल विभाग यांचा संप तात्काळ स्थगित करुन पंचनामे करण्याचे आदेश देऊन शेतकऱ्यांना तत्काळ नुकसान भरपाई द्यावी .

**सुदाम गायकवाड, प्रहार संघटना उपजिल्हाध्यक्ष छ .संभाजीनगर**

# भोकरला सार्वजनिक भीम जयंती मंडळाची समिती जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** विश्वभूषण भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या सार्वजनिक जयंती महोत्सवाच्या अध्यक्षपदी सम्राट हिरे तर सचिव दलीत डोंगरे याची रविवारी ( ता १९ )एकमताने निवड करण्यात आली आहे.

येथील शासकिय विश्रामगृह येथे भारतीय बौद्ध महासभेचे शहर अध्यक्ष साहेबराव मोरे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली.यावेळी भिमराव दुधारे , सिद्धार्थ जाधव , जयभीम पाटील यांची प्रमुख उपस्थीती होती.नूतन पदाधिकारी म्हणून अध्यक्षपदी सम्राट हिरे, उपाध्यक्ष आनंद ढोले, प्रबुद्धभारत ( मुन्ना )कावळे,सचिव दलीत डोंगरे कोषाध्यक्ष प्रशांत हनमते , सहकोषाध्यक्ष कपील कांबळे, संघटक अविनाश गायकवाड, सहसचिव संतोष डोगरे, सहसंघटक संघदिप वारघडे,कार्यअध्यक्ष मनोज शिंदे, प्रसिद्धी प्रमुख सर्व पत्रकार, सल्लागार एल.ए.हिरे, साहेबराव मोरे,भिमराव दुधारे, ॲड. सिद्धार्थ कदम, बाबुराव पाटील, मनोज गिमेकर, बि. आर. पांचाळ, सुरेश कावळे, गौतम कसबे, सिध्दार्थ जाधव, जयभीम पाटील, विक्रम क्षिरसागर, सुनिल कांबळे ,देवा हटकर, दिलीप राव, मधुकर गौवंदे, भिमराव भंडारे, संदीप लोमटे ,माणिक जाधव, दिगांबर कांबळे, राहुल सोनकांबळे ,श्रीधर घुले ,सुभाष तेले ,शिवाजी गायकवाड , ॲड. आर. के. कदम, भिमशाहीर बाबुराव गाडेकर, सुंधाशु कांबळे, राजु दांडगे ,संदीप गायकवाड, ॲड. अंबादास काळे आदिनाथ चिंताकुठे आदिची निवड करण्यात आली तर सदस्य, जितेद्र कोकाटे, कुलदिप क्षिरसागर , करण कांबळे , रोहन मोरे, विक्रम डोंगरे , संजय धुमाळे , मिलींद दुधारे, प्रसेनजीत पाटील , सुनील दुधारे, अदित्य वाघमारे आदिची निवड करण्यात आली.

# तब्बल ३३ वर्षानंतर गणोरी येथील वर्गमित्र आले एकत्र

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** जिल्हा परिषद शाळा गणोरी दहावी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी- विद्यार्थिनी सन १९९० ची बॅच तब्बल ३३ वर्षानंतर स्नेह मिलन सृष्टी हॉटेल अँड ॲग्रो टुरिझम, जिकठाण फाटा नगर रोडवर मोठ्या उत्साहात पार पडला. महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून जय जय महाराष्ट्र माझा या गीताला अनुसरून कार्यक्रमास सुरुवात केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेचे हेडमास्टर पुराणिक सर व प्रमुख उपस्थिती काळे सर त्यांच्या सोबत मुक्तार सय्यद, देविदास जाधव यांना सर्वांनुमते व्यासपीठावर आमंत्रित करून विराजमान करण्यात आले. त्यानंतर प्रत्येक विद्यार्थी-विद्यार्थिनी अध्यक्ष व प्रमुख उपस्थिती सरांचे सर्वांनी शाल पुष्पगुच्छ श्रीफळ देऊन स्वागत केले. वास्तविक पाहता दोन वर्षांपूर्वी "स्कूल फ्रेंड" असा व्हाट्सअपग्रुप तयार करण्यात आला होता त्या ग्रुपमध्ये एकूण शिक्षक विद्यार्थी व विद्यार्थिनी एकूण ७१ मेंबर आहेत ग्रुप ॲडमिन एक विद्यार्थी प्रकाश, एक विद्यार्थिनी सुनिता आहे तरी याचा श्रेय सर्वांना दिला जातोय. आणि म्हणून विद्यार्थी व विद्यार्थिनी आपापले शाळेतील अनुभवाच्या व आजच्या घडीतील व आपल्या परिवार व्यवसाय बद्दल व जीवनातील अनुभवा च्या माध्यमातून "कोणी हसवलं, तर कोणी रडवलं"असं एकंदरीत मनोगत व्यक्त करीत असताना आपल्या डोळ्यातून अश्रू आणि आनंदाचा हसमुख चेहरा जणू काय अठरा वर्षाचे आतले कालांतरात आहे असे मग्न होऊन सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी रमुन गेलेले दिसले. शेवट हेडमास्टर पुराणिक सर, काळे सर यांनी मोलाचे मार्गदर्शन करून अंतिम राष्ट्रगीत गाऊन कार्यक्रमास पूर्नविराम दिला. सूत्रसंचालन सचिन महाजन व रोहिदास जाधव यांनी शब्दसुमनाने सर्वांचे आभार व्यक्त केले. शेवट- रेल्वे राईड, ट्रॅक्टर राईड, रेन डान्स, डीजे /अँकर, ग्राउंड फन गेम, -चहा नाश्ता, जेवणात- पुरणपोळी, मांडे, आमरस, आमटी, आलू मटर, चपाती, पापड, भजे कुडीचा स्वाद घेऊन कार्यक्रमास अंतिम रूप देण्यात आला. यावेळी, मुक्तार सय्यद, प्रकाश भालेराव,



सचिन महाजन, ईनुस शहा, धनंजय उदगे, सोमीनाथ उबाळे, रामदास धुमाळ, रामराव उबाळे, साहेबराव सोनवणे, सोमीनाथ चव्हाण, सुभाष जाधव, सिकंदर नखी आली, सुरेश गायकवाड, कृष्णा गायकवाड, भाऊसाहेब चंद्रे, पुष्कर तिवारी, ज्ञानेश्वर वाघचौरे, शिवाजी फतपुरे, ज्ञानेश्वर गायकवाड, दादाराव पेहरकर, देविदास जाधव, बाळकृष्ण अंभोरे, सोमीनाथ जाधव, भास्कर नलावडे, बंडू सपकाळ, अक्रम पठाण, बाळू पेहरकर, सत्तार सय्यद, ज्ञानेश्वर रेणुके, सुनिता, कमल, शारदा, सीमा, शोभा, मिसेस महाजन व इतर पन्नास प्लस माजी विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.




# कै. अण्णासाहेब पाटील जयंतीनिमित्त काव्यवाचन व गीतगायन स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपळनेर :** येथील कर्म.आ.मा.पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात कै.अण्णासाहेब एन.के.पाटील यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळण्यासाठी व लेखन कौशल्य विकसित होण्यासाठी स्वलिखित काव्यवाचन व गीतगायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा.के.डी.कदम हे होते. यावेळी विचार मंचावर महाविद्यालयाचे माजी प्रभारी प्राचार्य डॉ.पी.के.अहिरे तसेच डॉ. सतीश मस्के, प्रा.के.एन.वसावे, प्रा.एल.जे.गवळी, प्रा.व्ही.जी. उगलमुगले व डॉ.ए.जी. खरात आदी उपस्थित होते.

महाविद्यालयात पार पडलेल्या काव्यवाचन व गीत गायन स्पर्धेची सुरुवात कै. अण्णासाहेब एन.के. पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.काव्यवाचन स्पर्धेचे प्रास्ताविक प्रा.डॉ. आनंद खरात यांनी केले तर गीतगायन स्पर्धेचे प्रस्ताविक प्रा.एल.जे. गवळी यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थी विद्यार्थिनींनी या स्पर्धेत भाग घेऊन काव्यवाचन व गीतगायन सादर केले. यावेळी माजी प्राचार्य प्रा.डॉ.पी.के.अहिरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्याचबरोबर अध्यक्षीय समारोप करताना प्रभारी प्राचार्य प्रा. के.डी.कदम म्हणाले की, विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेत भाग घेऊन आपले व्यक्तिमत्व घडविणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी आपली कला सादर केली पाहिजे. यावेळी त्यांनी काही चारोळ्या सांगुन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या काव्यवाचन स्पर्धेत प्रथम दीपक सूर्यवंशी, द्वितीय नवशा भारुडे, तृतीय विशाल मालुसरे व उत्तेजनार्थ निकिता भदाणे यांनी क्रमांक पटकाविला.

गीतगायन स्पर्धेत प्रथम पवन निकम, द्वितीय धनश्री गवांदे, तृतीय हर्षदा अहिरराव यांनी क्रमांक पटकाविला. परीक्षक म्हणून प्रा.व्ही.जी.उगलमुगले व प्रा.एल.जे.गवळी यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. सतीश मस्के यांनी केले तर आभार सांस्कृतिक विभागाचे प्रमुख प्रा.के.एन.वसावे यांनी मानले. यावेळी अमेरिकेत व इतर ठिकाणी पुरात,वादळात मृत्यू पावलेल्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाला प्रा. राऊत, प्रा. तोरवणे, प्रा.बळसाने, डॉ.नेरकर,प्रा.जाधव, डॉ.मोरे, डॉ.खोडके, डॉ.तलवारे, डॉ.नांद्रे, डॉ.सोनवणे,प्रा.घरटे,प्रा.सावळे तसेच विद्यार्थी व विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

# बुथ सशक्तीकरण अभियान अंतर्गत आज प्रशिक्षण वर्गाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** आमदार प्रशांत बंब साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले असून या प्रशिक्षण वर्गात जिल्हा चिटणीस ज्ञानेश्वर नलावडे, तालुकाध्यक्ष प्रकाश वाकळे,उपनगराध्यक्ष सुरेश मरकड,सभापती गणेश अधाने यानी मार्गदर्शन केले. यामध्ये बुथवर जाऊन बुथ कमिटीची यादी तयार करून पन्ना प्रमुखाची नियुकी करणे, बुथ स्तरावर 11 लोकांची प्रमुख कमिटीवर नियुक्त करणे, अल्प विस्ताराची नेमणूक करण्यात आली. वॉटस ॲप ग्रूप तयार करणे, अशा अनेक विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

या प्रशिक्षण वर्गास भाजपा तालुका अध्यक्ष प्रकाश वाकळे, जिल्हा सरचिटणीस ज्ञानेश्वर नलावडे, उपनगराध्यक्ष सुरेश मरकड, सभापती गणेश नाना अधाने, शहर अध्यक्ष सतिश दांडेकर, दिनेश अंभोरे, परसराम बारगळ, योगेश बारगळ, प्रभाकर शिंदे, युवराज ठेंगडे अविनाश कुलकर्णी, राहुल निकुंभ, काशिनाथ तुपे शंकर अंभोरे बालुभाऊ नलावडे सतिश अहेवाड, रावसाहेब देशमुख अंकुश काळे दिनेश कायस्थ, किशोर भावसार, प्रदीप निकम सोनू लोनके,वसीम शेख चंद्रकांत गोरे अशोक तुपे मोहन तुपे गोविंद काळे, किरण बोडखे, प्रवीण बारगळ शिवनाथ गायके अविनाश वेताळ, मुक्तार पठाण सुमित चाबुकस्वार, राजू बारगळ संतोष घुसिंगे, अनिल करपे सुरेश मालोदे, सुभाष चव्हाण, भगवान काकडे, प्रेमसिंग जोनवाल, सुभाष चव्हाण, किरण बोडखे, सत्तार पटेल, सय्यद अफसर, रामेश्वर वेताळ, राजु बारगळ, चंद्रकांत गोरे,सुमित चाबुकस्वार, बबन वर्दे, भागचंद जोनवाल, विजय राठोड, महेंद्र दगडफोडे, गोविंद काळे तसेच तालुक्यातील लोकप्रतिनिधीं, पदाधिकारी, शक्तिकेंद्र प्रमुख, बुथप्रमुख उपस्थित होते.



# हिंदू जनगर्जना मोर्चा; शेकडो आंदोलकांवर गुन्हे दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर नामकरणाच्या समर्थनार्थ आज दुपारी १२ च्या सुमारास क्रांतिचौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून निघालेल्या रॅलीतील शेकडो मोर्चेकऱ्यांनी पोलिसासमोर सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केले. या प्रकरणी क्रांतिचौक आणि वेदांतनगर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झाले आहेत. या मध्ये प्रक्षोभक भाषणे केल्या प्रकरणी हैदराबादचे माजी आ. टी राजासिंग व सुदर्शन टी.व्ही चे सुरेश चव्हाणके यांच्या वर क्रांतिचौक पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झाले आहेत तर रॅली ला परवानगी नसताना रॅली काढण्यात आल्याचा गुन्हा इतर १३ जनाविरुध्द दाखल झाला आहे अन्य शेकडो मोर्चे कारयांवर शहर बसेसचे नुकसान, बँकांचे व इतर प्रतिष्ठाण फोडून लाखो रु चे नुकसान केल्या प्रकरणी गुन्हे दाखल झाले आहेत आज दुपारी १२ च्या सुमारास निघालेल्या या रॅली मध्ये अंदाजे २० हजार समर्थकांनी भाग घेतला होता. अशी माहिती वरिष्ठ सूत्रांनी दिली या मध्ये प्रामुख्याने सहकार मंत्री अतुल सावे, पालक मंत्री तथा रोहयो मंत्री संदीपान भुमरे यांचाही समावेश होता छत्रपती संभाजीनगरातील सर्व तालुक्यामधून तसेच जालना जिल्ह्यातूनही कार्यकर्ते उस्फुर्तपणे रॅली मध्ये सहभागी झाले होते. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ , देवगिरी प्रतिष्ठानचे विनोद पाटील , अभिजीत देशमुख यांनी या रॅली चे आयोजन केले होते या रॅलीची सांगता औरंगपुऱ्यात झाली . पोलीस आयुक्त डॉ. निखिल गुप्ता यांनी या रॅलीला परवानगी नाकारली होती तरीही रॅली निघण्याचे चिन्ह दिसत असल्यामुळे पोलीस उपायुक्त अपर्णा गीते, दीपक गिर्हे, शिलवंत नांदेडकर यांची रॅलीवर निगराणी होती या वेळी प्रभारी सहाय्यक पोलीस आयुक्त अविनाश आघाव, हे संपूर्ण फौजफाट्यासह बंदोबस्तात सहभागी झाले होते.

# कांदा उत्पादक शेतकऱ्यांची थट्टा थांबवा; स्वाभिमानीचा नारा

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**दिंडोरी :** तालुक्यातील शेतकरी सध्या मोठ्या आर्थिक कोंडीत असताना अवकाळी वातावरणांने शेतकरी वर्गाची नुकसान करून एक प्रकारे आर्थिक कणांचा मोडला आहे. त्यामुळे बळीराजांला सावरण्यासाठी लोकप्रतिनिधी ची भुमिका काय? यावर प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे. दिंडोरी तालुक्याला शेती पिकांतील पंढरी म्हणून संपूर्ण जिल्ह्यात नावलौकिक आहे. पण येथील शेतकरी वर्ग आपली शेती करतांना कोणत्या संकटांचा सामना रात्रंदिवस करतो याकडे मात्र काना डोळा होतांना दिसत असल्याने शेतकरी वर्गाला आधार देण्याऐवजी आर्थिक खाईत लोटले जातानांचे चित्र सध्या तालुक्यात पाहायला मिळत आहे. आपल्या भारत देशाला कृषीप्रधान देश म्हणून ओळखले जाते आणि त्याच भारत देशातील शेतकऱ्यांना आपल्या न्याय हक्कासाठी तसेच आपल्या शेतीमालाला भाव मिळण्यासाठी रस्त्यावर येऊन आंदोलन करावी लागतात ही मोठी शोकांतिका आहे. सध्या अवकाळी वातावरणांने कांदा, गहू, हरभरा, द्राक्षे व भाजीपाला इ.ची पुर्णपणे वाट लावली आहे. त्यात प्रत्येक मालाचे भाव हे गडगडल्याने कर्जाच्या डोंगरांखाली बळीराजा सापडला आहे. सध्या तर शासनाच्या कांदा अनुदानांवरून तर शेतकरी बांधवाकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. त्यामुळे जगाचा पोशिंदा असणारा बळीराजा अजून किती दिवस डोळ्यातील अश्रु गाळत राहाणार? असा संताप जनक सवाल शेतकरी वर्गातुन निघत आहे.





राज्य सरकारने कांदा उत्पादक शेतकऱ्यांना प्रति क्विंटल ३०० रुपये अनुदान जाहीर केले वास्तविक पाहता लाल कांद्याचा उत्पादन खर्च प्रतिक्विंटल १००० ते १२००रुपये पेक्षा अधिक आहेत अशा परिस्थितीमध्ये कांदा उत्पादक शेतकऱ्यांना ३०० रुपये अनुदान देऊन राज्य सरकारने शेतकऱ्यांची थट्टा केली असून शेतकरी वर्गाला आधार देण्याऐवजी आर्थिक खाईत टाकले आहे . जोपर्यंत शेती क्षेत्राला उद्योगिक दर्जा प्राप्त होत नाही आणि शेतकऱ्यांच्या मालाला भरीव स्वरूपात भाव मिळत नाही तोपर्यंत शेतकऱ्यांचा विकास होणार नाही आज सरकार आणि शेतकरी यांच्यात थेट संघर्ष पाहिला मिळतोय राजकारणाचा कुकर त्यातून येणाऱ्या आश्वासनाच्या शिट्ट्या आणि त्यात शिजणाऱ्या भ्रष्टाचाराच्या खिचडीमुळे माझ्या शेतकरी वर्गाचे पोट आजपर्यंत कधीच भरू शकलं नाही या सरकारच्या काळातील दयनीय अवस्था आहे . त्यात अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे द्राक्ष, कांदा, सोयाबीन यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे शेतकरी हवालदिल झाला आहे शेतकरी मोठ्या संकटांना तोंड देत आहे कधी या राज्य सरकारला शेतकऱ्यांच्या समस्यांची किंव येईल या राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या समस्या जाणून नाही घेतल्या तर मोठ्या प्रमाणात आत्महत्यांचे प्रमाण वाढेल .

**संदीप सजनराव उफाडे, स्वाभिमानी शेतकरी संघटना दिंडोरी तालुकाध्यक्ष**

# कुठल्याही पदाच्या अपेक्षेने पक्षात आलो नाही

## भाऊसाहेब पाटील चिकटगावकर : प्रामाणिकपणे काम करणार

आधुनिक केसरी न्यूज


**वैजापूर :** स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे, यांचे विचार सर्व सामान्य पर्यंत पोहचवून माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) शिवसेना वाढविण्यासाठी जोमाने काम करु कारण मी कुठल्याही पदाच्या अपेक्षाने पक्षात आलेलो नाही त्यामुळे कुठलेही मतभेद न ठेवता प्रमानिक पने पक्षाच काम करणार असल्याचे प्रतिपादन- माजी आमदार भाऊसाहेब पाटील चिकटगावकर यांनी केले वैजापूर तालुक्यातील खंडाळा येथे माजी आमदार भाऊसाहेब पाटील चिकटगावकर यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते या प्रसंगी ते बोलत होते चौफेर फटकेबाजी करत अभंगांमधून तर कधी शेरोशायरी करत उपस्थितीतांचे मने जिंकली

उपजिल्हाप्रमुख संजय निकम, तालुका प्रमुख सचिन वाणी, वंचीत चे तालुकाध्यक्ष सिध्दार्थ तेझाड, विभाग प्रमुख नंदु जाधव, जितेंद्र जगदाळे, विजय दळे आदींची भाषणे झाली. या प्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख संजय निकम, तालुका प्रमुख सचिन वाणी, शहर प्रमुख प्रकाश चव्हाण, वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष सिध्दार्थ तेझाड, युवा तालुकाध्यक्ष गौतम जाधव, शहर प्रमुख जाकीर पठाण, शिवसेना उपतालुकाप्रमुख जितेंद्र जगदाळे, प्रकाश शिंदे, विभाग प्रमुख नंदु जाधव, युवा नेते प्रशांत शिंदे, अक्षय साठे, अमोल बावचे, घनश्याम घायवट, आण्णाभाऊ गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य रमेश बागुल, शिवाजी जाधव, दिनेश थोरात, व्हाईस चेअरमन बाबु खासाब, सुभाष बहाळस्कर, असलम शेख, शाहिर अशोक बागुल, आब्बास शेख, जगन जगदाळे, भारत जगदाळे, शिवाजी जगदाळे, वंचितचे सुधीर बागुल, भैय्या पठारे, कैलास बागुल, अमोल बागुल, शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) संजय सुर्यवंशी, ताराचंद वेळंजकर, मुरली नाना थोरात, बाळासाहेब जानराव, अरुण जाधव, शांताराम वेळंजकर, प्रकाश वाघचौरे, बाळासाहेब मिसाळ, सतिष बागुल, शिवराज पैठणकर, डॉ. मंगेश बहाळस्कर, विक्रम जानराव, प्रकाश आंबेकर, भावराव पवार, कैलास बहाळस्कर, विलास अक्कर, सचिन शिंदे, समाधान बागुल, दिपक पवार, सोपान सुर्यवंशी, सोमनाथ जानराव, राजेंद्र जानराव आदी उपस्थित होते.



# मदतीचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज



**चिखली :** येथील विजय जयसिंग खरे यांच्या नऊ वर्षाच्या मुलीला थैलेसिमिया मेजर या दुर्मिळ आजाराने ग्रासले असून तिला दर पंधरा दिवसांनी रक्त चढवण्यासाठी हॉस्पिटलमध्ये घेऊन जावे लागते. तिच्या उपचारासाठी दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर पुणे येथे तिच्यावर होणाऱ्या बोन मॅरो ट्रान्सप्लांट या शस्त्रक्रियेसाठी 15 लाख रुपये खर्च येणार असून दानशूर व्यक्तींनी पुढे येऊन मदत करण्याचे आवाहन देवयानीच्या कुटुंबीयांच्या वतीने करण्यात आले आहे. ऑपरेशनसाठी लागणारा खर्च हा त्यांच्या आवाक्या बाहेरील आहे. त्यामुळे वैद्यकीय तज्ञांच्या व परभणी येथील थैलासिमिया सोसायटी लक्ष्मीकांत पिंपळगावकर सर यांच्या सल्ल्यानुसार तिला पुणे येथील दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये उपचारार्थ दाखल करावयाचे आहे दरम्यान तिच्यावर बोन मॅरो ट्रान्सप्लांट ही महागडी शस्त्रक्रिया करण्यात येणार असून यासाठी 15 लाखाचा खर्च अपेक्षित आहे एक सामान्य कुटुंबातील माणूस एवढी मोठी रक्कम कुठून आणणार ? हा मोठा प्रश्न सध्या या कुटुंबासमोर आहे त्यामुळे नऊ वर्षाची देवयानी या आजाराशी झगडत असून त्यातून तिला बाहेर काढण्यासाठी समाजातील दानशूर व्यक्तींनी समोर येण्याची गरज आहे मदतीसाठी आपण कु.देवयानी विजय खरे हिच्या गुगल पे किंवा फोन पे नं 9250581008 तसेच एसबीआय अकाउंट नंबर चिखली शाखा 40844464704 IFCE COD SBIN0000349 यावर सढळ हाताने मदत करू शकता.

# दामिनी पथकामुळे टळला बालविवाह

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** वडिलांचा पाच महिन्यापूर्वी मृत्यू झाल्यामुळे अल्पवयीन मुलीचा विवाह करणाऱ्या आईचे दामिनी पथकाने समुपदेशन केले व बालविवाह रोखला. चाईल्ड हेल्प लाईन सदस्य आम्रपाली बोरुडे यांनी दामिनी पथकाच्या पोलिस उपनिरीक्षक अनिता फसाटे यांना शनिवारी सकाळी ११वा. फोन करुन माहिती दिली, की कांचनवाडी परिसरात बालविवाह होत आहे. पीएसआय फसाटे यांनी ही माहिती वरिष्ठांच्या कानावर घालून पुढील कारवाईची परवानगी घेतली व घटनास्थळी दाखल पथकासहित दाखल झाल्या लग्नघरी पोलिस आल्याचे पाहून वऱ्हाडी चक्रावली पीएसआय फसाटे यांनी मुलीचे जन्म दाखले पाहिल्यानंतर मुलीच्या आईला अल्पवयीन मुलीचे लग्न लावण्याचे कारण जाणून घेतले.

वडिल दिवंगत झाल्यावर मुलीचे एक वर्षात लग्न होणे आवश्यक असल्याच्या प्रथेचे पालन आम्ही करंत होतो. असे कारण समोर आले. त्यानंतर पीएसआय फसाटे यांनी प्रथेबरोबर मुलीचे आरोग्यही जपणे महत्वाचे असल्याचे सांगत समुपदेशन केले. व समजपत्र दिले. वऱ्हाडींनी दामिनी पथकाचे म्हणणे ऐकून मुलगी सज्ञान झाल्यावर लग्न लावून देऊ अशी भूमीका घेतली. वरील कारवाई पोलिस निरीक्षक आम्रपाली तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय अनिता फसाटे, पोलिस कर्मचारी मानकर, ताठे, चाईल्ड हेल्पलाईनचे उमेश श्रीवास्तव, बोरुडे यांनी पार पाडली.





# इनरव्हील क्लबच्या वतीने दंत तपासणी, उपचार शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** इनरव्हील क्लब छत्रपती संभाजीनगरच्या वतीने गिरनेर तांडा येथील आनंद निवासी मूकबधिर विद्यालय आणि नाथ निवासी अस्थीव्यंग विद्यालय येथे भव्य दंत आणि रोगनिदान तपासणी आणि उपचार शिबीर आयोजित करण्यात आले होते, या शाळेमधील विद्यार्थ्यांचे दात आणि इतर आजारांबाबत तपासणी करून त्यांना मोफत औषधी देण्यात आल्या.

आरोग्य राहणीमान उंचावण्याच्या उद्देशाने प्रत्येक गरिब व गरजू विद्यार्थ्यांना आरोग्य सुविधा मिळाल्याच पाहिजेत व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय सुविधा उपलब्ध व्हाव्यात हा इनरव्हील क्लब औरंगाबादचा संकल्प आहे. गरिब व गरजू विद्यार्थ्यांना आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देत आहोत. त्यांना निरोगी आणि सशक्त जीवन जगता यावे, म्हून अशा प्रकारचे आरोग्य शिबीर सात्यताने आयोजित करण्यात येत आहेत. ग्रामीण भागामध्ये आर्थिक परिस्तितीमुळे विद्यार्थ्यांना आणि नागरिकांना औषध उपचार मिळत नाहीत म्हंणून दंत आणि रोगनिदान तपासणी, उपचार शिबीर इनरव्हील क्लब औरंगाबाद घेत आहोत.

या कार्यक्रमानंतर आयर्नमॅन नितीन घोरपडे यांच्या चर्चासत्राचे आयोजन चितेगाव येथील औरंगाबाद इलेक्ट्रिकल कंपनीमधील तसेच चाकण व पटनागर ( उत्तरा खंड ) येथील कामगार आणि महिलांसाठी ऑनलाईन कार्यक्रम घेण्यात आला. श्री घोरपडे यांनी स्वतःचे अनुभव यानिमित्ताने सर्वांसोबत शेअर केलेत. त्यांना दारूचे व्यसन लागले होते. त्यामध्ये त्यांचे कुटूंब कसे भरडले गेले व त्यातून ते कसे सावरले व आता ते कसे फिट आहे. याबद्दल त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. औरंगाबाद ईलेक्ट्रीकल कंपनीमधील १०० च्यावर कामगार व महिला उपस्थीत होत्या.

इनरव्हील क्लब, औरंगाबाद माजी अध्यक्ष सौ. लता मुळे, अध्यक्ष सौ. उषा भोयर, मंगल चव्हाण, इना नाथ, माधुरी अहिरराव, आशा भांड, रेखा केदारे, हिरा पेरे पाटील, पुष्पा राणा, वृषाली उपाध्ये, इंदुताई, CSMSS आयुर्वेद महाविद्यालय आणि दंत रुग्णालय डॉ. नरेश निबाळकर, डॉ. नवीन शाहू, डॉ. आनंद जटाळ, डॉ. पराग डहाके, डॉ. सुप्रिया पाटील, डॉ. पूजा प्रधान, नर्स आणि गावातील नागरिक उपस्थित होते.

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर



# २५ मार्चला होणारी विद्यापीठाची सत्रान्त परीक्षा पुढे ढकलण्यात यावी : अभाविप

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभातीनगर :** MBA-CET चा पेपर २५ मार्च रोजी असल्याने विविध महाविद्यालयातील अनेक विद्यार्थी या परीक्षेसाठी बसलेले आहेत, परंतु सिईटीच्या पेपर दिवशी विद्यापिठाची सत्रांत परीक्षा आल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले, यामुळे विद्यार्थ्यांचे कुठलेही शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी अभाविपच्या कार्यकर्त्यांनी विविध महाविद्यालयाच्या परीक्षार्थींना सोबत घेऊन परीक्षा संचालक गणेश मंझा यांची भेट घेतली, एमबीए सिईटीचा पेपर व विद्यापिठ सत्रांत परीक्षा एकाच दिवशी आल्यामुळे विद्यार्थी अडचणी सापडला आहे, त्यामुळे २५ मार्चची होणारी विद्यापीठ सत्रांत परीक्षा पुढे ढकलण्यात यावी, यासाठी अभाविपच्या वतीने परीक्षा संचालक यांना निवेदन देण्यात आले. यावेळी अभाविप जिल्हा संयोजक उमाकांत पांचाळ, नगरमंत्री चिन्मय महाले, प्रतीक भोसले, प्रेमराज वारे, श्रीराम नाटकर, उमा जोशी उपस्थित होते.

# पंधरा ते वीस वर्षांपासून महिलांची पाण्यासाठी भटकंती

## अडीच कि.मी.वरून आणावे लागते पाणी



आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील नांद्रा हवेली हे गाव पाण्यासाठी महिलांची धावाधाव नांद्रा हवेली हे गाव चार ते पाच हजार लोकसंख्येचे गाव असून या ठिकाणी गावामध्ये नियमित पाणी येत नसल्याची तक्रार महिलांनी ग्रामपंचायत मध्ये अनेक वेळा दिलेली होती पण ग्रामपंचायत मधून त्यांना सरपंच ग्रामसेवक यांनी फक्त उडवा उडवी चे उत्तरे देऊन मोठी मोठी आश्वासने दिलेली आहेत. पण आज महिलांनी कंटाळून मोठा संताप एकत्रित येऊन व्यक्त केला आहे. या गावाची कथा म्हणजे या महिलांना पंधरा ते वीस वर्षांपासून सारखे डोक्यावर दोन अडीच किलोमीटर अंतरावरून पाणी आणावे लागते महिलांना अगोदरच सकाळी भरपूर काम असतात सर्व कामधंदे सोडून त्यांना डोक्यावर पाणी आणावं लागतं मजूर वर्ग असल्यामुळे त्यांना खूप त्रास सहन करावा लागतो दिवसभर शेतात कामाला जायच आणि संध्याकाळी परत कामावरून आल्यानंतर घरात पाणी नसल्यामुळे पाणी आणावाच लागतं कारण पाण्याशिवाय कुठलीच काम होत नाही आणि गावात नळाला पाणी येतच नाही करायचं तरी काय असा संतप्त सवाल या नांद्रा हवेली गावच्या महिलांनी व्यक्त केला असून या संदर्भात महिलांनी ग्रामसेवक ईश्वर माळी व सरपंच यांना अनेक वेळा आपल्या अडचणी सांगितल्या पण ग्रामसेवक ईश्वर माळी व सरपंच यांनी त्यांची कुठलीही हाक कानावर घेतली नसून त्यांना फक्त भूल थापा देण्याचं काम केलेलं आहे. पण आता मात्र महिलांनी मोठ्या संख्येने एकत्र येऊन चांगलाच आक्रोश व्यक्त केलेला आहे आता तरी आम्हाला लवकरात लवकर पाण्याची व्यवस्था करून द्यावी अशी मागणी या गावच्या सर्व महिलांनी व ग्रामस्थांनी केली आहे.



# कराळे नवोपक्रम पुरस्कारने  सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा मल्हारा पं. स. अचलपूर  येथील आदर्श शिक्षक बबलू विनायकराव कराळे यांना डाएड अमरावती तर्फे राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे द्वारा आयोजित नवोपक्रम स्पर्धा 2022 -23 करिता उपक्रमशील शिक्षक म्हणून सन्मानित करण्यात आले. राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेमध्ये कराळे यांचा अमरावती जिल्ह्यामधून पाचवा क्रमांक आला त्यामुळे त्यांना डाएड अमरावतीकडून उपक्रमशील शिक्षक म्हणून सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाला  मिलिंद कुबडे ( प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अमरावती ) डॉ. विजय शिंदे ( अधिव्याख्याता संशोधक विभाग प्रमुख जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अमरावती ) डॉ. खाडे, डॉ. क्षत्रिय सर, पाटणकर मॅडम ( शिक्षणाधिकारी अकोला ) यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. या करिता शाळेतील मुख्यध्यापिका शीला सोळंके, केंद्रप्रमुख श्रीकृष्ण उघडे, कल्पना चौधरी, बबिता पंडीत, रुपलाल बेठे, किरण साकरकर, रश्मी पानझाडे यांनी  शुभेच्छा दिल्या.

# परतूर येथील कुरुक्षेत्र कुंड ऐतिहासिक वारसा स्थळाकडे पुरातन विभागाचे दुर्लक्ष

आधुनिक केसरी न्यूज



**सुरेश कवडे**

**परतूर :** या शहराचे जुने ऐतिहासीक नाव हे प्रल्हादपुर असून कालांतराने प्रल्हादपुरचे नामांतर परतूर असे झाले असले तरी परतूर येथिल गावभागात पुरातन ईतिहासाची साक्ष देणाऱ्या अनेक वास्तू आज रोजी कश्याबश्या तग धरून आहेत . या वास्तूंची देखभाल दुरुस्ती करून त्यांना जोपासन्यांची अत्यंत आवश्यकता आहे .या पुरातन कुंड कुरुकक्षेत्र स्थळांविषयी अनेक व्याख्यिकिंका सांगितल्या जातात.

असे ही बोलले जाते की , भक्त प्रल्हाद यांनी हिरण्यकश्यपचा वध करून कुरुकक्षेत्र या पुरातन कुंडात आपले हात धुतले होते. अश्या अनेक ऐतिहासीक खुना खाना या ऐतिहासीक स्थळाविषयी   जोडल्या गेलेल्या आहेत . शहरातील काही नवतरूण हिंदू तरुणांनी या ऐतिहासीक कुंडाची स्वइच्छेणे देणगी करूण तापुरती डागडुगजी करुण या स्थळांची शोभा वाढवली त्यामुळे शहरातील भक्तगणांचे लोळगे वाहु लागले आहेत . तरी अश्यातय परतुर येथील या ऐतिहासीक ठिकांनांवर अनेक भूमाफियांनी बेकायदेशीर बांधकाम , कब्जे केले असून ते त्वरीत काढुन त्यांच्यावर योग्य ति कारवाई करावी सशी मागणी शहरातील अनेक हिंदू बांधवांतून होत आहे. त्याच बरोबर स्थानिक लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेऊन या ऐतिहासिक स्थळे यांना विविध योजनेतून फंड आणून विकासकामे मार्गी लावावेत. अशी मागणी शहरवासीयांकडून होत आहे. तरी परतूर शहरातील या ऐतिहासीक वांस्तूवर पुरातन विभागाने जातिने लक्ष घालावे या ऐतिहासोक वास्तूंची देखभाल व दुरुस्ती करावी.

# नुकसानग्रस्तांचे तत्काळ पंचनामे करा

## आमदार समाधान आवताडे



आधुनिक केसरी न्यूज

**ज्योती खिलारे**

**पंढरपूर :** अवकाळी पावसाने व गारपिटीने नुकसान झालेल्या शेत पिकांचे तात्काळ पंचनामे करुन अहवाल सादर करावा, अशा सूचना आमदार समाधान आवताडे यांनी आज दिल्या. पंढरपूर तालुक्यात अवकाळी पाऊस तसेच गारपिटीने नुकसान झालेल्या शेत पिकांची पाहणी केल्यानंतर ते बोलत होते. पंढरपूर तालुक्यातील गोपाळपूर येथील लेंगरे वस्ती, मस्के वस्ती तसेच मुंडेवाडी व कोंढारकी येथील नुकसानग्रस्त द्राक्ष, आंबा, गहू आदि पिकांची पाहणी केली. यावेळी त्यांच्या समवेत प्रांताधिकारी गजानन गुरव, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी बाळासाहेब शिंदे, तहसिलदार सुशिल बेल्हेकर, गटविकास अधिकारी प्रशांत काळे, तालुका कृषि अधिकारी भागवत सरडे, मंडळ अधिकारी बाळासाहेब मोरे तसेच तलाठी, ग्रामसेवक, कृषि सहायक उपस्थित होते.

पंढरपूर तालुक्यात साडेबाराशे हेक्टर फळपिकांचे तर गहू, हरभरा, मका या इतर पिकांचे असे मिळून एकूण 1800 हेक्टर पिकांचे शनिवारी आलेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीने नुकसान झाले आहे. या पार्शवभूमीवर आमदार समाधान अवताडे यांनी अधिकाऱ्यांसमवेत शेतशिवाराला भेट देवून पाहणी केली. अवकाळी पाऊस व गारपिटीने हातातोंडाशी आलेले आलेले पीक उद्ध्वस्त झाले आहे. सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन ठामपणे उभे असून तात्काळ मदतीची मागणी करण्यात येईल, असेही आमदार आवताडे यांनी सांगितले.

पंढरपूर तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतपिकांचे तात्काळ पंचनामे सुरु करण्यात आले असून, नुकसानग्रस्त पिकांचा अहवाल शासनास लवकरात लवकर शासनास सादर करण्यात येईल, असे प्रांताधिकारी गजानन गुरव यांनी सांगितले. अचानक आलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे संपकरी कर्मचारी हे पंचनामा करण्यासाठी कर्तव्यावर हजर झाले असल्याचेही गुरव यांनी सांगितले. सोलापूर जिल्ह्यातील आठ तालुक्यातील 104 गावांमध्ये गारपिटीमुळे शेतीचे नुकसान जिल्ह्यात एकूण 3469 हेक्टर क्षेत्र नुकसानग्रस्त  सोलापूर जिल्ह्यातील आठ तालुक्यातील 104 गावांमध्ये गारपीट व पावसामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. यामध्ये सुमारे 3 हजार 469 हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले असून 4 हजार 500 शेतकरी हे बाधित झाले आहेत. अवकाळी पावसाने व गारपिटीने आंबा, पपई, टरबूज, कलिंगड, द्राक्ष अशा फळबागांचे तर ज्वारी, गहू, हरभरा अशा पिकांचे मोठे नुकसान झाले. सर्व नुकसानग्रस्त परिसराचे पंचनामे कृषि विभागाकडून सुरू करण्यात आले असल्याचे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी बाळासाहेब शिंदे यांनी सांगितले.

# आधारवड फाउंडेशनच्या वतीने ऊसतोड कामगारास मदतीचा हात

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** तालुक्यातील रामगव्हाण येथील स्थलांतरीत ऊसतोड कामगार भीमराव गायकवाड यांच्या घराला बुधवार ८ मार्च २०२३ रोजी दुपारी आकस्मिक आग लागुन घरातील सर्व धान्य, कपडे आणि कौटुंबीक साहित्य जळुन नष्ट झाले होते. सुदैवाने त्यावेळी या कुटुंबातील सर्वजन ऊसतोडी साठी बाहेर असल्यामुळे जिवीत हानी टळलेली होती.  सदर कुटुंबात गायकवाड पती-पत्नी आणि मुलगा, सुन व ३ लहान नातवंड आहेत. अचानक ओढावलेल्या या संकटामुळे कुटुंबाला दररोज च्या २ वेळ जेवनाची देखील अडचण निर्माण झालेली होती. गावातील युवक योगेश गुंजकर ह्याने आधारवड फाऊंडेशन ( परतुर ) संस्थेकडे या कुटुंबाची व्यथा मांडुन मदतीची विंनती केली होती.

त्यास अतिशय संवेदनशीलपणे प्रतीसाद देत आधारवड फाऊंडेशन चे सदस्य संतोष खंडागळे, माऊली गुंजकर ह्यांनी शनीवार १९ मार्च रोजी सदर कुटुंबाची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना पुढील किमान २ महिने पुरेल असे किराणा साहित्य ( रु. ७८४७ बाजार मूल्य ) सुपुर्द केले आहे.

शेजारच्या परतुर तालुक्यातुन मदतीसाठी हात पुढे आले असतांना घनसांगवी तालुक्यातील सुजान नागरिक देखील या गरीब कुटुंबास प्रशासकीय व वैयक्तिक पातळींवर नक्कीच मदत करतील अशी अपेक्षा आधारवड फाऊंडेशन चे अध्यक्ष श्याम वाढेकर ह्यांनी व्यक्त केली आहे.



# प्रा. पांडुरंग आठवले : मनमिळावू व्यक्तिमत्त्व

आधुनिक केसरी

**प्रा.पांडुरंग आठवले यांच्या 20 मार्च 2023 रोजीच्या द्वितीय स्मृतिदिनी अलिम शेख,पोलीस कॉन्स्टेबल नांदुरा रेल्वे, बुलढाणा यांनी व्यक्त केलेले भावस्पर्शी विचार नि आठवणीतले क्षण. सुख आणि दुःख,ह्या नाण्याच्या दोन बाजू समजल्या तर अशी दुःखद घटना घडेल आणि नाणे आपल्याला न पचनाच्या बाजूला फिरेल हे न उलघडणारे कोडेच म्हणावे लागेल.**

तो लहान पणा पासूनच हुशार ,सय्यमी ,नेतृत्व गुण संपन्न, चांगला वक्ता होता ,एकदम शांत मनमिळाऊ ,चांगला लेखनिक ,मार्गदर्शक आणि आज्ञाधारक असा विद्यार्थी, जीवलग मित्र, मोठा भाऊ, माझ्यासाठी एका शिक्षकाची भूमिका पार पाडणारा होता. प्रा. पांडुरंग आठवले आणि मी एकाच वर्गात शिकलो काही दिवस गाडेगांव- सावरगाव च्या शाळेत, नंतर न्यू इरा जळगांव जामोदला, आम्ही इयत्ता आठवीत असतांना दांडगे सर आम्हाला इंग्रजी भाषा व विषय शिकवायचे ,सरांनी आम्हाला गृहपाठ दिला शुद्धलेखन आणणे आणि दुसऱ्या दिवशी ज्या वेळी शिक्षकांनी आमच्या नोटबुक बघितल्या तर त्यामध्ये आमच्या वर्गातून अ श्रेणीचा रिमार्क माझ्या बाजूला बसणाऱ्या माझ्या मित्रालाच मिळाला, हे पाहून मला पण बरे वाटले होतेच पण काय करावे काही दिवसातच त्याने शाळा सोडून दुसऱ्या शाळेत दाखला घेतला मला वाटते खामगावला ,पण नंतर तो डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात शिकत आहे हे समजल्यावर मला खूप आनंद झाला होता कारण त्यावेळी गावापासून जळगांव जामोदला शाळेत जायला एस. टी. बस च्या भाड्याने जाण्या-येण्याची आमची आर्थिक परिस्थिती नव्हती. आमच्या तालुक्यातील प्रसिद्ध असलेला आसलगाव बाजार प्रत्येक मंगळवारी असायचा तर पांडूरंग हा जेंव्हा केंव्हा येईल, तेंव्हा आमच्या घरी नेमाने यायचा, माझ्या कुटुंब व परिवाराशी पांडूरंग चा खूप स्नेह होता, आमच्या नात्यातील व कौटुंबिक सदस्य असल्यासारखा पांडूरंग सर्वांशी प्रेमाने वावरत असे.एक दिवस माझ्या आई- बाबांनी मला विचारले की,"बेटा तू पांडू से बोलता रे ,काह है वो ,क्या कर रहा आता नहीं क्या गाव मे, आया तो बोल उसको माँ बुला रही कर के" यावर मी माझ्या आईबाबांना सांगितले की,आता तो औरंगाबादला शिकत आहे ,गावात कधी- कधी येतो पण मी त्याच्याशी बोलतो,नंतर काही दिवसांनी मी पोलीस प्रशासनात भरती झालो, त्यानंतर सोलापूरला प्रशिक्षण घेणे करिता गेलो त्या एका वर्षात त्याला



मी जवळपास विसरून गेलो होतो पण नंतर मी प्रशिक्षण पूर्ण करून आल्यावर बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा पोलीस ठाण्यात बदली झाली तर एक दिवस मला रेल्वे स्टेशन चौक मध्ये समोर चालत असलेला माझा मित्र दिसला मी त्याला जोराने हाक मारली "पांडू"(पांडुरंग), (आम्ही लहानपणापूनच पांडू असच म्हणत होतो ) लगेच त्याने मागे वळून पाहिले आणि हसतंच माझ्याकडे आणि मी त्याच्याकडे गेलो दोघांनी एकमेकांना आलिघन देऊन पोटावर उचलले ,अरे भाऊ कसं- काय, मज्जेत, कुठं जात आहेस चल चहा घेऊ,नाश्ता करू असे म्हटल्यावर तोच मला म्हणाला ,अरे भाई मीच तुला पार्टी देतो, आता आपले दिवस बदलले ,मी प्राध्यापक झालो.त्यानंतर मी त्यास मला पण एम. ए. इंग्लिश मध्ये करायचे आहे असे सांगितले असता त्यानेच, मी मिलिंद ला सांगतो, तू औरंगाबाद ला जा मिलिंद तुझे ऍडमिशन करून देईल (प्रा. पांडुरंग आठवले यांचा लहान भाऊ), नंतर माझे मिलिंद कॉलेज ला ऍडमिशन झाले होते, मी औरंगाबाद ला मिनिहोस्टेला राहून परीक्षा पण दिली होती. यामागे फक्त एक प्रेम आपुलकी दडली होती ती एका मित्राच्या रूपाने,एका मार्गदर्शकाचे रूपाने.बस ,असेच दिवसामागून दिवस जात होते त्याची अन माझी भेट पुन्हा एकदा औरंगाबाद येथे मिनिहोस्टेल मध्ये झाली होती पण त्यानंतर फक्त विचारपूस कसा- काय? काय सुरू आहे इतकंच बोलणं व्हायचं. मित्रांनो, 20 मार्च 2021 शनिवार रोजी, निलेश आठवले याने फोन केला अन रडतचं बोलत होता ,पण त्याचे बोलणेच मला समजत नव्हते मी त्याला म्हटले ,अरे काय झाले ते तर सांग ,त्यावर तो मला मोठ्या हिमतीने बोलला" तुमचा मित्र गेला हो".अशी दुःखद घटना ऐकून खूप मोठा धक्का बसला नि वाईट वाटले,आपल्या मधून एक चांगला मित्र ,मार्गदर्शक, आदर्श शिक्षक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा विचारवंत, विद्यार्थीप्रिय प्राध्यापक,एक तज्ज्ञ व्यक्ती आपल्या मधून निघून गेला ही फार मोठी दुःखदायक शोकांतिका आहे! हे माझे विचार प्रा.पांडुरंग आठवले सरांच्या स्मृतीस विनम्रतापूर्वक अर्पण.

**(प्रा. पांडुरंग आठवले सर माझ्या लहानपणीचे मित्र होते, त्यामुळे मी त्यांना एकेरी शब्दाचा उल्लेख केला,कृपया माफ करणे)**

**अलिम शेख, पोलीस कॉन्स्टेबल नांदुरा रेल्वे, बुलढाणा**



# तुमच्यासाठी खेळातील आठवणी आयुष्यभर राहणार : डॉ.डोंबाळे

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** स्पर्धा भरविणे सर्वात अवघड गोष्ट असते. स्पर्धेत टीम वर्क लागतं. आर्थिक पाठबळ लागतं. वेळ द्यावा लागतो. आज ही सर्व मंडळी त्यांच्या कामात व्यस्त असतानासुद्धा अशा स्पर्धांसाठी वेळ काढतात. लोणंदच्या सामाजिक व राजकिय जडणघडणीमध्ये मोलाचं योगदान राहिलेली ही मंडळी उपस्थित आहेत. तुमच्या साठी या खेळातील आठवणी आयुष्यभर राहणार आहेत, असे प्रतिपादन लोणंद येथील साई क्रिटीकेअरचे सर्वेसर्वा डॉ.मकरंद डोंबाळे यांनी केले. ते लोणंद ता.खंडाळा येथे साथ प्रतिष्ठान यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कै.पै. दत्ताभाऊ चषक १४ वर्षांखालील आमंत्रित खो-खो स्पर्धेत बोलत होते.डॉ.मकरंद डोंबाळे यांच्या हस्ते या स्पर्धेचे उदघाटन करण्यात आले.यावेळी सामाजिक कार्यकर्ते निलेश शेळके, शिवसेना शहर अध्यक्ष उमेश बोडरे, हिमालय फाउंडेशनचे सचिव जाविद पटेल,युवा नेते राजाभाऊ खरात, महंमदभाई मुल्ला,सुभाष पवार (मेजर),सचिन जाधव आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.यावेळी मान्यवरांनी सुद्धा मनोगते व्यक्त करताना खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. स्पर्धेसाठी अनेक संघांनी सहभाग घेतला होता. प्रथम क्रमांकाचे पारितोषिक साथ प्रतिष्ठान (ए) संघ,दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक साथ प्रतिष्ठान (बी) संघ आणि तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले चौधरवाडी, फलटण यांनी पटकाविले.स्पर्धा यशस्वी करण्यासाठी साथ प्रतिष्ठाण अध्यक्ष कय्युम मुल्ला, उपाध्यक्ष दिपक बाटे, सचिव मंगेश माने, कार्यकारिणी सदस्य सुनील रासकर, वैभव धायगुडे, अमन आतार, सुशांत शेळके, शुभम शेळके, करण शिंदे, ओंकार थायगुडे,

अमोल कोळेकर, सार्थक सूर्यवंशी,प्रथमेश रासकर, संघ व्यवस्थापक तेजस शेळके आदी पदाधिकारी व सदस्यांनी विशेष मेहनत घेतली.

# सोयगाव परिसरात वादळी वाऱ्यासह गारपिटीचा पाऊस; लाखोंचे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील कंकराळा, माळेगाव व जरंडी आदी परीसरात शुक्रवारी दुपारी ३ वाजेदरम्यान अर्धा तास झालेल्या वादळी व गारपिटीच्या पावसाने केळी, गहू, ज्वारी व मका पिके आडवी होऊन शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले. या परिसरात झालेल्या पावसात १५० ते २०० हेक्टर वर पिकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे समजते. तालुक्यातील कंकराळा, माळेगाव व जरंडी परिसरात शुक्रवारी दुपारी २.४५ ते ३.१५ दरम्यान अर्धा तास सोसाट्याच्या वादळासह मेघांच्या कडकडाट होऊन गारपिटीचा जोरदार पाऊस झाला. दरम्यान बोरांच्या आकाराच्या गारांच्या पावसामुळे शेतक-यांच्या केळी, गहू, ज्वारी व मका पिके जमिनदोस्त होऊन अतोनात नुकसान झाले. अनेक पिके वाया गेली. दुपारी झालेल्या अवकाळी या वादळी पावसाने शेतकऱ्यांची दाणादान करून टाकली. वादळामुळे कपाशीसह पिके जमिनदोस्त झाली असुन शेतात तळ्याचे स्वरूप आले आहे. नाल्याना पुर आला होता. सोयगाव तालुक्यात शुक्रवारी जरंडी,कंकराळा तर सावळदबारा परिसरात शनिवारी रात्री अचानक वादळाने व पाऊसाने गारपीटीच्या पावसाने मका, ज्वारी,केळीची पिके आडवी होऊन अतोनात नुकसान झाले आहे.दरम्यान नुकसानीच्या पाहणी साठी कर्मचारी नसल्याने ते कर्मचारी



जुन्या पेंशनच्या मागणीसाठी संपावर असल्याने या संपाची झळ शेपकऱ्यांना बसली आहे. सरसकट पंचनामे करुन नुकसान भरपाईची मागणी करून

परिसरात जवळपास ४० ते ५० टक्के नुकसान होऊन देखील महसूल व कृषी खात्याचा एकही अधिकारी फीरकला नसल्याची खंत शेतकरी व्यक्त करीत आहे. या परिसरात सरसकट पंचनामे करून तात्काळ नुकसानभरपाई द्यावी अशी मागणी शेतकऱ्यांतुन होतांना दिसत आहे. कंकराळा, जरंडी परिसरात झालेल्या पावसाने किती नुकसान झाले, याची आकडेवारी उपलब्ध नाही, नुकसानीचा पाहणी अहवाल एक दोन दिवसात येईल तद्नंतर पंचनामे करण्यात येईल अशी शक्यता असून तीही धुसर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# एसटीच्या कर्मचारी पतपेढी सोसायटीच्या संचालकपदी संदीप राजपूत वाहक विजयी

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** एसटी कष्टकरी जनसंघ"जळगाव एस.टी कर्मचारी सहकारी पतपेढी लि.जळगाव यांचा विजयी झालेल्या संचालकांचा सत्कार समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.यामधे नंदुरबार, जळगाव धुळे व नाशिक जिल्हा एसटी कर्मचारी सहकारी सोसायटी मध्ये जनसंघाचे परिवर्तन पॅनल चा एकतर्फी संपूर्ण सतरा जागांवर विजय झाला सर्व विजयी उमेदवारांचे माननीय ॲड गुनरत्न सदावर्ते साहेब, जनसंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा ॲड जयश्री पाटील यांनी सर्व विजयी उमेदवारांचे सत्कार केला. जिल्हा एसटी कर्मचारी पतपेढीच्या निवडणुकीची मतमोजणी जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत निवडणूक निर्णय अधिकारी प्रशांत वीरकर यांच्या अध्यक्षताली झाली. जळगाव, धुळे, नंदुरबार, नाशिक या विभागांतील दोन हजार ९२५ सभासद असलेल्या पतसंस्थेच्या निवडणुकीकडे लक्ष लागून होते. मागील वर्षी झालेल्या संपाचे नेतृत्व करणारे गुणरत्न सदावर्ते यांचे पॅनल, तर दुसरीकडे नामांकती संघटनांचे एकत्रित लढलेले तीन पॅनलसमोर उभे होते. संचालकपदाच्या १७ जागांसाठी या निवडणुकीत प्रस्थापितांना एकही जागा जिंकता आली नाही. विजयानंतर सर्व उमेदवारांसह समर्थकांनी एसटी आगारात गुलाल उधळून जल्लोष केला.




यावेळी मा ॲड. जयश्री पाटील यांनी संचालक रमेश राजपूत पाचोरा डेपोचे वाहक रा.नगरदेवळा यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी जळगाव चे माजी उपमहापौर आश्रिवन सोनवणे, मनोज भाऊ,बाळू हटकर हे या पॅनल चे प्रमुख होते.

# जेईएसमध्ये उद्या 'कवितेचा पाडवा'

## दोन दिग्गजांचा प्रवास, काव्यमैफल, चित्रप्रदर्शन, सांस्कृतिक पर्वणी

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** स्व. नंदकिशोर साहनी चॅरिटेबल ट्रस्ट आणि अनुभव प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने गुढीपाडव्यास दरवर्षाप्रमाणे यंदाही साहित्याची गुढी उभारली जाणार असून बुधवारी (ता.22) सायंकाळी 6.30 वा. जे. ई. एस. महाविद्यालयाच्या प्रांगणात 'दुःखी' राज्य काव्य पुरस्कार वितरण, साहित्य, सिनेमा क्षेत्रातील दोन दिग्गजांचा प्रवास, काव्यमैफल आणि चित्रप्रदर्शन अशी पर्वणी रसिकांना मिळणार आहे. सुप्रसिद्ध उर्दू शायर स्व. राय हरिश्चंद्र साहनी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मराठी कविता आणि साहित्यातील समग्र योगदानाबद्दल 'दुःखी' राज्य काव्य पुरस्कार मागील 25 वर्षांपासून वितरित केला जातो. आतापर्यंत मराठी साहित्य विश्वातील अनेक दिग्गजांना सदर पुरस्काराने गौरवण्यात आले असून नामवंत कवींनी कवितेच्या पाडव्यात हजेरी लावत आपल्या कवितांचे




सादरीकरण केले आहे. भरगच्च रसिकांचा प्रतिसाद हे वेगळे वैशिष्ट्य असलेल्या देखण्या सोहळ्याचे यंदा रौप्य महोत्सवी वर्ष असून संयोजकांनी वेगळे स्वरूप देत 'कवितेच्या पाडव्या'ची अभिनव रचना केली आहे. कोल्हापूर येथील लेखक, संपादक, चरित्रकार डॉ. विजय चोरमारे यांना सिनेदिग्दर्शक नागराज मंजुळे यांच्या हस्ते पुरस्कार वितरित केला जाणार असून ज्येष्ठ विचारवंत डॉ. प्रल्हाद लुलेकर यांची या वेळी प्रमुख उपस्थिती राहील. पुरस्कार वितरणानंतर नागराज मंजुळे व डॉ. विजय चोरमारे यांची डॉ. संजीवनी तडेगावकर,आणि डॉ. संजय चौधरी (जेऊर) हे मुलाखत घेतील तसेच काव्यमैफलही रंगणार आहे. कार्यक्रम स्थळी जळगाव येथील राजू बाविस्कर यांच्या आकर्षक, लक्षवेधी छायाचित्रांचे प्रदर्शन, 25 वर्षांतील सोहळ्यांची आठवण म्हणून 'सेल्फी पॉईंट'ची व्यवस्था करण्यात आली असून रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सांस्कृतिक मेजवानीचा लाभ घ्यावा, असे आवाहन नंदकिशोर साहनी चॅरिटेबल ट्रस्ट चे विनीत साहनी, अभय साहनी, अनुभव प्रतिष्ठानच्या डॉ. संजीवनी तडेगावकर, पंडितराव तडेगावकर यांनी केले आहे.